# शब्द रुची

४४

मे २०१९
मूल्य १० रुपये
पृष्ठे ४४




कामगार आहे मी,
तळपती तलवार आहे मी...

# पुस्तक प्रकाशन क्षणचित्रे



शिवकुमार आडे लिखित 'गुंफण' या कवितासंग्रह प्रकाशनसमयी सुदेश हिंगलासपूरकर, कवी शिवकुमार आडे, कवी यशवंत मनोहर आणि गझलकार भिमराव पाचाळ




गझलकार भिमराव पांचाळ व सहकारी



दीपक करंजीकर लिखित 'घातसूत्र' पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन.
यजुर्वेंद्र महाजन (दीपस्तंभ फाउंडेशन), डॉ. के.बी. पाटील (माजी कुलगुरु), लेखक दीपक करंजीकर, अनिल शाह (चार्टर्ड अकाउंटंट), शंभू पाटील (परिवर्तन संस्था), मृण्मयी कुलकर्णी, गिरीश कुलकर्णी

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

मे २०१९, वर्ष सातवे
अंक पहिला, मूल्य १० रु.

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **डॉ. वीणा सानेकर**
मुखपृष्ठ : **सतीश भावसार**
मुखपृष्ठावरील ओळी : **नारायण सुर्वे**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**
**ज्यांची वर्गणी मनिऑर्डरद्वारे १०० अथवा १५० रुपये येईल त्यांना अंक फक्त ६ महिनेच पाठवला जाईल.**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
☎ २४२१६०५० / २४३०६६२४
granthaliruchee@gmail.com www.granthali.com

**ग्रंथाली ऑफिसची वेळ १ एप्रिलपासून १२ ते ७ संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी वाचक व विक्रेते यांनी याची नोंद घ्यावी.**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

## अनुक्रम

**स्मरणस्वर**
- डॉ. गो.मा. पवार : साक्षेपी समीक्षक आणि चरित्रग्रंथकार/ **रणधीर शिंदे** / ६
- ऋणानुबंध / **शिरीष गंधे** / ९

**विचारविश्व**
- एकविसाव्या शतकातील स्त्री-पुरुष संबंध आणि नवा 'मानुष'वाद (भाग २) / **रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ** / ११

**जडणघडण**
- अनोखी 'विज्ञानवारी' / **हेमंत लागवणकर** / १६
- थिएटर कोलाज / **पल्लवी वाघ-केळकर** / १८

**स्त्रीमानस**
- 'क्रांतीचे बीज रुजवणारी मुक्ता' / **सुरेखा पैठणे** / २०
- 'एक सखोल काव्यसंवाद' / **धनंजय गांगल** / २२

**काव्यरंग**
- हे गाव शहरात येताना, अवकाळी अभंग **सुधीर ब्रह्मे** / २४

**आपल्या मातीतला चित्रपट**
- राष्ट्रीय पुरस्कारविजेता 'ना बंगारु तल्ली' / **संतोष पाठारे** /२६
- मनोरंजन क्षेत्रात अनुवादाच्या संधी आणि आव्हाने / **नेहा सावंत** / २८

**वाचता-वाचता**
- सुरांची नवी गाथा / **गणेश मनोहर कुलकर्णी** / ३१
- मराठी अभ्यास केंद्राचा 'महाराष्ट्र दिन' / ३३
- पुस्तक आणि पुरस्कार वृत्तांत / ३४
- ग्रंथाली ग्रंथपाने – **चांगदेव काळे** / ३९

**महाराष्ट्रदिनाच्या व कामगारदिनाच्या सर्व वाचक-लेखक-जाहिरातदारांना मन:पूर्वक शुभेच्छा!**

**म**ला आठवतं पाच वर्षांपूर्वीच्या निवडणूक ड्युटी दरम्यान ताणाने एका महिला प्रिसायडींग ऑफीसरच्या जिवावर बेतले. निवडणुका करणाऱ्या माणसांचे ताण कमी करता येणं हे त्या-त्या ठिकाणच्या सेंट्रल पोलिंग स्टेशन्सवर अवलंबून असतं. काही ठिकाणी माणुसकीने माणसं वागतात, ऐकून घेतात, प्रतिसाद देतात. काही ठिकाणी प्रश्न-समस्या ऐकतात पण करत काहीच नाहीत. काही ठिकाणी थेट उडवूनच लावतात.

निवडणुकांच्या आलेल्या ड्युट्या कशा टाळायच्या हे जमलेली काही माणसं असतात. ती बरोब्बर सगळं मॅनेज करतात, अशी मॅनेज करणारी माणसं असतात हे माहीत असल्याने मग अडचणी असलेल्या सगळ्यांच्याकडे निवडणूक अधिकारी संशयाने बघतात.

सरकारी कर्मचारी, शाळा-कॉलेजातले शिक्षक, क्लार्क, शिक्षकेतर कर्मचारी अशा श्रेणींमधल्या लोकांना निवडणुकांच्या ड्युट्या येतात. काही त्यांच्या-त्यांच्या भाग्याने या ड्युटीतून सुटतात. भाग्यानेच म्हणेन आता कारण या लोकसभेच्या निवडणुकीदरम्यान आलेला अनुभव भयानक आहे, पण त्याच्याकडे वळण्याआधी जुन्या आठवणी स्मरतायत.

मला आठवतं अगदी पहिल्यांदाच ड्युटी आली होती प्रिसायडींग ऑफिसरची ती जवळपास वीस वर्षांपूर्वी. घरापासून बरीच दूर, एका बालवाडीच्या जागेत! मी नवखी होते, पण आमच्या टीमने मिळून छान काम केलं. निवडणुकीच्या कामात मतदानादिवशी काम करणारा प्रत्येकच एकमेकांवर अवलंबून असतो. दोन निवडणुकांमध्ये माझ्या टीममध्ये सर्व महिलाच होत्या. मतदानाची वेळ संपल्यावर थोडा वेळ थांबून त्या सगळ्या 'प्रिसायडींग ऑफिसर' म्हणून माझे कर्तव्य मला समजावून निघाल्या. अशा वेळी माझ्या टीमच्या प्यून्सनी मला साथ दिली. 'रात्री बारा वाजले तरी हरकत नाही' असं म्हणून रेल्वेस्टेशनपर्यंत जबाबदारीने सोडले, एकाने तर 'मॅडमजी मॅडमजी' म्हणून इतकी काळजी घेतली की मला त्याच्यासोबत प्रचंड सुरक्षित वाटलं.

पाच वर्षांपूर्वीच्या निवडणुकांदरम्यान एका ठिकाणी प्रिसायडींग ऑफिसर म्हणून नियुक्ती झाली तो बूथ 'संवेदनशील' (सेन्सिटिव्ह) होता. त्यामुळे तिथे सूक्ष्म निरीक्षकाची निवृत्ती झाली होती, पूर्ण वेळ कॅमेऱ्यामध्ये चित्रीकरण होत होतं; पण हेही सारं नीट पार पडलं. मतदानादिवशी सकाळी चारला घर सोडायचे तेव्हा वेगळीच जाणीव मनात दाटून यायची. आपण या लोकशाही प्रक्रियेतील एक महत्त्वाचं काम करतोय, याविषयीचा अभिमान वाटायचा नि रात्री बाराला वगैरे परतताना लोकल ट्रेनमधल्या सर्व निवडणूक ड्यूटी करून आलेल्या माझ्यासारख्या अनेकींच्या चेहऱ्यावर कर्तव्यपूर्तीचे समाधान पहायचे.

यंदा मात्र वेगळेच घडले. एखाद्या माणसाची चूक आणि निष्काळजीपणा अख्ख्या टीमला कसा भोवतो हे प्रत्यक्ष अनुभवले. एका बूथवर साधारणपणे पाच माणसं काम करतात. एक प्रिसायडींग ऑफिसर (मतदानकेंद्राध्यक्ष) आणि इतर मतदान अधिकारी क्रमांक एक, दोन, तीन आणि सोबत एक शिपाई. याखेरीज प्रत्येक बूथकरता एक पोलिसदादा असतोच. यावेळी पहिल्या प्रशिक्षणानंतर आम्हाला आमची टीम कळली. टीममधला एक मुलगा नुकता-नुकता ओरिसातून महाराष्ट्रात आलेला म्हणून बावरलेला, दुसऱ्या बाई अनुभवी पण फार काही अंगाला लावून न घेणाऱ्या!

आणि हो मुख्य मतदानकेंद्राध्यक्ष रेल्वेतले अधिकारी बिहारीबाबू! त्यांचा हात साध्याशा बँडेजमध्ये अडकवलेला, आम्हाला म्हणाले, ''मैं तो ड्युटी नहीं कर सकता!'' त्यानंतर प्रत्येक प्रशिक्षणाच्या वेळी हा मनुष्य सही करून निघून जायचा त्यामुळे मिळालेल्या ऑर्डरवर 'मैं तो ड्युटी नही कर सकता' वाल्याचेच नाव कायम. स्वत: मतदानकेंद्राध्यक्ष म्हणून ड्युटी केल्यामुळे या पदावरच्या माणसाच्या जबाबदाऱ्यांची माझी जाणीव पक्की! म्हणून लगेचच सेंट्रल पोलिंग स्टेशनवर जाऊन हे कानावर घालायचे ठरवले कारण गेल्या वर्षी झालेल्या अपघातानंतर पाठीच्या असह्य दुखण्यातून मी जात होते. वाकणं, जड सामान उचलणं, जास्त वेळ उभं वा बसणं सारंच कठीण! खरं तर या मेडिकल कारणाच्या अर्जासकट मी पोलिंग स्टेशनला गेलेही होते आधीच पण 'आम्ही काही करू शकत नाही. तुम्हाला ड्युटी मिळाली आहे, तर ती करावीच लागेल' असे उत्तर मिळालेले. या सगळ्या पार्श्वभूमीसकट मी परत एकदा पोलिंग स्टेशनला गेले. तिथल्या मुख्य अधिकाऱ्याला भेटून प्रिसायडींग ऑफिसरचा किस्सा ऐकवला. ते म्हणाले, ''तब्येतीचं कारण असतानाही तुमचं ड्युटी करणं मी ॲप्रिशिएट करतो. तुम्हाला नक्की प्रिसायडींग ऑफिसर बदलून देतो. डोंट वरी. २८ तारखेला याल तेव्हा काम होईल.'' दरम्यान पुन्हा एकदा प्रत्यक्ष जाऊन मी माझी विनंती पोलिंग स्टेशनच्या अधिकाऱ्यांसमोर ठेवली, ''सदर शर्मा नामक व्यक्तीला तो ड्युटी करणार आहे की नाही हे फोन करून विचारा'' असं म्हणाले. हा मनुष्य फोन घेत नव्हता. अवतीभवती वेगवेगळ्या टीम एकमेकांना भेटत होत्या. एकत्रितपणे जाऊन प्रशिक्षण घेत होत्या. आमच्याकडे टीमला वालीच नसल्याने सगळे विस्कटले होते.

अखेर या सर्वात २८ एप्रिल उजाडला. सकाळी साडेआठला पोलिंग स्टेशनला हजर झाले. आमचे मतदानकेंद्राध्यक्ष तोवर आले नव्हतेच. टीम आलीय का वगैरे त्यांना पर्वा नव्हतीच. पूर्वीच्या सर्व प्रशिक्षणांना सही करून हे गृहस्थ पळून जात होते. 'मैं ड्युटी नहीं कर सकता' हेच धरून ठेवून त्यांनी प्रशिक्षणही घेतले नव्हते.

सगळं सामान घेऊन बूथ लावायचा होता. मी केंद्राध्यक्ष बदलून देण्याची विनंती घेऊन पुन्हा गेले. जवळपास दीडेक तास बसून राहिले. पुन्हा प्रस्तावना. पुन्हा तेच पुराण नि अचानक या वेळेला वेगळेच घडले. तिथला एक अधिकार वस्सकन् अंगावर ओरडला. ''बाहेर पडा इकडून. जा तुमच्या तुमच्या टीममध्ये. आवाज बंद!'' मी सभागृहाबाहेर पडले तेव्हा डोळे भरून आले होते. ज्याकरता

मी गेले दोन–तीन आठवडे सतत पाठपुरावा करत होते ते सारे व्यर्थ ठरले होते. कारण बिहारीबाबूंनी सही करून सर्वांना भ्रमात ठेवले होते. नवख्या झोनल ऑफिसरला कसे कोण जाणे पण त्याने गुंडाळून ठेवले होते.

एका अटीतटीच्या टप्प्यावर हा सगळा मामला आला. आता मतदानकेंद्राध्यक्षांनी सही करायची नि सोबत सबंध टीमने सामान घेऊन बूथवर जायचे. मला झोनल ऑफिसर म्हणाले. ''तुम्ही करा ना काम. त्यांचा प्रॉब्लेम आहे. ते बरे नाहीत. तरी ते शाई लावतील.'' हे सारं आता होणार होतं हे मला कळून चुकलं होतं. मी म्हटलं, ''हा काही अचानक उद्‌भवलेला प्रश्न नाहीय. गेले ३ आठवडे हेच सुरू आहे. ना त्यांनी स्पष्ट सांगितले ना तुम्ही काही केले. मग मी त्यांची ड्यूटी करू का?''

'आवाज बंद!' माझ्या कानात अजून एका उद्दाम अधिकाऱ्याचा आवाज घुमत होता. माझा निर्णय ठाम झाला. मी आता कोणत्याच दडपशाहीला बळी पडणार नव्हते. मी मला आलेलीच ड्यूटी करणार होते मात्र हळूहळू माझ्याभोवतीच्या अधिकाऱ्यांच्या उद्दामपणाचा विळखा घट्ट होत गेला. ते दहा एक पुरुष अधिकारी नि समोर मी एकटी! 'बाई तुम्हाला मतदानकेंद्राध्यक्षाचं काम करावं लागेल. आयत्या वेळी काहीही झालं तर नियमाप्रमाणे ती जबाबदारी तुम्ही घ्यायची आहे.' ''ही आपल्या वेळची समस्या नाही. या माणसाचे हेच सुरूय ड्यूटी आल्यापासून'' – माझे ठाम उत्तर! 'ये लेडी तो निगेटिव्ह ही है' – तो मध्येच बरळला.

माझा आवाज आता टिपेला, ''पूरी टीम को आपने फसाया है, आपकी वजहसे ये वक्त आया है और मुझे क्या बोल रहे है आप'' – ''ओ बाई आवाज बंद करायचा. आवाज एकदम खाली. गुन्हा दाखल करतो आता तुमच्यावर. सगळं शूटिंग होतंय.'' इतक्यात बाजूला पाहिलं. एकजण कॅमेरा घेऊन सगळं रेकॉर्ड करत होता.

मी समोरच्या अधिकाऱ्याच्या नजरेला नजर देत म्हणाले, ''करा आत्ताच्या आता माझ्यावर गुन्हा दाखल करा. ज्याची चूक आहे त्याला काही बोलत नाही कुणी. माझा गुन्हा काय ते सांगा.'' ''अहो बाई, गुपचूप पेट्या ताब्यात घ्या, सही करून आणि ताबडतोब मंडप खाली करा, जा बूथवर.'' ''मी का सही करू? पीआरओने करायची.'' ''हे बघा आयत्यावेळी काही झालं तर तुम्हाला पीआरओ ड्यूटी करावी लागते.''

मी त्यांच्याच पत्रातले शब्द त्यांना ऐकवत म्हणते, ''इन द ॲबसेन्स ऑफ पीआरओ त्यानंतरच्या माणसाने ही ड्यूटी करावी, असे म्हटलेय या पत्रात आणि पीआरओ (मतदानकेंद्राध्यक्ष) समोर उपस्थित आहे. त्यामुळे मी त्याची ड्यूटी करणार नाही.'' ''तुम्ही आता गप्प राहा. एकदम गप्प! सही करून सामान घ्या.'' – एक अधिकारी. ''नाही करणार सही. समोर पीआरओ आहे त्याला सांगा.'' ''मेरे को तो साईन करना भी नही आता. हाथ का प्रॉब्लेम है।'' (त्याने हाताला गुंडाळलेल्या साध्या बँडेजपेक्षा दुप्पट लांबी–रुंदीचा पट्टा माझ्या पाठीला–कंबरेला होता.) मी पुन्हा ठामपणे म्हणाले, ''सही करता येत नाही तर अंगठा घ्या यांचा.''

सामान ताब्यात घेऊन बूथमध्ये जाण्याकरता निघत असलेल्या बसकडे आम्ही निघालो. अचानक श्रीयुत बाबूंना मागे बोलावले गेले. आम्हाला नवा मतदानकेंद्राध्यक्ष मिळाला, पण त्याकरता मानहानी, अपमान सोसून ठामपणे उभे राहावे लागले.

पुरुषाला बाईने आवाज लावलेला आवडत नाही यावर परत शिक्कामोर्तब झाले. बाईने टाचेखालीच राहायचं. हे आवाज लावणारे पुरुष कदाचित एरव्ही कुणाच्या तरी अधिकाराखाली काम करत असतील. या निवडणूक कामादरम्यान यांना अधिकार मिळाले, सत्ता मिळाली. सत्ता केवळ शोषण करते! ती समजून घेत नाही. तिच्यापर्यंत कोणताही प्रामाणिक आवाज पोचत नाही. सत्ता मुजोरपणे आवाज बंदच करते. मुर्दाडपणे सोसणारे लोक सत्तेला अपेक्षित असतात.

त्यानंतर ज्या मोकळ्या मैदानात ड्यूटी आली होती तिथे आम्ही रवाना झालो. पाठीच्या दुखण्याने बसच्या पायऱ्याही नीट चढता येत नव्हत्या. हातात सामान होतं. बस एका मैदानात घेऊन आली. तात्पुरते बूथ उभारलेले नि ऊनच ऊन. मनात पहिला प्रश्न आला, या मैदानात मतदार कसे उभे राहतील रांगा लावून? पाठोपाठ दुसरा विचार, टॉयलेटच्या सोयीचा. मैदानाच्या एका कोपऱ्यात फिरते शौचालय... त्या फिरत्या गाडीच्या पायऱ्या उंच असल्याने मला चढता येणारच नव्हत्या. सकाळी साडेचारला घराबाहेर पडलेली मी साडेसात वाजेपर्यंत टॉयलेट न वापरता बसून राहिले. जवळच कन्स्ट्रक्शनाच्या कामाची एक मुतारी होती. एकदा तिथे गेले तर भपकाऱ्याने उलटी येऊ लागली. मग निग्रहाने परत फिरले. साडेसात वाजता जवळच्या एका घराची बेल दाबून टॉयलेटकरता विनंती केली.

ज्या बूथवर माझी नियोजित ड्यूटी करत होते तिथे मतदारांची रांग संपतच नव्हती. वर तापणारे ऊन, त्यात मंडपही पूर्ण घातलेला नव्हता. (आम जनतेच्या सावलीचा विचार या लोकशाहीत केव्हा होणार?)

मतदान केंद्रावर दिवसभर गर्दी होती वय वर्ष सत्तरी ओलांडलेले, अगदी पार नव्वदीपर्यंतचे ज्येष्ठ नागरिक मतदान करायला आले होते. मलीन फाटक्या कपड्यातले कितीतरी कष्टकरी रांग लावून उभे होते. पायावर उभंही राहता येत नव्हतं असा अपंग मुलगा मत देण्याकरता आपल्या बहिणीचा हात धरून आला होता. या सर्वांच्या चेहऱ्यावर लोकशाहीवरला विश्वास दिसत होता. मताच्या हक्काचा ओतप्रोत अभिमान ओसंडून वाहात होता. आपली दु:खं, समस्या, वेदना दूर होतीलच कधीतरी हा विश्वास या देशाच्या सामान्यातल्या सामान्य माणसाने अजूनही हरवलेला नाही. मला मिळालेलं या निवडणुकीतलं हे एकमेव समाधान! म्हणून मीही त्यांच्यासोबत कवी साहिरच्या ओळी म्हणते–

*अपनी काली करतूतों पर*
*जब ये दुनिया शरमाएगी*
*वो सुबह कभी तो आएगी।*

**– डॉ. वीणा सानेकर**
सी–१२, सुयोग सोसायटी,
संत ज्ञानेश्वर मार्ग, मुलुंड (पूर्व), मुंबई–४०० ०८१
भ्रमणध्वनी : ९८१९३५८४५६
veenasanekar2018@gmail.com


साहित्याचा विचार करताना एकांगीपणे पाहू नये. व्यापक विचारातून पाहिले पाहिजे अशी भूमिका घेणाऱ्या गो.मा. पवारसरांच्या समीक्षापर लेखनाचे विविध पैलू उलगडणारा लेख...

# डॉ. गो.मा. पवार : साक्षेपी समीक्षक आणि चरित्रग्रंथकार


**रणधीर शिंदे**

**डॉ.** गो.मा. पवार यांचे १६ एप्रिल रोजी वयाच्या ८७ या वर्षी दु:खद निधन झाले. प्रा. गो.मा. पवार यांची मराठी साहित्य व विचारविश्वाला साक्षेपी समीक्षक व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या जीवनकार्याचे अभ्यासक म्हणून ओळख आहे. मराठी भाषासाहित्याचे व्यासंगी प्राध्यापक व विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून त्यांनी विद्यापीठ पातळीवर दीर्घकाळ ठसा उमटविला. त्यांनी केलेल्या समीक्षात्मक लेखनाचे स्वरूप हे दुहेरी स्वरूपाचे आहे. एक सैद्धान्तिक पातळीवरची समीक्षा व उपयोजित स्वरूपाची समीक्षा. तसेच महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या जीवनकार्यासंबंधी मराठीत पहिल्यांदाच इतकी साधार, विस्तृत आणि सखोल मीमांसा करणारे लेखन त्यांनी केले. अलीकडील काळात भाषासाहित्याच्या प्राध्यापकाने सामाजिक सुधारणाकाळाविषयी क्वचितच एवढे लेखन केले असावे. तसेच प्रा. गो.मा. पवार यांनी वाङ्मयविषयक व शैक्षणिक संस्थांवर काम आपला कार्याचा वेगळा असा ठसा उमटविला. साहित्य अकादमीच्या मराठी भाषा सल्लागार मंडळाचे ते दहा वर्षे समन्वयक होते. तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाव विद्यापीठ, अनुदान आयोग मंडळ व इतर संस्थांवर त्यांनी आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमटविला.

या ठिकाणी प्रा. गो.मा. पवार सरांच्या समीक्षात्मक कामगिरीसंबंधीची काही निरीक्षणे नोंदविली आहेत. (महर्षी शिंदे यांच्या जीवनकार्याविषयी स्वतंत्र लेख होईल एवढी महत्त्वाची कामगिरी केली आहे. मात्र लेखाच्या मर्यादेमुळे समीक्षात्मक लेखनाकडे लक्ष वेधले आहे.) १९६२ ते २०१६ या काळात सरांनी विविध स्वरूपाचे समीक्षात्मक लेखन केले. त्यांच्या समीक्षालेखांचा पहिला संग्रह १९९४ साली प्रसिद्ध झाला असला तरी या संग्रहातील त्यांचे लेख १९६२ ते १९९० या काळात प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांच्या समीक्षा लेखनावर पूर्वपरंपरेतील कोणा समीक्षकाचा म्हणून असा प्रभाव दाखवता येत नाही. मात्र तो बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक–पर्यावरणात पाहता येतो. मराठी समाजाच्या विस्तारलेल्या कक्षा आणि प्रस्थापित वाङ्मयसंस्कृतीच्या एकारेलेपणात देखील पाहता येतो. स्वातंत्र्या दरम्यान व त्यानंतर जीवनसंबद्ध वाङ्मय निर्माण होऊ लागले. तसेच मराठी विचारविश्वातूनही देखील सामाजिक विचाराला महत्त्व प्राप्त झाले. प्रा. गो.मा. पवार सरांचा पदव्युत्तर विंद्यार्थीदशेचा पुण्यातील काळ आणि आरंभकाळातील नोकरी काळातील त्यांचा वावर हा सामाजिक विचारांना प्राधान्य देणाऱ्या मित्रांशी, ज्येष्ठांशी होता. या काळात समाजप्रबोधन संस्थेशी त्यांचा जवळून संबंध आला. या संस्थेसाठी त्यांनी 'विवेकनिष्ठ जीवनदृष्टी' (१९६६) हे पुस्तक लिहिले होते. अ.भि. शहा, दि.के. बेडेकर, पन्नालाल सुराणा, वसंत पळशीकर. मे.पुं. रेगे, रा.भा. पाटणकर यांच्याशी त्यांचा जवळून संबंध आला. या साऱ्या पर्यावरणाचा त्यांच्या विचारदृष्टी व समीक्षादृष्टीवर झाला. १९६२ साली त्यांनी रूपकात्मक कवितेवर लेख लिहिला. गो.मा. पवार यांच्या एकंदर समीक्षेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या प्रत्येक लेखात स्वतंत्र विश्लेषक असा विचार असतो. समीक्षा म्हणजे केवळ वर्णनपर आशय कथन करणारी आस्वादात्मक असते, याला त्यानी पूर्णतःफाटा दिला. साहित्यस्वरूपाचा अत्यंत काटेकोर, वस्तुनिष्ठ भूमिकेतूनच विचार त्यांच्या साऱ्याच समीक्षेत पहायला मिळतो. रूपकात्मक कवितेचे आवाहन बुद्धीला असते. बऱ्याच वेळा ते बाहेरून लादलेले असते. त्यामुळे रूपकात्म कवितेतून खराखुरा काव्यात्म अनुभव येत नसतो असा विचार त्यांनी मांडला.



१९७२ च्या दरम्यान गो.मा. पवार सरांनी तीन अतिशय वेगळे लेख लिहिले. पु.ल. देशपांडे यांच्या 'तुज आहे तुजपाशी', वसंत कानेटकारांच्या 'रायगडाला जेव्हा जाग येते' या नाटकांवर तसेच श्री.ना. पेंडसे यांच्या 'गारंबीचा बापू' व 'ऑक्टोपस' या कादंबऱ्यांवर लिहिलेले लेख




चर्चाविषय ठरले. कारण या साहित्यकृतींच्या रूढ लोकप्रिय आकलनापेक्षा अतिशय वेगळे आकलन त्यांनी मांडले. साधारणतः या काळातील लेखनापासून त्यांच्या समीक्षाविचारात अभिरुची विचारला केंद्रीय स्थान मिळाले. त्यांच्या एकदंर समीक्षाविचारात वाङ्मयीन अभिरुचीचा विचार अग्रभागी राहिला. वरील साहित्यकृती या रंजनपर, परंपरानिष्ठ मूल्यांच्या चौकटी सांभाळणाऱ्या आणि मध्यमवर्गीय अभिरुचीला शरण जाणाऱ्या साहित्यकृती आहेत असा निष्कर्ष त्यांनी मांडला. 'प्रतिष्ठान'मध्ये लिहिलेल्या या नाटकावरील लेखाचे शीर्षकच मुळात 'नाट्याभास आणि वाचक-प्रेक्षकांच्या अभिरुचीचा अनुनय' असे होते. श्री.ना. पेंडसे यांच्या कादंबऱ्यातून मानसशास्त्रातील प्रमेयाधारे या कादंबऱ्या दिवास्वप्नाच्या स्वरूपाच्या, उच्च मध्यमवर्गीय समूहाच्या कामविकाराचे रंजक चित्रण करणाऱ्या, एकसुरी दीर्घकथेच्या स्वरूपाच्या असल्याचे परखडपणे नोंदविले. मराठी वाङ्मयाच्या वाढत्या विस्तारात अभिरुचीसंघर्षाच्या टकरावाचे स्वरूप त्यांनी शोधले. लेखक आणि वाचकपक्षी अभिरुचीचे सामाजिक संदर्भात विविध आयाम त्यांनी शोधले. प्राचीन कवितेपासून ते आजच्या साहित्यातील अभिरुची द्वंदाची निरीक्षणे त्यांच्या लेखात आहेत. मराठी लेखकाच्या साहित्य आकलनाची मर्यादा आणि वाचकांच्या अभिरुचीचे लेखकांवर होणाऱ्या 'जबरी आक्रमणाविषयी'चा विचार त्यांच्या लेखात सतत आहे.


वाङ्मयीन अभिरुचीचा विचार करताना ग्रामीण आणि नागर, जुने आणि नवे तसेच पारंपरिक आणि आधुनिकता या दृष्टिकोनाधारे त्यांनी वाङ्मयाभिरुचीचा विचार केला. वि.स. खांडेकरांच्या वाङ्मयातील ध्येयवाद, आदर्शवादी भूमिका, भारतीयत्व, लोकप्रिय अलंकरण शैली व वाचकांच्या हृदयाला हात घालण्याच्या सामर्थ्यामुळे वाचकमनाला आवाहन मिळाले अशी त्यांच्या वाङ्मयाच्या लोकप्रियतेची मीमांसा वाङ्मयाभिरुची दृष्टीने केली.

या अभिरुची संघर्षामुळे नव्या लेखकाचे यथार्थ असे आकलन वाचक व समीक्षकांकडून झाले नसल्याचे रास्त तक्रार गो.मा. पवार यांनी नोंदविली आहे. भाऊ पाध्ये, भालचंद्र नेमाडे यांच्या वाङ्मयाच्या विस्तारलेल्या भानाचे आकलन करताना मराठी वाङ्मयीन संस्कृतील अपयश आल्याचे ते नोदंवतात. भाऊ पाध्ये यांच्या साहित्यातील नवनैतिकतेचे स्वरूप, मध्यम वर्गीयांचा उथळपणा, अनुत्कट शैली तसेच भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबऱ्यातील महाराष्ट्र समाजदर्शन, समूहटीका, बोचणाऱ्या उपरोधामुळे रूढ अभिरुचीने त्यांची वाङ्मयाची दखल घेतली गेली नाही. या आव्हानपरतेमुळे वाचक व समीक्षकांत दुरावा निर्माण झाल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

एकंदर साहित्यस्वरूपाबद्दल सुस्पष्ट भूमिका सरांच्या समीक्षेत आहे. वाङ्मयाचा ते जीवनसंबंद्ध भूमिकेतून विचार करतात त्यामुळे त्यांच्या समीक्षाविचारात वास्तवता, जीवनसंबंद्धता, नवी नैतिकता, आधुनिकता या मूल्यांना सतत स्थान मिळालेले आहे. तसेच साहित्यातील जीवनदर्शनाबरोबरच कलात्मकतेचे स्वरूपाकडेही ते वारंवार लक्ष वेधतात. मराठी लेखकांचे परंपराप्रेम आणि जीवनविन्मुखता याबद्दल सतत त्यांनी विचार मांडला.

साहित्य आणि सामाजिकता यातील आंतरसंबंधाबद्दल त्यांना विशेष आस्था होती. या दृष्टिकोणाचा त्यांच्या समीक्षेवर मोठा प्रभाव होता. स्वातंत्र्यपूर्व ते स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी वाङ्मयाची पाहणी त्यांनी सामाजिकतेच्या अंगाने केली. लेखकाची, जडणघडण, त्याचा मनःपिंड, निर्मितीप्रेरणा, भाषा व अभिरुचीचीचा त्यांनी समाज संदर्भ विचार मांडला. १९६० नंतरचे मराठी समाजाचे बदलते चित्र, समाजिक बदल व विकेंद्रीकरणामुळे मराठी वाङ्मयाच्या विस्तारलेपणामुळे नव्या अनुभवाच्या वाङ्मयीन गुणवत्तेचे साहित्य आले. याचा त्यानी सतत पुरस्कारच केला. तसेच वाङ्मयाचा विचार करताना एकांगी भूमिका घेता कामा नये अशी त्यांची भूमिका होती. साहित्याचे स्वरूप हे व्यापक भूमिकेवरून समजून घेतले पाहिजे अशी त्यांची धारणा होती. दलित साहित्याबद्दलच्या सामाजिक, सांस्कृतिक फलश्रुतीबद्दलची त्यांनी रास्त अशी दखल घेतली. मात्र ग्रामीण साहित्य चळवळीला अशी कोणतीही भूमिका नसल्याचे परखडपणे सांगितले. तसेच पुढील टप्प्यावर दलित, ग्रामीण साहित्य एकांगी व्हायला नको असेही साधार नमूद केले.


आधुनिक मराठी कथावाङ्मयावरची त्यांची समीक्षा मौलिक ठरते. व्यंकटेश माडगूळकर, गंगाधर गाडगीळ, चिं.वि. जोशी, चारुता सागर, सिनिक यांच्या कथेवर त्यांनी लिहिले. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथावाङ्मयाचा आवाका, मानवी व मानवेतर जगाचे त्यांचे आकलन, निसर्ग प्रदेशाचे भान व त्यांच्या साहित्यातील देशी जाणिवाची सखोल मीमांसा केली. माडगूळकरांच्या कथेतील दलित विद्रोहात्म जाणिवेचे त्यांनी केलेले निवडक कथांचे संपादन वैशिष्ट्यपूर्ण ठरले. (ओझं) तसेच चारुता सागरांच्या कथेतील भटक्या विमुक्ताच्या समाजचित्रणामुळे त्याच्या कथेला मिळलेले परिमाणाची गुणवत्ता नमूद केली. आधुनिक मराठी कथासाहित्यातील बदलत्या रूपाचा व वाङ्मयीन गुणवत्तेची सखोल चिकित्सा त्यांनी केली.




प्रा. गो.मा. पवार यांच्या समीक्षालेखनाचा महत्त्वाचा विशेष म्हणजे त्यांची तात्त्विक स्वरूपाची समीक्षा. सुखान्तिकेची संकल्पना त्यांनी विस्ताराने विशद केली. सुखान्तिकेचा विचार त्यांनी नाटकाच्या संदर्भात मांडला. मानवी जीवनेच्छेचा आविष्कार आणि चैतन्यपूर्ण मानवी जीवनाच्या सातत्याची प्रतीती हे सुखात्मिकेची वैशिष्ट्ये सांगून त्यांचे

प्रकारही विशद केले. 'विनोद-तत्त्व आणि स्वरूप' (२००६) त्या ग्रंथात त्यांनी विनोदात्मक वाङ्मयाचा संकल्पनात्मक आराखडा मांडला. प्लेटो, ॲरिस्टॉटल, हॉब्ज, ऑर्थर कोस्लर, बर्गसाँ तसेच भरतमुनी ते न.चिं. केळकर या पाश्चात्य व भारतीय साहित्यशास्त्रज्ञांनी मांडलेल्या उपपत्ती आधारे त्यांनी नवा विनोदविषयक सिद्धांत मांडला. व्यंगकल्पना, अभिव्यक्तिवैशिष्ट्ये, क्रीडावृत्ती, हास्यमीमांसा व चैतन्यतत्त्वाशी संबंधीत विविध उपपत्ती मांडून विनोदाची संकल्पना मांडली. संकल्पनात्मक लेखनाबरोबरच त्यांची मराठी विनोदी वाङ्मयाची समीक्षा 'मराठी विनोद-विविध आविष्काररूपे' या ग्रंथात सामविष्ट आहे. चक्रधर, तुकारामांच्या विनोदापासून आधुनिक मराठी वाङ्मयातील विनोदी वाङ्मयाची त्यांनी मौलिक अशी समीक्षा केली. विनोदात्म वाङ्मयाचा नकाशा सांगत असताना त्यांनी विविध प्रकारच्या विनोदाची फार सरस अशी उदाहरणे या ग्रंथात ठिकठिकाणी दिली आहेत. जीवनसंबद्ध विनोदाचे स्वरूप विशद केले. मराठी तसेच एकंदर विनोदात्म लेखन करणाऱ्या लेखकांचा स्त्रियांबद्दलचा दृष्टिकोण हा अनुदारपणाची समाजमीमांसाही केली.

लीळाचरित्रातील व तुकारामांच्या जीवन संबद्ध विनोदात्म वाङ्मयाचा वारसा श्रीपाद कृष्ण कोल्हटकर व चिं.वि. जोशी यांनी चालवला. जीवनाभिमुख व मूल्यनिष्ठ विनोदाचा हा वारसा स्वातंत्र्यानंतर मात्र लोप पावल्याचे त्यांनी नमूद केले. राम नगरकरांच्या आत्मकथनाचे एकंदर जीवनदर्शन हे खेळकर, निर्मळ विनोदात्मतेच्या अंगाने केले हा विशेष आवर्जून नमूद करतात. या संदर्भात अशा प्रकारचे सर्वस्वी विनोदात्म आत्मचरित्रपर पुस्तक मराठीत तरी एकमेवच म्हणावे लागेल. हा त्यांचे निरीक्षण महत्त्वाचे ठरते. गो.मा. पवार यांनी केलेली ही विनोदी वाङ्मयाची संकल्पनात्मक मांडणी केवळ मराठीच नव्हे तर भारतीय पातळीवर देखील अपवादभूत अशी आहे. वाङ्मय संस्कृतीत विनोद वाङ्मयस्वरूपाच्या समीक्षेचा आराखडा त्यांनी नव्याने उपलब्ध करून दिला आहे. विनोद वाङ्मयातील असंख्य उदाहरणे, प्रकारभेद, त्याची समाजसंस्कृतिनिष्ठता, रूपतत्त्वे यातली खूप सूक्ष्मता त्यांच्या लेखनात आहे. रा.भा. पाटणकर (सौंदर्यमीमांसा) व सुधीर रसाळ (कविता आणि प्रतिमा) अशा तत्त्वचर्चाप्रधान ग्रंथ वाटेवरील हा महात्त्वाचा संकल्पनात्मक ग्रंथ आहे. त्यामुळेच त्यांच्या या लेखनामुळे विनोदी वाङ्मयाच्या 'काव्यशास्त्राचे नवे दालन उघडले गेले आहे.' असे डॉ. सुधीर रसाळ यांनी म्हटले ते रास्तच आहे.





एकंदरीत १९७० नंतरच्या समीक्षा परंपरेत मौलिक अशी समीक्षा प्रा. गो.मा. पवार यांनी केली. तात्त्विक आणि उपयोजित समीक्षापरंपरेची मोलाची भर त्यांच्या समीक्षेने घातली. जीवनसंबद्ध समीक्षाविचार, सामाजिक दृष्टिकोण, वाङ्मयाभिरूची संबंधीचा नवा विचार ही त्यांच्या समीक्षेची वैशिष्ट्ये होत. वाङ्मयीन परंपरेचे भान, साहित्यस्वरूपाबद्दल व्यापक भूमिका आणि सुसंगत सुस्पष्ट विचार ही त्यांच्या लेखनाची काही वैशिष्ट्ये. त्यांची विनोदी वाङ्मयाची समीक्षा ही नवीन व अपवादभूत ठरावी. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या जीवनकार्याचा वेध हा तर महाराष्ट्राच्या विचारविश्वातला महत्त्वाचा भाग ठरला. त्याच्या निधनाने एका साक्षेपी व्यासंगी समीक्षकाला, विचारवंताला महाराष्ट्र मुकला आहे.

**– रणधीर शिंदे**
भ्रमणध्वनी : ९८९०९१३०३१
randhirshinde76@gmail.com

ग्रंथाली

एक अतिशय चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व आणि संवेदनशील कलाकार असणारे विदुर महाजन गेली २५ वर्षांहून अधिक काळ माझे मित्र आहेत. संगीतज्ञ, सतारवादक, कवी, लेखक, पर्यटक अशा विविध पैलूंनी त्यांचे जीवन समृद्ध आहे! त्यांच्या कवितांमधून त्यांनी माणसांशी जोडलेली, जपलेली नाती आणि त्यांची दिलखुलास फकिरी वृत्ती यांचा वारंवार प्रत्यय येत राहतो.
**– पं. उदय भवाळकर**
(धृपद गायक)




र
'स्व'च्या शोधात...
**विदुर महाजन**

**मूल्य १०० रुपये**
**सवलतीत ६० रुपये**

अत्यंत शिस्तप्रिय, व्यासंगी, ज्येष्ठ संशोधक, विनोद बुद्धी लाभलेले, निगर्वी, स्पष्टवक्ता, उत्तम अध्यापक ही सारी गुणवैशिष्ट्ये लाभलेल्या ज्येष्ठ संशोधक व अभ्यासक डॉक्टर सु.रा.चुनेकर यांच्याविषयीच्या आठवणी सांगताहेत प्राध्यापक शिरीष गंधे...

# ऋणानुबंध

**शिरीष गंधे**

''**म**राठीचा तास तरी करूया यार! नवीन सर आले आले आहेत!'' एक आवाज. ''कोण बोललं रे? त्याची टांग! मी कट्ट्याला हात केला...'' 'निकल बे' असे सर्वांचे चेहरे! वर्गात प्रवेश केला तेव्हा तास सुरू झालेला. मागे जाऊन बसलो. प्रथम वर्षाची भाबडी मुलं धार्मिक भावनेने ऐकण्यात दंग झालेली.


उजव्या बाजूला थोडी किणकिण, मधूनच मानेला झटका! समोरचे गृहस्थ बऱ्यापैकी उंच गव्हाळ वर्णाची डोळ्यावर चाळिशीचा चष्मा, पांढरा स्वच्छ फुल शर्ट (दंडापर्यंत बाह्या दुमडलेल्या) काळी पॅन्ट एकूणच भीती वाटावी वाटावी असा करारी चेहरा असलेले सर हातात पुस्तक घेऊन त्यातल्या ओळी सावकाश वाचू लागले 'अजून यौवनात मी...' 'कोण रे हे?' शेजाऱ्याला प्रश्न केला. सरांकडे पहात त्यानं वहीवर हळूच लिहिलं, प्रा. चुनेकरसर! नवीन आलेत! तास केव्हा संपला कळले नाही. संपण्यापूर्वी त्यांनी कुणाला काही प्रश्न विचारायचे आहेत का? असे म्हटले खरे, पण कोणीच विचारले नाहीत. वर्गातून बाहेर पडताना आम्ही काही मित्रांनी सरांना घेरले, त्यांनी आत्मीयतेने प्रत्येकाची विचारपूस केली. 'सर, एक-दोन प्रश्न विचारायचे आहेत, पण अवांतर! विचारू?' – मी. सर, प्रसन्न हसत म्हणाले, ''बोला सर, दिल्या घेतल्या वचनाचे शपथ तुला आहे असे पाडगावकरांचे एक गीत आहे. त्यात 'मनामधल्या मोरपिसाची शपथ तुला आहे' अशी एक ओळ आहे हे मनातलं मोरपीस कोणतं?'' खरं तर सरांची फिरकी घेण्यासाठी घेण्यासाठी हा प्रश्न विचारला होता. सर पुन्हा प्रसन्न हसले म्हणाले, ''चला, कॅन्टीनला चहा घेऊ! चहा घेताना ते भरभरून बोलत राहिले मनातलं मोरपीस कसं, कोणतं, इथपासून काव्य, काव्यनिर्मिती, अशा कितीतरी गोष्टींवर!'' मनोमन मी माझं शिष्यत्व सरांना देऊन मोकळा झालो. ही सरांची मला झालेली पहिली ओळख! यानंतर सर आमच्या कुटुंबातलेच एक होऊन गेले.




चुनेकरसरांसोबत शिरीष गंधे व अनिता गंधे

जून ७३ पासून संगमनेर महाविद्यालयात मराठी विभाग प्रमुख म्हणून रुजू झाल्यापासून, सरांची विविध रूपं मला पहायला मिळाली. अभ्यासाची प्रचंड आणि पक्की बैठक असलेला संशोधक, कठोर शिस्तप्रिय प्राध्यापक, चोखंदळ वाचक, सहृदय माणूस, अत्यंत संकोची, दुसऱ्याला आपल्यापासून किंचितही त्रास होऊ नये, म्हणून काटेकोरपणे वर्तन करणारे सद्‌गृहस्थ! अशी अनेक रूपे न विसरता येण्याजोगी आहेत. संकोची स्वभावाचे हे एक उदाहरण पक्के लक्षात राहिले आहे, साहित्य परिषदेच्या संगमनेर शाखेने माधव जुलियन यांची पुण्यतिथी साजरी करण्याचे ठरविले. माझे वडील श्रीकृष्ण गंधे तेव्हा संगमनेर शाखेचे कार्यवाह होते. त्यांनी व्याख्यान द्यावे असे ठरले. पण संदर्भ ग्रंथांची अडचण निर्माण झाली, तेव्हा चुनेकर सरांनी विविध ग्रंथांची नावे सांगितली आणि शेवटी म्हणाले चुनेकरांचे एक पुस्तक आहे, बघा काही उपयोग होईल तर! मी आणि वडील दोघेही बघतच राहिलो. ही घटना घडली तेव्हा सरांच्या नावावर तीन प्रबंध आणि आठ-नऊ पुस्तके प्रसिद्ध झालेली होती. सूची शास्त्र हा सरांचा अत्यंत आवडीचा आणि अभ्यास चिंतनाचा विषय. त्यांचे या विषयावरील प्रभुत्व वादातीत! एस.वाय.बी.ए.ला खंड काव्याचा एक पेपर त्यांनी आम्हाला शिकविला. 'कमला', 'सुधारक', 'शशीमोहन' इत्यादी खंडकाव्ये अभ्यासक्रमात लावली होती. विलक्षण तयारीने सरांनी आम्हाला हा पेपर शिकविला यादरम्यानची एक घटना कायमची मनावर कोरली गेलेली आहे. एकदा एका तासाला त्यांनी वर्गात प्रश्न केला, ''श्रेयस आणि प्रेयस यात फरक काय?'' वर्ग शांत. कुणीही उत्तर देत नाही असं पाहून ते म्हणाले, बीएच्या दुसऱ्या वर्षात तेही मराठी विषय विशेष स्तरावर घेतलेल्यांना हे जर सांगता येणार नसेल, तर मला शिकवणे अशक्य आहे. एवढं बोलून ते निघूनही गेले. त्यांचा आमच्यावरचा हा अनुराग काढायला चार-पाच दिवस लागले. शब्दांचा, शब्दांच्या अर्थाचा, अचूक भान असणारे सर, ''लेखनात साधी वाक्य लिहा. अनलंकृत

लिहा.'' असं कळकळीने सांगत असत. एकदा ज्ञानेश्वरी वरील एका लेखाबद्दल आमची चर्चा चाललेली होती. मी काही बोजड शब्द वापरले होते. त्याचा त्यांनी अर्थ विचारला. तेव्हा मला सांगता आला नाही. मग, ''अर्थविण पोथी काय कामाची? शब्दांचे अर्थ आधी माहीत करून करून घ्या आणि योग्य ठिकाणी त्यांचा वापर करा.'' असे अगदी जिव्हाळ्याने त्यांनी मला समजावले. शब्दकोश, व्युत्पत्ती कोश, कसे पाहायचे हे त्यांनी ग्रंथालयात नेऊन आम्हाला समजावून दिले. इतकेच काय परंतु एखादे पुस्तक हातात कसे धरायचे हेही त्यांनी प्रात्यक्षिकासहित आम्हास शिकविले. सर तेव्हा कॉलेजसमोर प्रज्ञा सोसायटीत 'ऋणानुबंध' या प्राचार्य कौंडिण्यसरांच्या बंगल्यात राहत असत. एक पलंग, लेखनासाठी टेबल-खुर्ची तेवढा भाग सोडला, तर सर्वत्र पुस्तकांचे अधिराज्य. अतिशय सुव्यवस्थित कव्हर्स लावलेली ती पुस्तके! हा आम्हा विद्यार्थ्यांच्या आकर्षणाचा आणि कुतूहलाचा विषय होता. अर्थात लेखन-वाचनाची शिस्त असते, वाचावे कसे आणि काय? हे तेव्हा सरांमुळेच कळले. साहित्य परिषदेच्या संगमनेर शाखेचे अध्यक्ष म्हणून काम करताना अनेक उपक्रम सरांनी राबवले. प्राध्यापक रंगनाथ पठारे सरांचं काव्यवाचन असोत किंवा दया पवारांचं असो, कवी अनिल यांचे काव्य विश्वातील अनुभव असो वा डॉक्टर विद्याधर पुंडलिकांचे कथानुभव! या साऱ्या उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील माझ्यासारख्या अनेक विद्यार्थ्यांच्या साहित्यविषयक जाणिवा समृद्ध झाल्या. सरांचे अनेक विद्यार्थी साहित्यक्षेत्रापासून ते अनेक क्षेत्रात आपला नावलौकिक वाढवित आहेत. ज्याच्याजवळ शील आहे




व जो कर्मयोगी आहे हीच जर शिक्षकपणाची पूर्वअट असेल तर, सर हे त्याचे मूर्तिमंत उदाहरण आहेत.

व्रतस्थभावनेने सरांनी लिखाण केलेले असल्याने आणि प्रसिद्धीविन्मुख स्वभावामुळे त्यांचे लेखन अलक्षित राहिले काय? हा प्रश्न बऱ्याचदा अस्वस्थ करतो. माधव जुलियन हा सरांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय होता. तसेच सूचीशास्त्र हा देखील! या दोन्ही विषयात सरांनी खूपच मोठे काम करून ठेवले आहे. जी. ए. कुलकर्णी यांची यांची निवडक पत्रे, (या ग्रंथाचे सहसंपादक म्हणून) अंतरंग, जयवंत दळवी यांची नाटके, बा.अ. भिडे यांचे साहित्य असे विविधांगी लेखन सरांनी केलेले आहे आहे. प्रत्येक संदर्भ अत्यंत अचूक पद्धतीने त्यांनी तपासून पाहिला आहे. 'सूचींची सूची' या ग्रंथात जवळपास ३०००० नोंदी पाहावयास मिळतात.

मराठी विश्वकोश, मराठी वाङ्मयकोश यामध्ये सरांनी महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. मराठी संशोधनपत्रिकेचे ते काही काळ संपादक होते.

संगमनेर महाविद्यालयाच्या स्थापनेपासून (१९६६) दीड तप पूर्ण झाल्यानिमित्त, 'दर्शन' नावाची स्मरणिका काढायचे ठरले. महाविद्यालयाच्या वाटचालीचे सम्यक दर्शन या स्मरणिकेतून घडविण्याचे ठरले. अर्थात याची जबाबदारी सरांवर येऊन पडली आणि केवळ स्मरणिका असे स्वरूप न राहता, एक उत्कृष्ट संदर्भ ग्रंथ अशा स्वरूपात ही स्मरणिका सिद्ध झाली.

अ.का. प्रियोळकर हे सरांचे संशोधन क्षेत्रातील आदर्श होते. तर रा.श्री. जोग हे गुरुवर्य. संशोधकीय शिस्तीबद्दल सर कमालीचे आग्रही होते. वडिलांची 'बालसाहित्याचे समालोचन' आणि 'शाहीर रामजोशी' अशी दोन पुस्तके मी पाठविली असता, सरांनी उत्तरादाखल पाठविलेल्या पत्रातही हा मुद्दा मांडलेला आहे.

अगदी अलीकडे माझे नवे पुस्तक सरांना भेट देण्यासाठी मी व अनिता आणि आमचे मित्र केशव सहाणे व उज्ज्वला असे सरांकडे गेलो असता, सरांना खूप आनंद झाला. तास-दोनतास अत्यंत दिलखुलास गप्पांची मस्त मैफल जमली होती. सरांना 'कोको' फार आवडायचे.

अनिता, उज्ज्वलाने मग तिघांसाठी चहा नि सरांसाठी कोको बनविला. ज्या खुर्चीवर मी बसलो होतो, ती शांता शेळके यांनी सरांना भेट दिली होती अशी आठवणही सरांनी जागवली. याच वेळी जी.ए. कुलकर्णी यांच्या एका नव्या? (अनेकांना माहिती नसलेल्या) कलाकृतीचे आपण संपादन करत असल्याचे त्यांनी आम्हास सांगितले.

२७ एप्रिल हा सरांचा वाढदिवस. २७ एप्रिल २०१९ ला सर ८४ व्या वर्षांत पदार्पण करणार होते. तथापि नियतीच्या मनात काही वेगळेच असावे. १ एप्रिल २०१९ ला सकाळी ११.३३ वाजता पुण्याहून उज्ज्वलाचा फोन आला, तोच मुळी ही कुवार्ता सांगणारा! सर, तुम्ही आमच्यात नाहीत हे खरे नाही. लेखणी उचलून कुठलाही शब्द कागदावर उतरविताना, तुमची नजर आमच्यावर रोखली जाईल आणि त्यात किंचित का होईना, तुमच्या वाटेने चालतो आहोत हे समाधान नक्कीच असेल! तुम्ही निरोप घेताना नेहमी म्हणायचात, अच्छा...गेलो...मी...! खरंच तुम्ही गेलात?

**– शिरीष गंधे**
भ्रमणध्वनी : ९७६६२०२१४१
shirish.gandhe@gmail.com

**पार्श्वभूमी**

ह्या लेखाच्या पहिल्या भागात आपण पाहिले की जागतिकीकरणाच्या आगमनानंतर आपल्या समाजाच्या अनेक क्षेत्रांत झालेल्या परिवर्तनांपैकी लैंगिकताविषयक जाणिवा, धारणा व व्यवहार ह्यांत झालेले परिवर्तन हे अतिशय मूलभूत, पण सर्वात दुर्लक्षित परिवर्तन आहे. बदलाच्या ह्या प्रक्रियेची सुरुवात नव्वदच्या दशकात झाली व त्याचे लक्षणीय परिणाम आपल्याला एकविसाव्या शतकात जाणवू लागले. ही प्रक्रिया अजूनही संपलेली नाही. इला त्रिवेदी ह्यांच्या अध्ययनानुसार (शहरी) भारतीय समाजातील स्त्री-पुरुष नात्यात गेल्या दशकात जेवढे बदल झाले तितके गेल्या तीन हजार वर्षांतही झाले नाहीत. हा बदल शहरे व महानगरे ह्यांत अधिक तीव्रतेने जाणवत असला तरी त्याची पाळेमुळे सामाजिक माध्यमांतून थेट खेड्यापाड्यापर्यंत पोहचली आहेत. ही ओसरणारी लाट नाही, तर पुढे रेटणारा जबरदस्त प्रवाह आहे. एखाद्या लाजऱ्या परंतु उत्सुक नववधूप्रमाणे हा देश हळूहळू आपला कौमार्यपट्टा दूर सारीत आहे — ह्या अवतरणातील 'लाजऱ्या' शब्दाबद्दल शंका यावी इतके हे बदल वेगवान आणि आक्रमक स्वरूपाचे आहेत. नव्वदीच्या दशकापासून हे बदल अतिशय वेगाने घडले; पण त्यापूर्वी आधुनिकीकरण व शहरीकरण ह्यांच्या माध्यमातून आपल्या लैंगिकताविषयक धारणा हळूहळू बदलत होत्या, ह्यात शंका नाही. त्यांच्याकडे पाहण्याचा आपल्या समाजाचा दृष्टिकोन काय होता आणि ते टिपून, त्यांचे विश्लेषण करून समाजापुढे मांडण्याविषयी मराठी साहित्य कितपत सजग होते ह्याचा विचार आपण ह्या लेखात करणार आहोत. त्याशिवाय ह्या मन्वंतरानंतर एकविसाव्या शतकातील मराठी साहित्याची दृष्टी कशी असायला हवी, ह्याची चर्चा करताना 'मानुष'वाद ह्या संकल्पनेचा परिचय व तिचे साहित्यातील उपयोजन ह्यांचा संक्षिप्त आढावाही आपण ह्या लेखाच्या उत्तरार्धात घेणार आहोत.

**बदलती लैंगिकता आणि समाजाचा दृष्टिकोन**

एकविसाव्या शतकात लैंगिक धारणा व व्यवहार ह्यांत झपाट्याने होणारे बदल जेव्हा समाजाच्या ध्यानात येऊ लागले, तेव्हा मराठी (किंबहुना भारतीय) समाजाचा प्रतिसाद कसा होता, हे सांगण्यासाठी एक चुटका (त्याचा वास्तवात घडलेल्या प्रसंगाशी नाते असण्याची शक्यता नाकारता येत नाही) पुरेसा आहे-

डॉक्टर (अल्पवयीन गरोदर मुलीला) : हे झालं कसं?


मुलगी : माझे आई-बाबा सिनेमाला गेले होते, तेव्हा माझा बॉयफ्रेंड घरी आला .

डॉक्टर : पण तू आई-बाबांसोबत सिनेमाला का गेली नाहीस?

मुलगी : सिनेमा 'ॲडल्ट' होता.

इंग्रजीतील They caught us napping (त्यांनी आम्हाला डुलक्या घेताना पकडले), ह्या वाक्प्रचाराची येथे आठवण येते.

विसाव्या शतकाच्या शेवटच्या टप्प्यात भारतीय/ मराठी समाज इतका भाबडा/ दांभिक का होता ह्याची कारणमीमांसा करणे फारसे कठीण नाही. 'पुरुष स्पंदन' दिवाळी अंकाच्या २००८ च्या लैंगिकता विशेषांकातील संपादकीय टिपणात त्याचे विश्लेषण असे केले आहे :- साऱ्या धर्मातील पाप-पुण्याच्या संकल्पना, सदाचार-व्यभिचाराचे ठोकताळे अखेरीस योनिशुचिता व पुरुषप्रधानतेच्या पायावर उभे असतात. स्त्रीच्या लैंगिकतेविषयी अनिवार आकर्षण व त्याचबरोबर तिला नियंत्रित करण्याची (तेवढीच तीव्र) आकांक्षा ह्या पेचातून पुरुषी मानसिकता बाहेर पडण्याची चिन्हे अद्याप दिसत नाहीत. पतिव्रता विरुद्ध वेश्या, अनंतकाळची माता विरुद्ध क्षणाची पत्नी, पत्नी विरुद्ध



रेखाटन : प्रदीप म्हापसेकर

**लैंगिकतेच्या लोलकातून दिसणारा मानवी संवेदनांचा संपूर्ण पट समजून घेण्याच्या दृष्टीने मराठी साहित्यात फारसे प्रयत्न झाले नाहीत.**

# एकविसाव्या शतकातील स्त्री-पुरुष संबंध आणि नवा 'मानुष'वाद

### भाग दोन : लैंगिकता, स्त्री-पुरुष संबंध आणि मराठी साहित्य

**रवीन्द्र रुक्मिणी पंढरीनाथ**

प्रेयसी, देवी विरुद्ध दासी ही सारी द्वंद्वे त्यातूनच निर्माण होतात. इहलोकात धर्माचरण करणाऱ्या पुरुषाला परलोकात अप्सरा-परी-हूरचे आमिषही त्यासाठीच दाखविण्यात येते. देवदासी ते सेक्स- टुरिझम हा सारा प्रवासही त्यासाठीच. त्यामुळे एकीकडे कामप्रेरणेचे दमन, तर दुसरीकडे त्याची अमर्याद लालसा, असे 'वरून कीर्तन आतून तमाशा' वर्तन भारतीय पुरुषांच्या जणू अंगवळणी पडले. दांभिकता हा आपल्या जगण्याचा स्थायीभाव बनला. स्त्रीचे लैंगिक दमन, तसेच स्त्री आणि पुरुष ह्यांच्यासाठी नैतिकतेचे दुटप्पी मापदंड ह्या बाबी स्त्रियांनीही मनोमन स्वीकारल्या. पुरुषसत्ताक मूल्यव्यवस्थेच्या त्याही वाहक बनल्या.

**समृद्ध आणि निरामय परंपरा**

मुळात भारतीय उपखंडाला लैंगिकता/सेक्स ह्यांकडे पाहण्याची अतिशय वैविध्यपूर्ण व समृद्ध परंपरा लाभली आहे. इंग्रज येथे आले तेव्हा येथील समाजव्यवस्था अनेक शतकांपासून साचलेली होती, हे खरे असले तरी येथील विविध भूभाग आणि समाजगट ह्यांतील लैंगिक व्यवहारांत कमालीचे वैविध्य होते. दक्षिणेतील नायर आणि ईशान्येतील काही आदिवासींमध्ये मातृवंशीय (matrilinial) कुटुंबव्यवस्था होती. देशाच्या बऱ्याच भागांत, विशेषतः जमीनदार कुटुंबांमध्ये बहुपत्नीत्व सर्रास आढळत होते. त्याच वेळी हिमालयात वसलेल्या काही जमातींमध्ये बहुपतित्वाची रीत होती. तथाकथित उच्च जातींमध्ये स्त्रियांच्या लैंगिकतेवर घातलेली बंधने विधवाविवाहबंदी, सती आणि बाल-जरठ विवाहांसारख्या पद्धतींतून दिसत असली तरी इतर जातींमध्ये तुलनेने अधिक मोकळेपणा होता. १३-१४व्या शतकातील 'गाथा सप्तशती' ह्या अनोख्या ग्रंथात तर तत्कालीन ग्रामीण व नागर समाजातील सामाजिक व लैंगिक व्यवहारांचे, समजुतींचे, कुटुंबव्यवस्था न नाकारताही असलेल्या खुलेपणाचे अतिशय मनोज्ञ व रसाळ वर्णन केलेले आपल्याला दिसते. राजवाडेंनी सिद्ध केलेला 'भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास' हा ग्रंथ असो, की दामोदर कोसंबी व कॉ. शरद पाटील ह्यांसारख्या दिग्गजांनी लावलेला प्राचीन भारतीय इतिहासाचा मथितार्थ असो, भारतीय संस्कृती लैंगिकतेच्या सोवळ्या, परिटघडीच्या संकल्पनांपासून दूर होती, हेच त्यांच्या परिशीलनातून आपल्या ध्यानात येते. इंग्रजांनी भारतात येताना आपल्यासोबत लैंगिकतेच्या आपल्या सोवळ्या 'व्हिक्टोरियावादी' संकल्पना आणल्या, ज्यांच्यात लाकडी टेबलाचे पायदेखील कमनीय दिसतात म्हणून झाकून ठेवण्याची पद्धत होती. वासाहतिक प्रभावामुळे आपण त्यांचे अनेक बाबतीत अंधानुकरण केले आणि लैंगिकतेच्या बाबतीत आपण इंग्रजांच्या तुलनेत रानटी आहोत असा अपराधगंड उगाचच बाळगला. खरे तर कामसूत्र, खजुराहो, अभिजात तसेच लोकसाहित्य व ललितकला ह्या सर्वांतून आपल्या हाती अतिशय समृद्ध सांस्कृतिक संचित लागले होते, पण सनातनी धर्मवादी व इंग्रज - ह्या दोघांच्या प्रभावामुळे आपण आपला हा समृद्ध वारसा नाकारला. त्याची गडद छाया एकोणिसाव्या-विसाव्या शतकातील आपल्या समाजातील स्त्री-पुरुष नाते व त्यांचे चित्रण करणाऱ्या, त्याचा अन्वयार्थ उलगडणाऱ्या विविध कला यांच्यामध्ये पडलेली आपल्याला दिसते.

**आधुनिक मराठी साहित्य आणि लैंगिकता**

लैंगिकता ही मानवी अस्तित्व, संबंध व समाजरचना ह्या सर्वांच्या मुळाशी असणारी, जीवनाला अर्थपूर्ण बनविणारी, तसेच त्याची वाताहत करण्याची क्षमता असणारी आदिम प्रेरणा आहे. ती आपल्या सर्वांच्या आयुष्याला व्यापून पुन्हा दशांगुळे उरते. त्यामुळे तिची सर्जक व संहारक शक्ती, तिचे आविष्कार व मानवी जीवनावरील तिचा प्रभाव ह्यांना वगळून, व्यक्ती व समाज ह्यांविषयी केलेले कोणतेही चिंतन व चित्रण हे अपूर्ण व सदोष राहण्याचीच शक्यता आहे. असे असतानाही वर उल्लेखिलेल्या कारणांमुळे मराठी साहित्यात लैंगिकतेच्या प्रामाणिक चित्रणाची फारशी परंपरा असल्याचे दिसत नाही. मराठी साहित्यात समाजमान्य संकेतांना छेद देऊन केलेल्या लैंगिक चित्रणाचे स्वागत कसे होते ह्याचा 'अश्लीलता मार्तंड कृष्णराव मराठे ते सखाराम बाईंडरविरोधी उठलेला गदारोळ' हा इतिहास पुरेसा बोलका आहे. अर्थात, साठच्या दशकानंतर ह्या विरोधाला न जुमानता चाकोरीबाहेरच्या सामाजिक जीवनाचे वास्तववादी चित्रण करण्यास जेव्हा सुरुवात झाली, तेव्हा जयवंत दळवी, भाऊ पाध्ये, श्री.ना. पेंडसे ह्यांच्यासारख्या प्रथितयश साहित्यिकांपासून अनेक लहानमोठ्या कवी-लेखकांनी लैंगिकताविषयक निषिद्ध-संकेत बाजूला सारून लिखाण केलेले आपल्याला दिसते. त्यात 'माहीमची खाडी', 'गोलपिठा'पासून ते 'बेगम बर्वे' (सतीश आळेकर), 'ॲडम' (रत्नाकर मतकरी) आणि 'भिन्न' (कविता महाजन) ह्यांसारख्या अनुभव, आशय व अभिव्यक्तीचे विलक्षण वैविध्य असणाऱ्या अनेक कलाकृती आहेत. त्याशिवाय बारबाला, तृतीयपंथी (हिजडा), समलैंगिक ह्या नात्याने बहिष्कृत जीवन जगणाऱ्या व्यक्तींचे आत्मपर लिखाणही अलीकडे प्रकाशित होऊ लागले आहे. असे असले तरी लैंगिकतेच्या लोलकातून दिसणारा मानवी संवेदनांचा संपूर्ण वर्णपट (spectrum) समजून घेण्याच्या दृष्टीने मराठी साहित्यात फारसे प्रयत्न झाले नाहीत असेच म्हणावे लागेल. प्रकाश संतांच्या लंपनच्या भावजीवनातील स्थित्यंतरापासून पु. शि. रेगेंच्या 'सावित्री'पर्यंत, भारत सासणेंच्या कथेतील सासुरवाशिणीला 'दिसणाऱ्या' मोरापासून हेमंत गोविंद जोगळेकरांच्या 'होड्या' कवितेपर्यंत प्रेमाचे अतिशय तरल व मनोज्ञ आविष्कार मराठी साहित्यात प्रसिद्ध आहेत, पण त्याला अस्तररूप असणारी सूक्ष्म लैंगिकता ते तेंडुलकरांच्या नाटकातील अंगावर येणारी हिंसक लैंगिकता हा एकच उलगडत जाणारा पट आहे, हे भान मात्र मराठी समीक्षेत आणि साहित्यास्वादात आलेले दिसत नाही. एकीकडे नव्याने लिहिल्या जाणाऱ्या मराठी साहित्यातून उत्तम प्रेमकथा, प्रेमकविता लोप पावीत आहेत, तर दुसरीकडे आपल्या व्यक्तिगत-सामाजिक आयुष्यात दाखल झालेल्या अनेक बाबी मराठी सत्यातून अस्पष्ट राहिल्या आहेत. भाडोत्री मातृत्व (सरोगेट मदरहूड), शाळकरी मुलांमधील पोर्नोग्राफीचे व्यसन,

डान्सबारमधून होणारी पैशाची उधळपट्टी व त्यातून आसरा शोधू पाहणाऱ्या अभावग्रस्त कुटुंबातल्या मुलींची होणारी कोंडी, 'फ्रेन्डशिप'चा अर्थही ठाऊक नसणाऱ्या गावोगावच्या किशोरवयीन किंवा तरुण मुलांनी ती नाकारणाऱ्या मुलींवर केलेले हिंसक हल्ले, जातीय व धार्मिक अस्मितेला आलेले उधाण आणि त्यामुळे आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय लग्नानंतर ठिकठिकाणी घडणाऱ्या 'सैराट'च्या आवृत्त्या, धनिक वणिक बाळांच्या 'रेव्ह पार्ट्या' आणि सर्व वयोगटातील स्त्री-पुरुषांमध्ये वाढलेली उपभोगाविषयीची बुभुक्षितता - असे असंख्य विषय अजूनही मराठी साहित्याच्या परिचयाचे झालेले नाहीत. मुळात प्राचीन काळी 'पुरुषार्थ' असणारा 'काम' गेल्या दोनतीन शतकांत किंवा त्यापूर्वीच्या काळात) भारतीय माणसाचा 'रिपु' कसा बनला हा प्रश्न अनुत्तरित राहिला असतानाच गेल्या दोन-तीन दशकांत त्याने आपले समाजजीवन इतके कसे व्यापले हा नवा प्रश्न आपल्या समाजापुढे उभा ठाकला आहे. मराठीत ह्या विषयाचा गांभीर्याने अभ्यास करण्याची, त्याचे विश्लेषण व त्यावर खुली चर्चा करण्याची फारशी परंपरा नाही. र. धों. कर्वे ('समाजस्वास्थ्य') व दिवाकर मोहनी ('आजचा सुधारक') ह्यांनी आपल्या मासिकातून स्त्रियांच्या लैंगिक स्वातंत्र्याचा हिरिरीने पुरस्कार केला व भारतीय कामजीवनातील दांभिकता उघडकीस आणली. ह्याशिवाय 'अभिरुची'ने १९७८च्या दिवाळीत काढलेला 'अभिजात चावट' विशेषांक, १९९८ मध्ये तेंडुलकरांच्या संपादकत्वाखाली 'अनुभव'ने काढलेला छोटेखानी विशेषांक, 'पुरुष स्पंदन'ने २००८ व २०११ साली काढलेले दोन विशेषांक एवढाच ऐवज ह्या प्रश्नांवर आज उपलब्ध आहे.

ह्या पार्श्वभूमीवर एकविसाव्या शतकातील मराठी साहित्याने काय करायला हवे व ते कसे करता येईल ह्याचा आपण आता विचार करू या.

पहिला प्रश्न आहे दृष्टिकोनाचा. ह्या लेखाच्या पूर्वार्धात आपण ह्या विषयाकडे पाहण्याचे तीन प्रमुख विचारप्रवाह उद्धृत केले होते: पारंपरिक नैतिक, यांत्रिक न-नैतिक आणि विवेकवादी न-नैतिक. ह्यांपैकी पहिला दृष्टिकोन पुरुषसत्तावादी मूल्यांवर आधारित असल्याने ह्या साऱ्या प्रश्नाकडे ठोकळेबाज पद्धतीने पाहतो. ह्या प्रश्नाची तीव्रता व व्यामिश्रता समजून घेण्यासाठी तो निरुपयोगी आहे. दुसरा दृष्टिकोन 'बाजारकेंद्री' असल्याने तो समाजात होणारे सारे बदल स्वीकारतो. पण त्यांबद्दल मूल्यात्मक पवित्रा घेत नाही, घटिताचे विश्लेषण करून त्याची योग्यायोग्यता ठरवीत नाही. एका अर्थाने हा बाजारशरण नियतीवाद आहे. त्यामुळे त्याचाही आपल्याला फारसा उपयोग होणार नाही. विवेकवादी न-नैतिक दृष्टिकोन व्यक्तीच्या लैंगिक व्यवहाराच्या बाबतीत न्यायाधीशाची भूमिका घेत नाही. लैंगिकता आणि समाज ह्याचे नाते काय असावे, ह्याबद्दल मात्र त्याची विशिष्ट भूमिका आहे. स्त्री-पुरुष (व अन्य) ह्यांच्या नात्याबद्दल काय चूक, काय बरोबर अशी निवड करता येते, करायला हवी, असे तो मानतो. मात्र केवळ परंपरा किंवा नवता ह्या आधारावर ही निवड न करता समानता, परस्परांचा आदर, वैविध्याचा स्वीकार, शोषण, दडपण व ब्लॅकमेलिंग ह्यांना नकार, कोणाही व्यक्ती किंवा नात्याचे बाजारीकरण करण्यास नकार ह्या निकषांवर ती करावी असे हा विचार मानतो. थोडक्यात त्यामागे मूल्यविवेकाची बैठक आहे. परंपरेतून येणाऱ्या सती, देवदासी, स्त्री-पुरुष भेदभाव व नैतिकतेचे दुहेरी मापदंड ह्या गोष्टीना तो नकार देतो, त्याचप्रमाणे खाजगीकरण-उदारीकरण-जागतिकीकरणा (खा-उ-जा)ने मानवी नात्याचे बाजारीकरण केले ह्याचीही त्याला चीड आहे. खा-उ-जा ही आकाशातून पडलेली गोष्ट नाही, तर अनियंत्रित भांडवलशाहीने आपल्या स्वार्थासाठी, जगभरातील नैसर्गिक साधनांचे दोहन करता यावे, ह्यासाठी उभारलेली ही व्यवस्था आहे, साम्राज्यशाहीचा हा नवा अवतार आहे, ह्याचे भान त्याला आहे. सौंदर्यस्पर्धा असोत की पोनॉग्राफीचे जगभर विणलेले जाळे, त्यामागे नफ्याची गणिते आहेत, स्त्री आणि पुरुष हे केवळ देह आहेत व अमर्याद उपभोग हेच त्यांचे अंतिम श्रेयस व प्रेयस आहे, ह्या तत्त्वज्ञानातून ह्या व्यवस्थेचा जन्म झाला आहे, असे हा विचार मानतो. म्हणूनच जुन्या आणि नव्या सर्वच शोषकव्यवस्थांमध्ये गुदमरणारे स्त्री-पुरुष व अन्य ह्यांचे नाते नव्या शतकात तरी मुक्त व निरामय व्हावे ही त्याची आकांक्षा आहे.

ह्या दृष्टिकोनातून केले जाणारे ललित व वैचारिक लिखाण मराठीत अजून विरळ आहे. सध्या मराठी समीक्षेत जे विचारव्यूह सक्रिय आहेत, त्यांच्यापैकी केवळ 'स्त्रीवाद' ही संकल्पना वर मांडलेल्या विवेकवादी न-नैतिकतेच्या जवळ आहे. कारण ती पुरुषसत्तेने उभारलेली समग्र मूल्यव्यवस्था आणि विचारव्यूह नाकारते. लैंगिकतेकडे, विशेषतः स्त्री-लैंगिकतेकडे पाहण्याचा तिचा स्वतःचा वेगळा दृष्टिकोनही आहे. असे असले तरी स्त्रीवाद हा पुरुषसत्ता नाकारणाऱ्या स्त्रियांनी आपले अनुभव आणि आपली वैचारिकता ह्यांच्या आधाराने रचलेला विचारव्यूह आहे. पुरुषसत्तेने निर्मिलेल्या साच्यातून स्त्रियांप्रमाणे पुरुषही बाहेर पडून स्वतंत्र विचार करू शकतात, असे हा विचार मानतो. पण अशा पुरुषांसाठी स्त्रीवादाजवळ कसलाही अवकाश किंवा समज नाही. लिंगभाव व बायकीपणा/पुरुषीपणा ह्या बाबी समाजनिर्मित आहेत, हे स्त्रीवाद मानतो. पण आजूबाजूच्या पर्यावरणातून पुरुष कसा घडतो ह्याची जाण व अनुभव स्त्रियांजवळ असणे शक्य नाही. पुरुषसत्ता नाकारणाऱ्या पुरुषांजवळ मात्र हा ऐवज आहे. जगभरातून अशा स्त्री-पुरुष समता मानणाऱ्या व त्यासाठी कार्यरत असणाऱ्या पुरुषांची चळवळ आकारत आहे. त्यातून पुरुषत्त्व-अध्ययन (masculinities study) सारख्या विद्याशाखा उदयाला येत आहेत. आपल्या सुदैवाने भारतातील विविध राज्यांपैकी महाराष्ट्रात ह्याविषयी सर्वात अधिक व ठोस काम झालेले आहे. गेली २५ वर्षे चाललेल्या ह्या चळवळीतील पुरुषांचे अनुभव, अभ्यास व विश्लेषण ह्याच्या आधारावर जो एक नवा विचार आकार घेत आहे, त्याचे नाव आहे 'मानुष'वाद. 'श्री वाणी'च्या ऑक्टोबर २०१७-जानेवारी २०१८ च्या अंकातील 'सांस्कृतिक बदल व नवे पुरुषभान : एका नव्या विमर्शाची सुरुवात', तसेच 'शब्द रुची'च्या जून २०१८ च्या अंकातील 'नवे पुरुषभान:

नव्या जगासाठी नवा विचार' ह्या दोन लेखांतून ह्या संकल्पनेची सविस्तर मांडणी करण्यात आली आहे. विवेचनाच्या सोयीसाठी त्याची येथे सूत्ररूपाने पुनर्मांडणी करीत आहे.

**'मानुष'वाद काय आहे?**

पुरुषसत्ता नाकारून पुरुषपणापासून माणूसपणापर्यंत प्रामाणिकपणे वाटचाल करू इच्छितो तो 'नवा पुरुष' आणि त्याने आपले व अन्य पुरुषांचे अनुभव, त्यांचे विश्लेषण, तसेच पुरुषसत्तेच्या विरचनेसाठी उभारण्यात आलेले स्त्रीवादासारखे विचारव्यूह ह्यांच्या मदतीने स्त्री, पुरुष आणि अन्य ह्यांच्या जगण्याचा व नातेसंबंधांचा अर्थ लावण्यासाठी विकसित केलेली विचारपद्धती म्हणजे 'मानुष'वाद. इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर असा पुरुष नक्कीच होता, जो रूढ सामाजिक संकेत, परंपरा, बंधने नाकारून स्त्रीशी निरामय नाते निर्माण करण्यासाठी धडपडत होता. तो स्त्रीवर होणाऱ्या हिंसेचा, अत्याचारांचा प्रतिकार करीत त्याविषयी समाजाला जाब विचारणारा वीरपुरुष असेल ज्याबद्दल आपुलकी, जिव्हाळा वाटतो, ज्याच्या संगतीत तिला निःशंक, सुरक्षित वाटते असा तिचा सखा, मित्र असेल. प्रत्येक काळात तो असला तरी प्रत्येक काळात तो 'नवा' होता. त्याच्याविषयी काही सार्वकालिक निकष मात्र निश्चितच ठरवता येतील उदा.;

- पुरुषसत्तेने घालून दिलेले, स्त्री-पुरुष विषमतेला पुष्टी देणारे त्या-त्या काळाचे रूढ सामाजिक संकेत, परंपरा, बंधने ह्यांचा विचार व कृतीच्या पातळीवर विरोध करणे
- स्त्रीला भोगदासी किंवा मालमत्ता न समजता तिला मानव समजून तिच्याशी तसा व्यवहार करणे
- स्त्रीच्या अडचणींचा पुरुष म्हणून फायदा न उचलता आपुलकी, स्नेह किंवा प्रेमाच्या भावनेने तिच्या पाठीशी उभे राहणे

स्त्रीवर होणाऱ्या हिंसेचा विरोध करीत अत्याचाऱ्यांना जाब विचारणे

'नवा पुरुष' व तो उभारू पाहत आलेला 'मानुष'वाद ह्या संकल्पना एकीकडे ह्या विषयावरील वैश्विक विमर्शाशी नाते सांगतात, तर दुसरीकडे त्या भारतातील स्त्रीमुक्ती चळवळ व गांधी-फुले-आंबेडकर व अन्य सामाजिक सुधारकांच्या वैचारिक वारशाशी आपले नाते जोडतात.

**'मानुष'वाद व स्त्रीवाद :** नवा पुरुष मांडू पाहत असलेला मानुषवाद हा स्त्रीवादाच्या विरोधी नसून त्याला पूरक आहे. दोघांचा वैचारिक आधार व गंतव्यस्थान एकच आहे, पण दोघांची अनुभूती व अनुभव वेगवेगळे असल्यामुळे दोघांचे मुक्तीचे मार्ग समांतर पण भिन्न आहेत. दोघांनाही पुरुष सत्तेने त्यांच्यासाठी बनविलेले ठाशीव साचे मोडून हिंसा, शोषण व सत्तास्पर्धा ह्यांवर आधारित सामाजिक-राजकीय रचना मोडून सहकार्य, आपुलकी, सामिलकी व सहभागिता ह्यांवर आधारित व्यवस्था निर्माण करायची आहे.

**मराठी साहित्यातील नवा पुरुष :** महाराष्ट्राच्या सामाजिक सांस्कृतिक इतिहासाशी ह्या 'नव्या पुरुषा'चे जवळचे नाते आहे. महाराष्ट्राचा लाडका देव- विठोबा - हा बलवान, वरदनायक (म्हणजेच कर्तबगार), रिपुदमनकारी पुरुषाच्या प्रतिमेत न बसणारा कुटुंबवत्सल, लेकुरवाळा असा आहे. खरे तर ती मायाळू, प्रेमाने वश होणारी अशी 'विठूमाऊली' आहे; जणू 'स्त्री-गुणांनी' परिपूर्ण 'नव्या पुरुषा'ची दैवी आवृत्ती ! ह्याच वैचारिक-सांस्कृतिक मुशीतून साने गुरुजी व एस्. एम्. जोशी ह्यांच्यासारखे मातृहृदयी पुरुष निर्माण झाले, तसेच फुले-शाहू-आंबेडकर-कर्वे-आगरकर-विठ्ठल रामजी शिंदे ह्यांच्यासारखे कर्ते सुधारकही.

अनेक शतकांच्या ह्या संचिताचे प्रतिबिंब मराठी साहित्यात नक्कीच पडले आहे. अनेक स्त्री- आत्मचरित्रांतून पित्याने त्यांच्या जडणघडणीत कसा मोलाचा वाटा उचलला ह्याचे कृतज्ञतापूर्ण स्मरण येते. काळाच्या बऱ्याच पुढचे लिखाण करणाऱ्या गौरी देशपांडेंच्या कादंबऱ्यांतून नव्या पुरुषाचे मनोज्ञ चित्रण आपल्याला पहावयास मिळते. त्यांच्या नायिकांचा जोडीदार हा संवेदनशील, स्त्रीचे मानसिक गुंते समजावून घेऊन तिच्या पाठीशी ठामपणे उभा राहणारा व एकूणच स्त्री-पुरुष नात्याकडे खुलेपणाने पाहणारा पुरुष आहे. त्यांच्या कादंबऱ्यातील कुटुंबेही देश-धर्म इ. बंधने न मानणारी आहेत. दिनानाथ मनोहर व मिलिंद बोकील ह्यांच्या कथा-कादंबऱ्यांतील बरेच पुरुष स्त्रीविषयक मालकीहक्काच्या भावनेतून मुक्त झालेले व नात्यातील खुला अवकाश जपणारे दिसतात. नारायण कुलकर्णी कवठेकर हे कवी आपल्या नुकतेच बोलू लागलेल्या मुलीला लवकरच 'ब्र' उच्चारता येईल अशी आस लावून आहेत, तर किरण येले, बाईच्या भूमिकेत शिरून 'बाईच्या कविता' रचण्याची हिंमत दाखवीत आहेत. हेमंत गोविंद जोगळेकर हा कवी कित्येक वर्षे आपल्या पर्यावरणातून आधुनिक मूल्ये वेचून ती आत्मसात करणाऱ्या, त्यासाठी स्वतःशी संघर्ष करणाऱ्या पुरुषाची कविता लिहीत आहेत. संजय पवार हे आपल्या ललित आणि वैचारिक लेखनातून स्वतःच्या मनात खोल दडलेल्या पुरुषावरील शेंदूर खरवडून आपल्या अंतर्मनाची झाडाझडती घेताना आपल्याला दिसतात. विसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत मराठीत असे बरेच लिखाण झाले आहे, ज्यातून आपल्याला 'पुरुषी' पानापासून 'माणूसपाना'कडे वाटचाल करणाऱ्या नव्या पुरुषाची पदचिन्हे सापडू शकतात. ह्या साहित्याच्या सामाजिक मूल्याचे अर्थनिर्णयन अद्याप झाले नाही. ते होण्यासाठी मानुषवाद मोलाची कामगिरी बजावू शकेल.

**एकविसावे शतक व 'मानुष'वाद :** सामाजिक शास्त्रांनी व मराठी समीक्षेने ह्या महत्वाच्या समाजशास्त्रीय घडामोडीकडे व त्याच्या साहित्यात पडलेल्या प्रतिबिबाकडे आजवर दुर्लक्ष केलेले आहे परंतु नवा 'मानुष'वाद ह्या संकल्पनेची योग्य रीतीने व्याख्या, विस्तार व उपयोजन केल्यास त्यामुळे गतकाळातील तसेच समकालीन घटिते व साहित्य ह्यांच्याकडे पाहण्याची एक मर्मदृष्टी आपल्याला प्राप्त होऊ शकते. एकविसाव्या शतकात भारतीय समाजात लैंगिकतेला आलेले उधाण ह्या समाजशास्त्रीय-मानसशास्त्रीय घटिताकडे पाहण्यासाठी व त्याचा अर्थ लावण्यासाठी आवश्यक विवेकवादी न-नैतिकता ह्या संकल्पनेपासून आपल्याला मिळू शकेल. ह्याची मोजकी उदाहरणे पुढीलप्रमाणे :

एकविसाव्या शतकात लिहिते झालेले नव्या पिढीतील अनेक लेखक, उदा.: प्रतिक पुरी (वाफाळलेले दिवस), श्रीरंजन आवटे

(सिंगल मिंगल), त्यांच्या पिढीच्या लैंगिक जीवनाविषयी, त्यातील चकवे, आभास व खाचखळगे ह्यांसह सर्व पैलूंबद्दल अतिशय गांभीर्याने व प्रामाणिकपणाने लिहित आहेत. संजीव चांदोरकर हे अर्थतज्ज्ञ पॉर्नोग्राफिक लिखाणाकडे न-नैतिक दृष्टीने पाहताना त्यामागील आंतरराष्ट्रीय भांडवल, सेक्स टुरिझम, मानवी वाहतूक अशा अनेक पदरांची उकल करून भांडवली व्यवस्थेचा सांस्कृतिक बुरखा फाडताना दिसतात. देवकुमार अहिरे व त्यांच्यासारखे नव्या दमाचे सामजिक वैज्ञानिक जातिव्यवस्था व पुरुषसत्ता ह्यांच्या व्यामिश्र नात्यांचे अनेक पैलू वर्गजाती, स्त्रीदास्य अंताच्या अंगाने उलगडून दाखवत आहेत. श्याम पाखरे हे इतिहास, लिंगभाव व लैंगिकता ह्यांचे आंतरिक नाते शोधतात, तर आनंद पवार, मिलिंद चव्हाण ह्यांसारखे कार्यकर्ते शेकडो पुरुषांसोबत काम करण्याचा आपला अनुभव पुरुषत्व व लिंगभाव ह्या संकल्पनांच्या स्पष्टतेसाठी वापरतात. 'नवा पुरुष'ही फार दूरची बाब नाही. आजच्या कवीच्या अंतर्मनात अगदी खोलवर त्याची पाळेमुळे पसरली आहेत ह्याचा आश्वासक दिलासा अनेक कवींच्या कवितांमधून आपल्याला मिळतो. हेमंत जोगळेकर ह्या मागच्या पिढीच्या 'मानुष'वादी कवींसोबत भगवान निळे, उत्पल व. ब. असे वेगळ्या वयाचे-जाणिवेचे कवीही 'नव्या पुरुषा'ची कविता नव्या दमाने लिहीत आहेत.

काळासोबत अनेक संदर्भ बदलतात, तसेच जीवनही. परंतु, स्त्री-पुरुष व अन्य ह्यांनी परस्परांसोबत प्रेम, आदर व जिव्हाळ्याने राहावे, शोषण व नियंत्रण ह्यांपासून मुक्त, निरामय जीवन जगावे ही आस कोणत्याही शतकात कायमच राहील. एकविसाव्या शतकाने सोबत आणलेले लैंगिकतेच्या उधाणाचे, नातेसंबंधांच्या बाजारीकरणाचे व क्षणभंगुरतेचे वादळ पचवून अखेरीस ह्याच दिशेने त्यांची वाटचाल होत राहावी, आतापर्यंत दृष्टीआड असणारा 'नवा पुरुष' समाज आणि साहित्य ह्यांच्या दृष्टिक्षेपात यावा व तो इतका व्यापक व्हावा की त्याचे 'नवे'पण सार्वजनिक होऊन जावे असेच कोणाही संवेदनशील स्त्री-पुरुषाला वाटेल. ही आशा जागवणाऱ्या, आजच्या पिढीतील महत्त्वाचे कवी सुदाम राठोड ह्यांनी आपल्या पत्नीवर केलेल्या कवितेतील हा अंश-

*मी तसा कफल्लक माणूस*
*कवितेशिवाय काहीच साठवून ठेवलं नाही*
*आणि आज तुला देण्यासारखा माझ्याकडे शब्दांशिवाय अलंकार नाही*
*पण हा चंद्र तुझ्याकडे गहाण ठेव तोपर्यंत मी भाकरीची तजवीज करतो*
*कधी आईची आठवण आली तर आई समजून माझ्या कुशीत शिर*
*कधी चुकलो माकलो तर मुलगा समजून मला कुशीत घे*
*आपण एकमेकांसाठी एकमेकांचं माहेर होऊ.*

**- रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ**
भ्रमणध्वनी : ९८३३३४६५३४
ravindrarp@gmail.com


**अक्षरनाद** प्रस्तुत

**'असा जोगिया रंगे'**



कविश्रेष्ठ **ग.दि.माडगूळकर**
जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या कविता व गीतांचा
अर्थवाही अक्षरनाद अनुभवा

**'शाश्वताचा सारथी'**



'ज्ञानपीठ' विजेते कविश्रेष्ठ **विंदा करंदीकर**
कविता, गीतं, समीक्षा, आठवणी
असा वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम

लेखन, कविता व गीतांची निवड आणि रसास्वाद, कविता वाचन व सादरीकरण
कवयित्री **मधुवंती सप्रे** आणि गायकवृंद

**ठाणे, कल्याण, पुणे, कराड, मुं.म.साहित्य संघ व विलेपार्ले मुंबई येथील रसिकांनी गौरवलेले कार्यक्रम**

**संपर्क ९८२११७५३४९**

**मराठी विज्ञान परिषदेने 'शनिवारी... विज्ञानवारी' हा प्रकल्प हाती घेतला आणि शाळांमधल्या मुलांना विज्ञानाची गोडी लागली.**

# अनोखी 'विज्ञानवारी'

**हेमंत लागवणकर**

विज्ञान सर्वव्यापी आहे. आपल्या दैनंदिन जीवनातसुद्धा विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा वापर अनिवार्य आहे. जीवनाचा अविभाज्य भाग असलेलं विज्ञान आपण जर समजून घेतलं नाही तर काय घोळ होतात, याचे आपण साक्षीदार आहोत. दूध पिणाऱ्या गणपतीने मोठी खळबळ उडवून दिल्याचं आपल्या सगळ्यांच्या स्मरणात असेल. थोडक्यात, विज्ञान समजून घेणं हे वैज्ञानिक प्रगतीइतकंच महत्त्वाचं आहे. विज्ञानाची ही जाण निर्माण व्हावी यासाठी अनेक स्तरांवर मराठी विज्ञान परिषदेतर्फे अनेक कार्यक्रमांचं, उपक्रमांचं आयोजन गेल्या पाच दशकांपासून सातत्याने केलं जात आहे.

प्रयोगांच्या माध्यमातून चांगल्या प्रकारे विज्ञान समजून घेता येतं आणि अशा प्रकारे केलेला विज्ञानाचा अभ्यास विद्यार्थ्याला एक वेगळाच आनंद देतो. दुर्दैवाने प्रत्यक्ष प्रयोग करून विज्ञान समजून घेणं ही गोष्ट आपल्याकडे अभावानेच आढळते.

विद्यार्थ्यांनी प्रयोग करावेत, निरीक्षणे घ्यावीत आणि त्यांच्या विश्लेषणातून वैज्ञानिक संकल्पना समजून घ्यावी या उद्देशाने 'शनिवारी... विज्ञानवारी' या नावीन्यपूर्ण प्रकल्पाची आखणी करण्यात आली. २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात या प्रकल्पाची यशस्विता तपासण्यासाठी नाशिक इथे एक पथदर्शी प्रकल्प (Pilot project) घेतला गेला.

प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात महाविद्यालयात शिकणाऱ्या ३० विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना प्रशिक्षण दिलं गेलं. या प्रशिक्षण कार्यशाळेत प्रयोग करण्यासाठी आवश्यक असलेलं साहित्य आणि हस्तपुस्तिका देण्यात आली. दोन दिवसांच्या प्रशिक्षण कार्यशाळेमध्ये प्रयोग करण्यासाठी आवश्यक ती साहित्याची जुळणी प्रशिक्षणार्थींकडून प्रत्यक्ष करून घेण्यात आली. त्याचबरोबर त्यांना शाळेतल्या कृतिसत्रांमध्ये विचारात घेण्यात आलेल्या विविध वैज्ञानिक संकल्पना स्पष्ट करून दिल्या गेल्या. या संकल्पना शालेय विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत कशा सांगता येतील, विषयाची मांडणी रंजकतेने कशी करता येईल याचंही मार्गदर्शन प्रशिक्षणार्थींना करण्यात आलं.



प्रशिक्षणानंतरच्या प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात या प्रशिक्षित महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी नाशिक महानगरपालिकेच्या शाळांमधून ऑगस्ट २०१६ ते फेब्रुवारी २०१७ या कालावधीत प्रत्यक्ष कृतिसत्रे घेतली.

कृतिसत्रं घेण्यासाठी दोन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना त्यांच्या सोयीची एक शाळा नेमून दिली जाते. या शाळेत दर आठवड्याला शनिवारी जाऊन साधारणपणे दीड ते दोन तास एखाद्या घटकावर कृतिसत्रं घेणं अपेक्षित असतं. प्रत्येक शाळेत विज्ञानातल्या वेगवेगळ्या घटकांवर आधारित अशी दहा कृतिसत्रं घेतली जातात. या प्रत्येक कृतिसत्रामधून शालेय विद्यार्थ्यांना एखादी वैज्ञानिक संकल्पना प्रयोगांच्या माध्यमातून स्पष्ट करून दिली जाते. विशेष म्हणजे, यातले बरेचसे प्रयोग शालेय विद्यार्थी स्वत: करून पाहतात. ही कृतिसत्रं दर शनिवारी घेतली जातात; म्हणूनच या उपक्रमाचं नाव 'शनिवारी विज्ञानवारी' असं ठेवण्यात आलं आहे. कृतिसत्रांमधून कोणते घटक घ्यायचे, त्यामध्ये कोणते प्रयोग करायचे, ते कशा प्रकारे सादर करायचे या सगळ्या बाबींचं प्रशिक्षण महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना कार्यशाळेतून दिलं जातं.

नाशिक महानगरपालिकेच्या ज्या शाळांमध्ये हा प्रकल्प राबवला गेला, त्या शाळेतील शिक्षक आणि मुख्याध्यापक यांचं या प्रकल्पाविषयी अतिशय चांगलं मत होतं. आमच्या शाळेतल्या विद्यार्थ्यांना पुस्तकाबाहेरचे ज्ञान प्रयोगाच्या माध्यमातून मिळत आहे, ही खूप चांगली बाब असल्याचे मत त्यांनी व्यक्त केलं. या विद्यार्थ्यांच्या घरची परिस्थिती शिक्षणाला पूरक आणि पोषक नाही. पण अशा प्रकारच्या कृतिसत्रांमुळे विद्यार्थ्यांना ज्ञान तर मिळेलच पण या विद्यार्थ्यांच्या अंगभूत कौशल्याला वाव मिळेल, असंही येथील मुख्याध्यापकांनी सांगितले. शालेय विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोग करून बघायला मिळाल्याने तेसुद्धा या उपक्रमाला उत्तम प्रतिसाद देत होते.

एकंदरीत, 'शनिवारी... विज्ञानवारी' हा उपक्रम मविपच्या विभागांच्या मदतीने महाराष्ट्रात इतरत्रही यशस्वीपणे राबवला जाऊ शकतो, असा विश्वास या पथदर्शी प्रकल्पातून निर्माण झाला. त्यामुळे २०१७-१८





या शैक्षणिक वर्षात नंदुरबार आणि मुंबई इथेही हा उपक्रम राबवण्यात आला. नंदुरबारमधल्या दहा शाळांमधून आणि मुंबईतल्या २५ शाळांमधून हा उपक्रम घेण्यात आला. नाशिक-मध्येसुद्धा विज्ञानवारीच्या प्रकल्पाने जोर धरला आणि दुसऱ्या वर्षी हा प्रकल्प नाशिक महानगरपालिकेच्या १५ शाळांमधून राबवण्यात आला. त्यासाठी 'मराठी विज्ञान परिषदे'च्या नाशिक विभागाने २६ नवीन विद्यार्थ्यांना प्रशिक्षण आणि प्रयोग साहित्य दिलं. विशेष म्हणजे, शाळांमध्ये होणाऱ्या कृतिसत्रांची पहाणी करण्याचं काम, आधीच्या वर्षी सहभागी असलेल्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपैकी सहा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मदतीने केलं गेलं. अशा रीतीने दुसऱ्या वर्षात 'विज्ञानवारी' उपक्रम ११० महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मदतीने तीन ठिकाणच्या एकूण ५० शाळांमधून घेण्यात आला.

२०१८-१९ या नुकत्याच संपलेल्या शैक्षणिक वर्षात 'शनिवारी विज्ञानवारी' प्रकल्पाची व्याप्ती आणखी वाढवण्यात आली. यावर्षी हा प्रकल्प मुंबई, नाशिक, नंदुरबार, देवळा (जि. नाशिक), धुळे, जळगाव, अमरावती, गडहिंग्लज, बिद्री, पंढरपूर, सोलापूर या महाराष्ट्रातल्या अकरा ठिकाणी आणि कर्नाटकातल्या निपाणी इथे राबवण्यात आला. त्यसाठी मुंबई, धुळे आणि सोलापूर इथे उपक्रमात सहभागी होण्यास इच्छुक असलेल्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा घेतल्या गेल्या. एकूण १४३ शाळांमधल्या १६६ वर्गांमधून २५० महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मदतीने प्रयोगांची कृतिसत्रं घेण्यात आली.

या उपक्रमाला शालेय विद्यार्थ्यांचा जसा चांगला प्रतिसाद मिळतो आहे, तसाच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचाही खूप चांगला प्रतिसाद मिळतो आहे. ''या प्रकल्पाचं प्रशिक्षण घेताना आणि शाळांमधून जाऊन कृतिसत्रे घेताना विज्ञानातील अनेक संकल्पना आम्हांला स्वत:ला स्पष्ट झाल्या, अधिक चांगल्या प्रकारे समजल्या. कृतिसत्रांमधून आम्ही सादर करत असलेले प्रयोग आम्ही यापूर्वी केले नव्हते, किंवा पाहिले नव्हते, पण या उपक्रमात सहभागी झाल्याने आम्हाला ते करता आले आणि शालेय विद्यार्थ्यांना करून दाखवता आले, त्यांच्याकडून करून घेता आले. कोणतीही काम करण्याआधी नियोजन आणि तयारी करावी लागते, ही गोष्ट प्रकल्प करत असताना जाणवली. कृतिसत्रे घेण्यापूर्वी त्या सत्राचे नियोजन आणि तयारी कशी करायची हे आता आम्ही शिकलो आहोत. आमचा सभाधीटपणा वाढला आहे. आता आम्ही अधिक आत्मविश्वासाने समोरच्या समुदायाला कोणतीही गोष्ट सांगू शकतो. आम्ही ज्या शाळेत जातो त्या शाळेतली मुलं शनिवारची आणि आम्ही येण्याची वाट बघत असतात. ही मुलं त्यांच्या शिक्षकांशी जेवढं बोलतात, त्यापेक्षा कितीतरी जास्त पटींनी आमच्याशी बोलतात, आम्हाला प्रश्न विचारतात. त्यामुळे आम्हाला हे काम करताना समाधान मिळतं,'' असं मत महाविद्यालयीन विद्यार्थी व्यक्त करतात.

या उपक्रमाचं एक महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे कृतिसत्रांमधून दाखवलेले बहुतेक सगळे प्रयोग हे आपल्या घरी सहज उपलब्ध होणाऱ्या साहित्याचा वापर करून केले जातात. या प्रयोगांसाठी प्रयोगशाळेत असतात तशी साधनं, उपकरणं वापरली जात नाहीत. सहज उपलब्ध होणाऱ्या टाकाऊ वस्तूंचा वापर करून विज्ञानातल्या अनेक अमूर्त संकल्पना सहजपणे उलगडून दाखवता येतात, याची प्रत्यक्ष अनुभूती विद्यार्थी घेतात. याचा सकारात्मक परिणाम यंदा या उपक्रमादरम्यान केलेल्या सर्वेक्षणातून आढळला आहे. ६० टक्क्यांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी कृतिसत्रामध्ये दाखवलेले प्रयोग घरी करून बघितले आहेत. अनेक विद्यार्थ्यांनी सहज उपलब्ध असलेलं साहित्य एकत्र करून आपली स्वत:ची प्रयोगपेटी तयार केली आहे.

प्रत्यक्ष प्रयोग फारसे केले जात नसल्याने विज्ञानात असलेले प्रयोग फसतात, ते आपल्याला जमत नाहीत अशी एक भीती विद्यार्थ्यांच्याच नव्हे तर शिक्षकांच्याही मनात असते. प्रयोगांबद्दलची ही भीती दूर करून प्रयोगांच्याच माध्यमातून विज्ञानाची गोडी लावण्याचा हा 'शनिवारी विज्ञानवारी' उपक्रमाचा प्रयत्न बऱ्याच अंशी सफल होतो आहे, असं या उपक्रमाच्या वाढत्या मागणीवरून दिसतं आहे. केवळ मराठी विज्ञान परिषदेचे इतर विभागच नव्हे; तर इतर शैक्षणिक संस्थांकडून हा उपक्रम राबवण्याविषयी मोठ्या संख्येने विचारणा होत आहे. आत्तापर्यंत हा उपक्रम एकूण २२५ शाळांमधून राबवण्यात आला आणि त्याचा फायदा ९५०० पेक्षा जास्त शालेय विद्यार्थ्यांना झाला आहे. येत्या काळात या उपक्रमाची व्याप्ती आणखी वाढवण्याचा मराठी विज्ञान परिषदेचा प्रयत्न आहे आणि त्यासाठी शाळा, महाविद्यालयं, शैक्षणिक संस्था यांच्या सक्रिय सहकार्याची अपेक्षा आहे.

**– हेमंत लागवणकर**
भ्रमणध्वनी : ९८२०१३८७५१
hemantlagvankar@gmail.com

'नेमेचि येतो पावसाळा' या उक्तीला धरून शाळांना सुट्टी लागताच 'नेमेचि येतात नाट्यशिबिरे' असं म्हटलं तर वावगं ठरू नये. दिवाळी आणि मे महिन्याच्या उन्हाळी सुट्टीत आपल्या पाल्याचा व्यक्तिमत्त्व विकास करण्यासाठी पालकांची धडपड सुरू होते. वर्तमानपत्रातील जाहिराती आणि शाळेच्या आसपास लावलेले फलक यातून वेगवेगळ्या शिबिरांबद्दल माहिती गोळा केली जाते. आपला चुणचुणीत, स्मार्ट, बोलघेवडा चिरंजीव किंवा कन्या नाटक, चित्रपट, शॉर्ट फिल्म किंवा मालिकांमध्ये नक्की नाव कमवू शकेल असा आत्मविश्वास आईवडिलांना असतो. त्याला झटपट संधी मिळावी म्हणून ही नाट्यशिबिरे निश्चित फायद्याची ठरतील याची त्यांना खात्री करून दिली जाते. कारण शिबिरादरम्यान येणारा मार्गदर्शक एखाद्या मालिकेत चमकलेला लोकप्रिय चेहरा असतो. आठ ते पंधरा दिवसाच्या कालावधीत शिबिरार्थी मुलांकडून एखादे धमाल बालनाट्य बसवून घेतले जाते. तमाम मुलांच्या पालकांना प्रत्येकी दहा ते वीस तिकिटे विकण्याची जबाबदारी दिली जाते. दोन-तीन शहरातील नाट्यगृहात प्रयोग केले जातात आणि पुन्हा शाळा सुरू होण्याची वेळ येऊन ठेपते.

नाट्यशिबिरांची व्याप्ती ही एवढी संकुचित असावी का? आपल्या मुलाला एखाद्या मालिकेत तरी अभिनयाची संधी मिळून तो प्रसिद्ध व्हावा एवढाच हेतू पालकांच्या मनात असावा का? असे अनेक प्रश्न या नाट्यशिबिरांच्या निमित्ताने मनात येत होते. यातूनच 'थिएटर कोलाज' या उपक्रमाचा जन्म झाला. नाट्याभिनय हा शिकवून येत नाही, ती कला उपजत असावी लागते असा एक प्रचलित समज आहे. अभिनय करायला प्रशिक्षणाची काय गरज? असा काही प्रस्थापित कलावंताचा प्रश्न असतो, पण रंगभूमीवरील अभिनय ही एक गांभीर्याने करण्याची गोष्ट आहे. अभिनयाचं प्रशिक्षण घेणं म्हणजे सर्वप्रथम जबाबदारी घेण्याचं मूल्य अंगी बाणवणं आहे. या प्रशिक्षणादरम्यान भरतमुनींपासून चालत आलेल्या गौरवशाली नाट्यसंस्कृतीचा अभ्यास करणं, देश-विदेशातील नाट्यचळवळींचा इतिहास जाणून घेणं, भारतीय नाट्यकलेचं स्थान समजून घेणं या गोष्टी समाविष्ट असतात. नाटकाची कला ही इतर कलांसारखीच साधना करून साध्य होणारी आहे ती आठ दिवसांच्या शिबिरातून कशी येणार? नाटकाचा अभ्यास करताना मुलांची केवळ पाठांतरक्षमता वाढीस लागत नाही तर इतरांशी समन्वय साधणे, संवाद कौशल्य, नेतृत्वगुण, आवाजावरील नियंत्रण, सभाधीटपणा यासारख्या अनेक गुणांचा परिपोष होत असतो. दुर्दैवाने आपल्या शालेय अभ्यासक्रमात संगीत, चित्रकला यांचा समावेश ग्रेड देण्यापुरता का होईना, केलेला आहे. नाट्यप्रशिक्षणाचा मात्र अजिबात विचार केला गेलेला नाही. शाळेच्या स्नेहसंमेलनात नाट्यछटा किंवा नाट्यप्रवेशांपेक्षा रेकॉर्डडान्सवर अधिक भर दिलेला असतो. त्यामुळे शालेय अभ्यासक्रमाला समांतर असा नाट्यप्रशिक्षणाचा अभ्यासक्रम 'थिएटर कोलाज'साठी तयार केला गेला. हा अभ्यासक्रम जुलै ते एप्रिल असा एका शैक्षणिक वर्षाच्या कालावधीचा आहे. आठवड्यातून एक दिवस विद्यार्थ्यांनी यासाठी द्यायचा. या अभ्यासक्रमात अभिनयाच्या बरोबरीने नाटकाच्या इतर घटकांची मुलांना ओळख व्हावी म्हणून लेखन, नेपथ्य, रंगभूषा, वेशभूषा यांच्याबद्दल माहिती दिली जावी याची काळजी घेतली. सध्या बहुतांश मुलं इंग्रजी माध्यमात शिक्षण घेतात. मराठी बालसाहित्य, कथा, कविता, लेख व ते लिहिणारे लेखक यांचा परिचय त्यांना नसतो. या अभ्यासक्रमाला येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला आठवड्यातून एक पुस्तक वाचायला देण्यात येते. विद्यार्थ्याच्या पालकांनी त्याच्यासोबत ते पुस्तक वाचावे अशी अपेक्षा असते. या वाचनाचा परिणाम अभिनयाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत होताना दिसून येतोय ही समाधानाची बाब आहे. विद्यार्थी वाचनात रमत आहेत याची खात्री झाली आणि 'थिएटर कोलाज'तर्फे माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम यांच्या वाढदिवसानिमित्त 'वाचन प्रेरणा दिन' साजरा होऊ लागला. मान्यवरांच्या उपस्थितीत वाचन प्रेरणा दिन सोहळ्यात विद्यार्थ्यांना अभिवाचनाचे प्रयोग केले. टायनीटेल्स्'च्या हरहुन्नरी तरुण कलावंतांनी विद्यार्थ्यांपुढे गोष्टींची नाट्यरुपांतरे सादर केली.



'वाचन प्रेरणा दिना'प्रमाणेच

**मे महिना म्हणजे सुट्टीचे दिवस! मुलांना या दिवसांत नाटकासारखी गोष्ट खऱ्या अर्थाने गुंतवून ठेवते. चित्रपट, नाटक, मालिकांमधून अभिनय करत असलेल्या पल्लवी वाघ-केळकर यांनी ५ ते १५ वर्षे वयोगटातील मुलांना नाटकाचे सर्वांगीण प्रशिक्षण देणाऱ्या 'थिएटर कोलाज' या संस्थेची स्थापना केली आहे.**

# थिएटर कोलाज

**पल्लवी वाघ-केळकर**

सध्याच्या टिव्ही मोबाईलच्या युगात दृश्यमाध्यमांचा प्रभाव लहान मुलांवर जलदगतीने होतो आहे. या माध्यमाकडे मुलं आकर्षित होतात पण कार्टून आणि गेम्स यापलीकडे त्यांची झेप जात नाही. या विद्यार्थ्यांना चित्रपट माध्यमाच्या क्षमतेची खऱ्या अर्थाने ओळख व्हावी, त्यांना वैश्विक भान यावे आणि चित्रपट प्रदर्शन, त्यावरील चर्चा याचाही समावेश केला गेला. प्रभात चित्रमंडळाचे सचिव संतोष पाठारे यांनी ही जबाबदारी घेतली. मुलाची निरीक्षणक्षमता वाढण्यासाठी देखील या ॲक्टिव्हिटीचा फायदा झाला.

अभिनय करत असताना एकाग्रता हा गुण अत्यावश्यक ठरतो. तोलात्मक आसने, मेडिटेशन यातून एकाग्रता वाढीस लागते. योगाभ्यास हे थिएटर कोलाजच्या अभ्यासक्रमाचं अजून एक वैशिष्ट्य ठरलं. योगतपस्वी सुजाता भिडे यांनी मुलांना हसत-खेळत योगप्रशिक्षण देण्याची धुरा संभाळली. नामदेव मुरकुटे, देवेन्द्र भिडे यांच्याकडून मुलांना आवाजाचा वापर आणि वाचिक अभिनयाचे धडे मिळाले.

वर्षाअखेर सादर होणारी नाटके हा 'थिएटर कोलाज'चा सर्वोच्च बिंदू! वर्षभर जो अभ्यास केला त्याची वार्षिक त्याची परीक्षाच म्हणा ना! या नाटकांची कथानक राजा, राणीची, दुष्ट राक्षसांची नाहीत तर मुलांना त्यांच्या रोजच्या आयुष्यात येणाऱ्या अनुभवावर आधारित! गंमत जंमत करीत, त्यांना हसवता, हसवता, त्यांच्यावर उत्तम आयुष्य जगण्याचा संस्कार करणारी! पहिल्या वर्षी सुधा मूर्ती, कविता महाजन, सिगरुण श्रीवास्तव या नामवंत लेखकांच्या कथांवर आधारित '४ जीची गोष्ट' हे नाटक सादर केलं गेलं. या प्रयोगाला मिळालेला प्रतिसाद आमचा उत्साह वाढवणारा होता. या नाट्यनिर्मितीच्या प्रक्रियेतील अजून एक छान गोष्ट म्हणजे या कलाकृतीला जोडली गेलेली नाट्यक्षेत्रातील अनुभवी व्यक्तिमत्त्व आणि मुलांना त्यांचा मिळालेला सहवास. '४ जी' या नाटकाच्या निमित्ताने वर्षा दांदळे, श्रेयस राजे आणि संपदा जोगळेकर-कुलकर्णी यांच्याकडून बरचं काही शिकता आलं. सचिन गावकर यांच्याकडून नेपथ्य तयार करण्यापासून ते रंगमंचावर कसे जादू घडवते याचं प्रात्याक्षिक मुलांना मिळालं. अनुराग गोडबोलेकडून संगीतामुळे नाटकाला आणि संहितेला मिळणारा उठाव अनुभवता येतो आहे. यावर्षीच्या उन्हाळ्याच्या सुट्टीतही आम्ही एक आगळं वेगळं 'टिपूजीच्या पोटलीतल्या गोष्टी' हे बालनाट्य घेऊन येत आहोत. थिएटर कोलाजच्या बच्चे कंपनीला या नाटकात सिद्धिरुपा करमरकर आणि अक्षय शिंपी यांची साथ लाभणार आहे. या प्रयोगात तुम्हीही सामील व्हाल अशी खात्री आहे.

**- पल्लवी वाघ-केळकर**
भ्रमणध्वनी : ९९३०९८८८२१
pallavi.wgh@gmail.com













'युनिसेफ'च्या सहकार्याने 'बालकांचे लैंगिक व मानसिक शोषण' या विषयावर आयोजित केलेल्या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना सहभागी होता आलं. चित्र, नाट्यप्रवेश यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्वतः ला व्यक्त केलं.

# 'क्रांतीचे बीज रुजवणारी मुक्ता'


**सुरेखा पैठणे**

**११ एप्रिल हा ज्योतिबांचा जन्मदिवस! त्यांच्या शाळेतील मुक्ता साळवे तिच्या निबंधातून आपल्या समाजव्यवस्थेला आणि धर्मव्यवस्थेला सडेतोडपणे प्रश्न विचारते. तिच्या निबंधांची चर्चा करणारा हा लेख...**

**मु**क्ता साळवे ह्या १४ वर्षांच्या मातंग मुलीने लिहिलेला निबंध १५ फेब्रुवारी ते ९ मार्च १८५५ च्या 'ज्ञानोदय'च्या अंकात प्रकाशित झाला. निबंधाचे शीर्षक होते– 'महारामांगांच्या दुःखाविषयी' आणि त्यावेळेस मुक्ता महात्मा जोतिबा फुलेंच्या मुलींच्या शाळेत तिसऱ्या वर्षात शिकत असून तिचे वय १४ वर्ष होते. एवढ्यावरच न थांबता तिने ह्या निबंधाचे सार्वजनिक वाचन पुना कॉलेजचे प्राचार्य सरकारी शिक्षणमंडळाचे प्रमुख व फुले यांच्या शैक्षणिक कार्याचे हितचिंतक मेजर कँडी यांच्या अध्यक्षतेखाली विश्रामबागवाड्यात आयोजित केलेल्या जोतिबांच्या एका सत्कार समारंभात, तीनेक हजार लोकांच्या उपस्थितीत केले. त्यावेळी कँडी यांनी तिचे कौतुक केले व तिला चॉकलेट देऊ केले, तेव्हा तिने बाणेदारपणे, ''सर, आम्हांला चॉकलेट नको, वाचनालयाची सोय करून द्या'' अशी मागणी केली.

मुक्ताच्या ह्या निबंधाचा मागोवा आणि तिच्या धाडसाची पाठराखण करताना आपल्याला मुक्ताने ज्याकाळात हा निबंध लिहिला तो काळ आणि महात्मा फुलेंच्या शाळेचा, त्यांच्या शैक्षणिक कार्याचाही धावता आढावा घेणे अपरिहार्य ठरते.

इंग्रजांचे आगमन होईपर्यंत स्त्रिया आणि शूद्र ह्यांच्या दुःखाला सीमा नव्हती. स्त्री ही अस्पृश्यांमधली अस्पृश्य आणि दलितांमधली दलित होती. सतीची चाल, बालविवाह, केशवपन आदींच्या आघातांनी तिच्या दुःखाला पारावर नव्हता. पेशवाई बुडाल्यानंतर इंग्रजांनी स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांवर उपाय म्हणून वरील अनिष्ट चालींवर बंदी आणली आणि महात्मा जोतिबा फुले ह्यांनी आजवर स्त्री–शिक्षणावर जी बंदी होती, त्यावरच घाला घालत पुण्यात भिडेवाड्यात १८४८ साली मुलींची पहिली स्वतंत्र शाळा काढली. स्वत:च्या पत्नीला शिक्षित करून तिलाच ह्या मुलींच्या शाळेची प्रथम शिक्षिका बनवली. महात्मा फुलेंनी स्त्रियांची गुलामगिरी व शूद्रांचे शोषण यांचा इथल्या जातिव्यवस्थेशी कसा संबंध आहे हे सप्रमाण सिद्ध केले. भटशाही आणि ब्रिटिश नोकरशाही यांच्यामुळे निर्माण झालेले दारिद्र्य, कष्टकरी स्त्रियांना भोगावे लागत होते. त्याचबरोबर त्या पुरुषसत्ता आणि धर्माच्या नावाखाली होणारी फसवणूक याचाही बळी ठरत होत्या. जोतिबांनी स्त्रियांना सगळे समान हक्क मिळायला हवेत असा आग्रह धरला, त्यांनी 'सत्यशोधक चळवळीच्या' माध्यमातून स्त्री–पुरुष समानतेची शिकवण दिली. एकूण त्यांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन पुरोगामी होता. सत्यशोधक समाजाची ही चळवळ भारतातील ग्रामीण भागापर्यंत पोहोचलेली पहिली सामाजिक–शैक्षणिक चळवळ होती. 'सर्वसाक्षी जगत्पती, नकोच त्याला मध्यस्थी' हे या समाजाचे ब्रीद होते. या चळवळीच्या माध्यमातून पुरोहितांविना धार्मिक कार्य करण्याचा पर्याय त्यांनी उभा केला. 'वास्तुशांत करताना ज्या मजुरांनी बांधकाम केले त्यांचा सत्कार करून त्यांना गोडाधोडाचे जेवण द्यावे' असे महात्मा फुले सांगत. ह्या सामाजिक अभिसरणाने ज्यांना अस्पृश्य म्हणून इथल्या सामाजिक व्यवस्थेने बाहेर फेकले होते, साहजिकच त्यांच्यात आत्मविश्वास येऊ लागला होता.



हा आत्मभिमानी हुंकार ताराबाई शिंदे ह्यांच्या स्त्री–पुरुष तुलना ह्या पुस्तकातूनही बाहेर पडला आणि मुक्ताच्या निबंधातूनही बाहेर पडला. महात्मा जोतिबा फुले ह्यांचे शिक्षण हे अभ्यासक्रमातून प्रकट होणारे विचारस्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव ह्या त्रयीवर नितांत भरवसा ठेवणारे आणि सामाजिक विषमतेच्या विरोधात आवाज उठविणारे होते. 'शिक्षण हे वरच्या वर्गातून खालच्या वर्गात पाझरत आले पाहिजे' या मेकॉलेच्या विचारांस महात्मा फुलेंनी कडाडून विरोध केला. 'आधी कळस मग पाया' असे न होता 'आधी पाया मग कळस' अशा पद्धतीने प्रथम खालच्या वर्गातील लोकांना शिक्षण द्यावे हा आग्रह धरला. प्रथम उपेक्षितांना शिक्षण नंतर अपेक्षितांना शिक्षण हे सूत्र अंमलात आणले. ह्या शिक्षणपद्धतीचा परिपाक म्हणजेच मुक्ताचा हा निबंध होय.

मुक्ता साळवेच्या निबंधाचा विषयच मुळी 'महारामांगांच्या दुःखाविषयी' असा आहे. मुक्ताने ज्याअर्थी ह्यात अस्पृश्य वर्ग व स्त्रियांच्या दुःखाला वाचा फोडली आहे त्याअर्थी ती आद्य दलित स्त्रीवादी लेखिका ठरावी यात दुमत नाही. या निबंधात तिने इथल्या समाजव्यवस्थेला, धर्मव्यवस्थेला सडेतोड प्रश्न विचारले आहेत. संस्कृतीच्या नावाखाली हजारो वर्षांपासून आम्हांला गुलाम बनविणाऱ्या ह्या संस्कृतीत आमचे स्थान काय? असा रोकडा प्रश्न उपस्थित करून इथल्या धर्मसत्तेला आव्हान देते. महारामांगाच्या पतनास जबाबदार असणाऱ्या

'वेदग्रंथ' व त्यांचे निर्मिकावर प्रखर ताशेरे ओढते. थेट हल्ला चढवत ती म्हणते, 'मांग महारांसह सर्वांचा उत्पन्नकर्ता जगन्नाथ आहे तर मग अस्पृश्यासाठी धर्मग्रंथ पठनास बंदी का? जर वेदपठनास बंदी आहे तर याचा अर्थ अस्पृश्यांसाठी धर्मग्रंथ नाही. तसेच वेदकर्ते झाडूनपुसून ब्राह्मण आहेत तर मग त्यांचे आचरण वेदसंहितेनुसार का नाही? असे मूलभूत प्रश्न ती उपस्थित करते. आमचा धर्म कोणता असा खडा सवाल ती इथल्या धर्मव्यवस्थेला विचारते. 'मुसलमान कुराणानुसार जीवन जगतो, इंग्रज बायबलचे अनुसरण करतो आणि ब्राम्हणाजवळ त्यांचे वेद आहेत. सगळ्यांजवळ आपला बरावाईट धर्म आहे पण आम्हाला वेद वाचण्याचा, ऐकण्याचा अधिकार नाही, देवा मग आमचा धर्म कोणता?' तत्कालीन अस्पृश्यांची दैन्यावस्था, त्यांना नाकारण्यात आलेला धर्माचा अधिकार हा सारा कळवळा या प्रश्नांतून मांडते, आणि आपल्या बांधवांवर झालेला अन्याय उघड करते.

ह्याच निबंधात ती पेशवाईवरही प्रश्न उपस्थित करते, 'बाजीरावाचे राज्य असताना गाढवाला तरी धनी होता, पण आम्हाला नव्हता. महारमांग ह्यातून कोणी तालीमखान्यापुढून गेला तर गुळटेकडीच्या मैदानात त्याचा शिराचा चेंडू आणि तलवारीचा दांडू करून खेळत होते, अशी सोवळ्या राजाच्या दारावरून जाण्यास बंदी होती, तर मग विद्या शिकण्याची मोकळीक कोठून मिळणार?' पेशवाईच्या काळात अनेक अनिष्ट चालीरितींनी अस्पृश्य समाज गंजून गेला होता त्यापैकीच एकावर बोट ठेवताना ती म्हणते, 'आम्हां मांगमहारांस हाकलून देऊन आपण मोठमोठ्या इमारती बांधून हे लोक बसले व त्या इमारतीच्या पायाशी आम्हांस तेल शेंदूर पाजून पुरण्याचा व आमचा निर्वंश करण्याचा उपक्रम चालू होता.' हे भयानक सत्य मांडताना तिला रडू कोसळते की काय असेही ती लिहिते.

स्त्रियांच्याही अधःपतनांस इथल्या अन्यायकारक धर्मव्यवस्थेला ती जबाबदार धरते व थेट विचारते, 'तुमचे स्वार्थी, अप्पलपोटे पांडित्य पूजेसहित एकीकडे गुंडाळून ठेवा आणि मी सांगते ह्याकडे लक्षपूर्वक कान द्या, ज्यावेळेस आमच्या स्त्रिया बाळंत होतात त्यावेळी घरावर छप्पर नसल्याने हिव, पाऊस व वारा यांचा उपद्रव होऊन त्यांस किती दुःख होत असेल, जर एखाद्या वेळेस त्यांना बाळंतरोग झाला तर औषध आणि वैद्यास पैसा कोठून मिळणार? कोण त्यांचे उपचार फुकट करणार?' ह्या प्रश्नातून मुक्ता अस्पृश्य स्त्रीचे दुःख प्रकट करत आहे. पर्यायाने ती दलित स्त्रीवादाचीच मांडणी करीत आहे. सवर्ण स्त्रीला भारतीय समाजव्यवस्था सवर्ण असल्याचे कवच प्रदान करते परंतु अस्पृश्य स्त्रीला मात्र एकाचवेळी इथल्या जातीच्या उतरंडीतून येणाऱ्या अन्यायाशी लढा द्यावा लागतो आणि मग पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेशीही लढाई करावी लागते.

इंग्रज सरकारच्या पुढाकाराने अस्पृश्यवर्गात झालेल्या सुधारणांचे श्रेय ती इथल्या सुधारक ब्राह्मण वर्गालाही देताना म्हणते, ''निःपक्षपाती दयाळू इंग्रज सरकारचे राज्य झाल्यापासून एक चमत्कारिक गोष्ट झाली आहे की, जे ब्राह्मण पूर्वी आम्हास दुःख देत होते, तेच आता माझे स्वदेशीय प्रिय मित्र बंधू आम्हाला ह्या महान दुःखातून काढण्यासाठी रात्रंदिवस मेहनत घेतात, परंतु सर्वच ब्राह्मण घेतात असे नाही, त्यातून ज्यांचा विचार सैतानाने नेला आहे, ते पूर्वीसारखाच आमचा द्वेष करतात. आणि जे माझे बंधू आम्हांस बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करतात, त्यांना म्हणतात जातीबाहेर टाकू.'' महात्मा फुलेंच्या काळात जे ब्राह्मण कर्ते सुधारक म्हणून समाजसुधारक काम करीत होते, त्यांचा उल्लेख आणि गौरव मुक्ता साळवे ह्यांनी केला आहे. हे करताना ती म्हणते, 'आमच्या प्रिय बंधूंनी मांगमहारांच्या मुलांच्या शाळा मांडल्या आहेत व ह्या शाळांना दयाळू इंग्रज सरकारही मदत करत आहे.'

'विद्येविना मती गेली, मतिविना गती गेली,
गतिविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले
इतके अनर्थ एका अविद्येने केले'

हा महात्मा जोतिबा फुले ह्यांचा मूलमंत्र मानून आपल्या अस्पृश्य बांधवाना ती सल्ला देताना म्हणते, ''अहो दारिद्र्याने व दुःखाने पिडलेले मांग महार लोकहो, तुम्ही रोगी आहात तर तुमच्या बुद्धीला ज्ञानरुपी औषधे घ्या म्हणजे चांगले ज्ञानी होऊन तुमच्या मनातील कुकल्पना जाऊन तुम्ही नीतिमान व्हाल. शिक्षण घेतल्याने तुमचे दारिद्र्य नष्ट होईल. अंधश्रद्धा आणि चुकीच्या कल्पना जाऊन तुम्ही बुद्धीने विचार कराल. रात्रंदिवस तुमच्या ज्या जनावरांप्रमाणे हाजऱ्या घेतात त्या बंद होतील. तर झटून अभ्यास करा.'' मातंग जातीवरील गुन्हेगारीच्या शिक्क्याविषयी बोलणारी मुक्ता ही सर्वात पहिली स्त्री ठरते.

मुक्ता साळवेने लिहिलेल्या निबंधातील भाषा आणि आशय आजही विचार करायला लावणारी आहे. अवघ्या तीस पानांच्या लेखात तिने भारतातील जातपितृसत्ताक शोषक व्यवस्थेचे धागेदोरे उकलून दाखवले आहे. तिच्या लिखाणावर स्त्रीमुक्तीचा सत्यशोधकी संस्कार झालेला दिसून येतो. स्त्रियांच्या दुःखावर ती भाष्य करते म्हणूनच हरी नरके यांनी मुक्ताला आद्य दलित लेखिका म्हटले आहे. मुक्ता निडरपणे इथल्या धर्मव्यवस्थेला आणि ह्या धर्मव्यवस्थेचे वाहक असलेल्या ब्राह्मणशाहीला प्रश्न विचारते. अन्यायकारक पेशवाईच्या काळात महारामांगावर जे सामाजिक अन्याय झाले, त्यांचा निर्वंश करण्याचेच जे षड्यंत्र सुरू झाले होते, त्यावर प्रश्न विचारते. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाले पाहिजे. त्यानेच समाजातील अनिष्ट रूढी समजुती नष्ट होतील हा महात्मा फुलेंचा विचार तिच्या लेखात येतो. म्हणूनच ती तिच्या ज्ञाती बांधवाना शिक्षण घेण्याचा आग्रह करते.

महात्मा फुलेंच्या सामाजिक अभिसरणाने अस्पृश्य समाजात आणि स्त्रियांत जी क्रांती झाली, त्या क्रांतीचेच बीज मुक्ताच्या ह्या निबंधात आहे. ह्यातुनच पुढे स्त्रीमुक्तीचे रोप तरारले. ह्याचे श्रेय निश्चितच ह्या महात्मा फुलेंच्या विद्यार्थिनीला म्हणजेच मुक्ता साळवेला जाते.

संदर्भ:-
- www. dalit web. org
- प्रा. हरी नरके ब्लॉग
- आपले वाङ्मय वृत्त - 'उत्खनन' ह्या सदरातून.

**– सुरेखा पैठणे**
भ्रमणध्वनी : ८४२१२७९२०३
surekhsid2003@gmail.com

**कि**रण येले 'स्त्री' वगैरे शब्द न वापरता 'बाई' हा शब्द वापरतो. 'बाईच्या कविता'. 'बाई' या एका शब्दात तिची आकृती व्यापली आहे. जन्म-मृत्यूच्या सृजनशील अशा जाणिवेची संकल्पना आणि निर्मितीशी 'बाई'पण जोडलेलं आहे. 'बाई' हा शब्द एकाचवेळी परंपरेचं जडत्व आणि बदलांची, जिवंतपणाची शाश्वती देतो. नक्की कशा आहेत या कविता? म्हटलं तर स्त्रीवादी आहेत पण स्त्रीवादी आक्रोश आणि अभिनिवेशापासून ती दूर आहे. समकालीन वास्तवाशी नातं सांगणारी सूज्ञ आणि संयत अशी स्त्रीवादी जाणीव त्यांत आहे. ती पृष्ठभागावर रेंगाळणारी नाही. तो एक खोलवर साधलेला संवादच आहे. स्त्रीचं अस्तित्वभान, जाणिवा आणि जाणीव-नेणिवेच्या तळाशी दडून असलेले स्त्रीविषयी कुतूहल शब्दांतून अलगद टिपलं आहे. यात 'रिडींग बिटवीन द लाईन्स' असं अव्यक्तही आहे आणि किरणची कविताच या अव्यक्ताला सांधणारा दुवाही आहे. एक स्त्री म्हणून तिचं बर्हिगत वास्तव दिसतं, ते समजून घेता येते; परंतु नेणिवेच्या स्तरावरील भावनिक गुंतवळ्याला जाणून घेणं महाकर्मकठीण! ही कविता ते करते. कोणत्याही अभिनिवेशाला ती बळी पडत नाही आणि किरण आपली अस्वस्थता, कुतूहल अंतर्मुखपणे कवितेतून मांडत जातो. प्रतिमांचा सोस न बाळगता अनुभवाला सहजपणाने भिडण्याची किमया या कवितेत आहे. ही कविता स्त्री-जाणिवेचा एक अखंड शोध आहे. प्रत्येक घटितामधील सौख्य, औत्सुक्याला देत-घेत ती पुढे जाताना दिसते. बाईच्या जगण्याच्या जवळपास सगळ्या अवस्थांचा सूक्ष्म विचार ही कविता करते. 'स्व'पासून सुरू झालेला हा प्रवास स्त्री-जाणिवांचे वेगवेगळे आयाम शोधत या कवीच्या सकस, अर्थपूर्ण निर्मितीची साक्ष देतो. शरीरसंबंधांविषयी लिहिताना मराठी लेखक फार सोवळेपणाने लिहितात. एकंदरीतच मध्यमवर्गीयपण मोकळेपणाने लिहायच्या आड येते,पण असा कुठलाही सोवळेपणा किरणची कविता बाळगत नाही. आणि ओढून-ताणून ओवळेणाही आणत नाही. ती सहज येते. आयुष्य अगणित श्वासांचं त्यातही काळजाचा ठोका चुकवणारे अनेक प्रसंग जे आपल्याला आयुष्य जगल्याची खात्री देतात पण या सगळ्याचा सारांश रॉबर्ट फ्रॉस्ट हा कवी तीन शब्दात काढतो ''इन थ्री वर्ड्स आय कॅन सम अप एव्हरी थिंग आय हॅव लर्नड अबाउट लाईफ - इट गोज ऑन'' किरणची कविताही अशीच थोडक्या शब्दात पण अंगावर येते. त्या अर्थाने ही रॉबर्ट फ्रॉस्टशी नातं सांगणारी आहे असं जाणवतं.



स्त्रीवाद आला की सिमोन द बोव्हा, व्हर्जिनिया वुल्फ, एलेन शोवॉल्टर असे अनेकांचे उल्लेख करता येतील आणि तास-न्-तास त्यावर लिहिता येईल. मराठीपुरतं बोलायचं झालं तर काशीबाई कानिटकर, लक्ष्मीबाई टिळक अशा लेखिका मराठी साहित्यात लिहित्या झाल्या आणि स्त्रीवादाची सुरवात झाली. त्याचबरोबर बहिणाबाईचा इथे विशेष उल्लेख करावा लागेल. मालतीबाई बेडेकरांनी १९३३ मध्ये विभावरी शिरुरकर या टोपणनावाने त्यांनी 'कळ्यांचे नि:श्वास' हा कथासंग्रह लिहून मराठी साहित्यविश्वाला एक वेगळे वळण दिले. अर्थात गेल्या अर्धा शतकातले साहित्य हे स्त्रीवादापेक्षा दलित साहित्य आणि नेमाडे, चित्रे, ढसाळ, कोलटकर यांच्यासारख्या नव्या स्वरुपाचे लेखन करणाऱ्यांनी जास्त गाजवलं. तरी इरावती कर्वे आणि दुर्गाबाई यांचं लेखन आणि पद्मा गोळे, संजीवनी मराठे, इंदिरा संत, शांता शेळके, पद्मजा फाटक आणि आशा बगे एक ना अनेक इत्यांदींचं लेखनातून कवितेतून स्वतंत्र स्त्रीत्वाची जाणीव त्यांच्या कवितांतून डोकावत राहिली. पुढे गौरी देशपांडे, मेघना पेठे आणि कविता महाजन अशा अनेकांची नावं आवर्जून घ्यावी लागतील, पण मला आत्ता विशेषतः सांगायचे आहे ते आपल्याला विशेष परिचित नसलेली करेन हर्नी.

करेन हर्नी ही बाई जर्मन! विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील महत्त्वाची मनोविश्लेषक आणि मानसोपचारतज्ज्ञ. किंबहुना स्त्रीवादी मनोविश्लेषणाचा पाया तिने रचला. तो काळ हा जगप्रसिद्ध सिगमंड फ्रॉइड (१८५६-१९३९) या मनोविश्लेषक आणि मानसोपचारतज्ञ याचा प्रचंड प्रभाव असलेला काळ होता. मनोविश्लेषणाच्या क्षेत्रात, त्याच्या विचारांहून वेगळा विचार मांडणं हे जवळपास पाप समजले जाई. फ्रॉइडने मनोविश्लेषणात स्त्री आणि पुरुष हे मूलतः वेगळे असल्याचे मांडले. 'पेनीस एनव्ही' हा त्याचा एक सिद्धांत. पुरुषांप्रमाणे लिंग नसल्याने स्त्रियांमध्ये आपण कमी पडतोय असा न्यूनगंड तयार होतो आणि त्यातून त्यांची एक पराभूत मनोभूमिका तयार होते आणि म्हणून स्त्री व पुरुष यांचे मानसशास्त्र

**'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेला किरण येले यांचा 'बाईच्या कविता' या काव्यसंग्रहाला वाचकांनी चांगलीच दाद दिली. या संग्रहावरील चर्चेनिमित्ताने मानसशास्त्रीयदृष्ट्या या संग्रहाचा वेध घेणारे मनोगत..**

# 'एक सखोल काव्यसंवाद'

**धनंजय गांगल**

निसर्गतः वेगळे असते – हे त्याचे सार. हर्नीने हा खोडून काढला. 'ओडिपल कॉम्प्लेक्स' म्हणजे मुलाचा आईकडे आणि मुलीचा बाबांकडे निसर्गतः ओढा असणे हा फ्रॉईडचा अजून एक सिद्धांत. हर्नीने तोही खोदून काढला. तिच्या मते 'पेनीस एनव्ही' म्हणजे स्त्रियांना पुरुषांच्या जननेंद्रियांबद्दल हेवा असूया वाटणे आणि न्यूनगंड तयार होणे. हे नैसर्गिक नसून, समाजातील स्त्री पुरुष असमानतेतून आले आहे. स्त्रियांना पुरुषाच्या लिंगाचा नाही तर विषम सामाजिक परिस्थितीत पुरुषांकडे स्त्रियांपेक्षा जी जास्त सत्ता एकवटली आहे, प्रत्यक्षात त्याचा हेवा वाटतो. मुलीला वडिलांचे आकर्षण हे आईपेक्षा त्यांच्याकडे असलेल्या जास्त सत्तेचे असते. पुढे जाऊन तिने पुरुषांच्या 'वुम्ब्स एनव्ही' म्हणजे पुरुषांना स्त्रियांच्या गर्भाशयाचा आणि त्यामुळे तिला चक्क नवीन जीव जन्माला घालता येतो, या तिच्या सर्जनशीलतेचा हेवा वाटतो, या सिद्धांताची मांडणी केली. या स्त्री-पुरुष असमानतेमुळे पुरुषाला स्वतःला सतत सिद्ध करण्याचा दबाव असतो. स्त्रियांना तो तेवढा नसतो. आणि ह्याचेही कुठेतरी पुरुषांना आकर्षण आणि सुप्त असूया असते. आपण स्त्रीप्रमाणे निर्मिती करू शकत नाही या जाणिवेतून आणि त्यातून येणाऱ्या अगतिकतेमुळे पुरुष सतत स्वत:ला सिद्ध करण्यासाठी धडपडत असतो. जास्त सत्ता, उच्च पद या मागे लागतो. सतत दुसऱ्यांवर सत्ता गाजवण्याची त्याची धडपड या अगतिकतेतूनच येते. ती फ्रॉइडची विद्यार्थिनी नव्हती पण फ्रॉईडला तिची, तिच्या कामाची पूर्ण जाणीव होती. एक शास्त्रज्ञ म्हणून खरे तर त्याने तिला प्रोत्साहन द्यायला पाहिजे होते. पण त्याने 'नरो-वा-कुंजरोवा' अशीच भूमिका घेतली. तिच्या अस्तित्वाची दखलही त्याने कधीच घेतली नाही. स्वतःच्या अशा वर्तणुकीने एकप्रकारे त्याने तिच्या सिद्धांताला पुष्टी दिली. हा काव्यगत न्याय म्हणूया.

समाजात प्रत्यक्ष आणि मनात काल्पनिकरित्या जे काही घडते आणि प्रत्यक्षात घडावे असे वाटते, ते कलाकृतीत, साहित्यात उमटते. स्त्रीवादाचा पाया हा स्त्रीला वेगळे अस्तित्व आहे, वेगळे व्यक्तिमत्त्व आहे ही मान्यता मिळवण्यात आहे. केवळ स्त्री असल्याने वेगळी वागणूक मिळावी असा नाही. किरणच्या कविता ह्या करेन हर्नीच्या स्त्रीवादी विचारांच्या अवकाशात वावरतात – काही प्रत्यक्ष काही काल्पनिक. ''आदमी औरत के साथ सोता क्यूँ है? जागता क्यूँ नही?'' हे इमरोजचे वाक्य किरणने 'बाईच्या कवितां'च्या मलपृष्ठावर उद्‌धृत केले आहे. एका अर्थाने त्याच्या कवितांचे हे सार आहे.

**– धनंजय गांगल**

भ्रमणध्वनी : ९८२१०३२८३०
dhananjay.gangal@gmail.com

वाचक प्रतिसाद

## आनंदी गोपाळ बायोपिक : अपुरेपणा आणि अभ्यासाचा अभाव

महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व पु.ल. देशपांडे यांच्या जीवनावरील चित्रपटात देशपांडे दांपत्य आणि काही नामवंत संगीत कलाकार यांच्याबद्दल आक्षेपार्ह दृश्ये असल्याच्या टीकेने नव्या वर्षातील पहिले तीन महिने गाजले. या चित्रपटापाठोपाठ प्रदर्शित झालेल्या 'आनंदीगोपाळ' या चित्रपटाचीही अवस्था काहीशी तशीच आहे. आनंदीगोपाळ लघुपटाच्या निर्मात्या आणि 'डॉ. आनंदीबाई जोशी : काळ आणि कर्तृत्व' या ग्रंथाच्या लेखिका अंजली कीर्तने यांचा 'शब्द रुची' मासिकाच्या एप्रिल २०१९ अंकातील लेख या दुसऱ्या बायोपिकमधील पाच प्रकारचे ठळक दोष अधोरेखित करणारा आहे. कलात्मक स्वातंत्र्याच्या नावाखाली अतिरंजित भडक आणि उथळ स्वरूपाच्या चित्रणाचे समर्थन करणाऱ्या निर्माते-दिग्दर्शकांच्या डोळ्यांत या लेखामुळे अंजन पडेल अशी आशा आहे.

अंजली कीर्तने यांच्या आधी एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस काशीबाई कानिटकर यांनी लिहिलेले डॉ. आनंदीबाई जोशी यांचे चरित्र प्रकाशित झाले होते. आनंदीबाईंचे वडील गणपतराव जोशी यांना आपल्या मुलीच्या बुद्धीचा अभिमान होता, असे त्यातही नमूद करण्यात आले आहे. बायोपिकमधील आनंदीबाईंच्या वडिलांचे चित्रण त्यांच्यावर अन्याय करणारे आहे ही अंजली कीर्तने यांची टीका वाजवी आहे हे त्यामुळे स्पष्ट होते.

आनंदीबाई अमेरिकेला वैद्यकीय शिक्षणासाठी जातात, त्यात तेथील कार्पेंटर मावशीचे मोठे योगदान आहे. बायोपिकमध्ये मात्र कार्पेंटर मावशींना अगदी पुसटसे स्थान आहे. अमेरिकेला जाण्यापूर्वी आनंदीबाईंनी कलकत्त्यानजीक श्रीरामपूर येथे अमेरिकेस वैद्यकीय शिक्षणासाठी जाण्याची सहा कारणे, एक तासाचे व्याख्यान अस्खलित इंग्रजीतून देऊन स्पष्ट केली होती. या व्याख्यानाचा उपस्थितांवर चांगलाच प्रभाव पडला होता. बऱ्याच देशी-इंग्रजी पत्रात ते प्रसिद्ध झाले होते. आनंदीबाईंच्या व्यक्तिचित्रणाच्या दृष्टीने व्याख्यानाचा हा प्रसंग बायोपिकमध्ये असणे अनिवार्य होते, परंतु तो नसल्यामुळे अंजली कीर्तने यांनी लेखात व्यक्त केलेली नाराजी रास्त आहे. या भाषणामुळे हिंदुस्थानच्या पोस्टखात्याचे महासंचालक (डायरेक्टर जनरल) एच.ई.एम. स्मिथ एवढे प्रभावित झाले की, त्यांनी आनंदीबाईंच्या कौतुकाचे पत्र गोपाळरावांना पाठविले. पत्रासोबत त्यांनी छोटी भेट म्हणून शंभर रुपयांची नोट जोडून आपली दिलदारी दाखविली होती.

'आनंदी गोपाळ' चित्रपटाच्या अखेर विविध क्षेत्रात अजोड कर्तृत्व संपादन केलेल्या स्त्रियांची छबी दिसते, परंतु या चित्रमालेमुळे मूळ चित्रपटातील अपुरेपणा आणि दोष यांचे परिमार्जन होत नाही.

**– वसंत वासुदेव**

भ्रमणध्वनी : ८१०८४९९००५

काव्यरंग

## । गाव शहरात येताना ।

वेस ओलांडली
तेव्हा आख्खा जथ्था त्याच्या पाठीशी
मुक्यानेच चालला मुक्या प्राण्यांसारखा...
आज रातीची पालं इथली
दुसऱ्या रातीला तिथं
मागं टाकून लीड, लेंड्या
तुटल्या, सुटल्या संसाराच्या,
गाडल्या मढ्याच्या उकरल्या निशाऱ्या
इतकं सोपं नसतं सारं...

पाहणी करायला ते आले
त्या रात्री उरात कळ घेऊन तो रडला
ताऱ्यांनी गाळली टिपं, चांद मुसमुसला
उद्याचा सूर्य

कोणती आवस घेऊन येणाराय...
ढेकळाची माती माथ्याला लावत
तो उपडा पडला वावरात
इथंच त्यानं उन्हं झेलली
भारे पेलले पेंड्यांचे अर्धपोटी
कपिलेचं खपती पोट भरण्यासाठी
भाकर-कुटका पोटात टाकून
माथ्यावरल्या चिंता साऱ्या
आभाळात सोडल्या
चिंचेखाली पडल्या पडल्या
शिळोप्याचा वारा सुटता
घोट घेत काळ्या चहाचे
न्याहाळल्या करड्या पखाली
वाहत जाताना इकडून तिकडे

इथल्याच पाराखाली
पाटाची नागीण बांधाबांधानं धावली
बारं लावताना चिखलात
चिखलाच्याच चिपळ्या घेऊन तो नाचला
कापनीनंतर उफनताना खळ्यात सोनं

धणीनीची खळी पाहून तोही हसला
आपल्याच हातानं रुजवलेला, उजवलेला
आपल्याच संगं वाढलेला लिंब
डोळे भरून पाहताना गाळली टिंब
भाळावरला ओघळ चाखत काळी माय थरारली
बांधाबांध करताना गटांगळ्या खात विचारांच्या
अडकले सारे प्रश्न गळ्यातच घरधणीनिच्या
या घरट्यातनं उडून गेली चिमणी-पाखरं
तरी व्याकुळला नव्हता तो कधी..

समोरच्या झोपडीतला
नशेतच निपचित निजलेला नाम्या
आन बांधावरल्या बाभळीला लटकलेला तुक्या
एकाच वैकुंठी जाणार का
हा प्रश्न आज त्याला पहिल्यांदा पडला...

नवी वेस, नवा माळ
नवा गाव, नवं आभाळ
ओलांडताना उंबरठा
कापिलेचा काळीज कापणारा हंबरडा
माणूस मुळातून उखडलेला ....

## अवकाळी अभंग

देवा तुझ्या आभाळाला
कोटी कोटी डोळे
टिप्पुसही ना गळे
तयातून!

तुझ्या आभाळाची माया
सर्वदूर वाहे
तृष्णा वाट पाहे
भरणाची!


कशी करनी अगाध
झाडावर पानी
डोळ्यातले आनि
आटविशी!

अरे, तुझ्या वावरात
पेटला वणवा
दयेची वानवा
दाविशी का?

देवा तुझ्या मनी
लोभ आन् राग
घ्यावा कसा माग
सांग तरी!

**– सुधीर शालिनी ब्रह्मे**
sudhir.brahme@gmail.com

# व्ही.शांताराम प्रतिष्ठानचे
# चित्रपटावरील मौलिक संदर्भ ग्रंथ




कोल्हापूरातील मूकपट प्रारंभापासून
बहरलेल्या मराठी चित्रपटसृष्टीच्या इतिहासाचा वेध घेणारे
नटवर्य **बाबूराव पेंढारकर** यांचे आत्मचरित्र
**चित्र आणि चरित्र** (तृतीय आवृत्ती)
मूल्य : रू. ३००




१९१३ ते २०१३ या मराठी चित्रपटसृष्टीच्या
शतकमहोत्सवी कालखंडातील मूकपट-चित्रपटांची
समग्र सूची आणि बरेच कांही
**शतकमहोत्सवी मराठी चित्रसंपदा**
संकलन-संपादन : **द.भा.सामंत**
संकेत स्थळ : www.marathifilmdata.com
मूल्य : रू. १४००




चित्रपटांचे भारतात आगमन झाल्यानंतर भारतीयांच्या
मनांत या नव्या माध्यमाबद्दल विलक्षण विस्मयजनक
कुतूहल होते. त्या कुतूहल मिश्रित प्रेमातून हिंदी-मराठी
चित्रपटसृष्टीतील नट,नट्या, दिग्दर्शक, संगीतकार
यांच्याबद्दल जिव्हाळ्याचे लेखन.
**चंदेरी स्मृतिचित्रे**
लेखक : **द.भा.सामंत**
मूल्य : रू. ४५०

**एकमेव वितरक**
**मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस,** गिरगांव, मुंबई-४ ईमेल-majesticph@gmail.com
ऑनलाईन खरेदी : www.MajestiReaders.com भ्रमणध्वनी:9892220239

**चि**त्रपटाचा आशय आणि दिग्दर्शकाचा तो सांगण्यामागील हेतू, यांची गल्लत झाली, तर चित्रपटाचा परिणाम उणावतो हे अलीकडे प्रदर्शित होत असलेल्या काही चित्रपटांतून सिद्ध होत आहे. चित्रपटनिर्मितीचा एक हेतू मनोरंजनाचा असला, तरीही समाजातील कटू वास्तव, ज्यांचा अनुभव चाकोरीबद्ध आयुष्य जगणाऱ्या सर्वसामान्य प्रेक्षकांना सहसा येत नाही, त्यांच्यापर्यंत पोहचवणे हा देखील असतो. सामाजिक कार्यात स्वतःला झोकून देणाऱ्या काही व्यक्ती शोषित समाजाच्या विकासाचं काम करत असतानाच, त्यांची व्यथा लोकांपर्यंत पोहचवण्याचं काम विविध माध्यमातून करत असतात. ह्यूमन ट्रॅफिकिंगच्या जाळ्यात अडकलेल्या स्त्रिया व मुलांचं पुनर्वसन करणाऱ्या सुजाता कृष्णन या अशापैकी एक आहेत. त्यांच्या 'प्रज्वला' या सामाजिक संस्थेतर्फे हजारो शोषितांना आधार मिळाला आहे. या त्यांच्या कामासाठी 'पद्मश्री' हा नागरी सन्मान त्यांना मिळालाय. हे कार्य करताना आलेल्या एका विदारक अनुभवावर आधारित 'ना बंगारु तल्ली' या तेलगु चित्रपटाचं लेखन त्यांनी केलं. तेलगु बरोबरच मल्याळम भाषेत 'एन्ते' या नावाने तो प्रदर्शित झालाय. 'ना बंगारु तल्ली'ला २०१४ चा सर्वोत्कृष्ट तेलगु चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. त्याच बरोबरीने सर्वोत्कृष्ट पार्श्वसंगीत (शंतनू मोईत्रा) आणि विशेष अभिनय पुरस्कार (अंजली पाटील) हे दोन राष्ट्रीय पुरस्कारही या चित्रपटाला मिळाले.

ह्युमन ट्रॅफिकींग ही आपल्याकडील एक गंभीर समस्या आहे. हलाखीचं आयुष्य जगणाऱ्या, आर्थिक विवंचनेत असणाऱ्या कुटुंबातील तरुण मुली व लहान मुलं ही ह्युमन ट्रॅफिकिंग करणाऱ्यांचं मुख्य लक्ष असतात हे जरी सत्य असलं तरीही त्यात कधी-कधी सुखवस्तू घरातील मुलंसुद्धा ओढली जातात. अमलापूरमध्ये राहणाऱ्या दुर्गाच्या वाट्याला सुद्धा हे भोग येतात.




दुर्गा ही 'ना बंगारु तल्ली'मधील प्रमुख व्यक्तिरेखा. शाळेत नेहमी पहिल्या क्रमांकाने पास होणारी, भविष्यात हैद्राबादमध्ये जाऊन महाविद्यालयात उच्च शिक्षण घेण्याची स्वप्न पाहणारी! तिच्या यशाचं सगळं श्रेय ती आपल्या वडिलांना, श्रीनिवासन यांना देत असते. श्रीनिवासन हैद्राबादमध्ये व्यापार करत असतात त्यामुळे हैद्राबादमध्ये पुढील शिक्षणासाठी आपल्याला कोणतीच अडचण येणार नाही याची तिला खात्री असते. मैत्रिणीच्या लग्नात तिच्या भावावर (रत्नशेखर) तिचं मन जडतं आणि दोघं प्रेमात पडतात.

श्रीनिवासन दुर्गाला हैद्राबादला शिक्षणासाठी आणण्यास उत्सुक नसतो पण दुर्गाच्या हट्टापुढे त्याचं काही चालत नाही. हैद्राबादमध्ये पोहचल्यानंतर दुर्गाला तो एका हॉटेलमध्ये ठेवतो. या हॉटेलमधून दुर्गाचं अपहरण होतं आणि तिची रवानगी कुंटणखान्यात केली जाते.

वस्तुस्थिती अशी असते की श्रीनिवासन स्वतःच ह्युमन ट्रॅफिकिंगमध्ये गुंतलेला असतो. त्याच्यामुळे ज्या स्त्रीचं आयुष्य उधळलं गेलेलं असतं, ती दुर्गाचं अपहरण घडवून आणते व श्रीनिवासनचा बदला घेते. यामध्ये निष्पाप दुर्गाचा बळी जातो.

दुर्गाची कुंटणखान्यातून झालेली सुटका व शेवटाकडे आपले वडील या गलिच्छ प्रकारात गुंतलेले आहेत हे कळल्यानंतरची तिची प्रतिक्रिया, हा भाग विलक्षण हादरवून टाकणारा आहे.

सुनीता कृष्णन व तिचा दिग्दर्शक पती राजेश तचिर्वर या दोघांनीही दुर्गासारख्या अनेक तरुणींची होरपळ जवळून पाहिलेली आहे. त्यांना या चित्रपटाची पटकथा आणि व्यक्तिरेखा लिहिताना त्या अनुभवांचा समावेश त्यात करता आलाय. लैंगिक शोषण हे केवळ उच्चभ्रू समाज, सत्ताधारी यांच्याकडून होत नसते तर ही वृत्ती बाळगणारी व्यक्ती समाजातल्या कोणत्याही थरातील आणि वयाची असू शकते. अनेकदा

**ह्युमन ट्रॅफिकिंगच्या जाळ्यात अडकलेल्या स्त्रिया व मुलांचं पुनर्वसन करणाऱ्या सुनिता कृष्णन यांच्या अनुभवांवर आधारित 'ना बंगारु तल्ली' हा तेलगु चित्रपट विलक्षण अस्वस्थ करून जातो...**

# राष्ट्रीय पुरस्कारविजेता 'ना बंगारु तल्ली'

**संतोष पाठारे**

आपल्यावर झालेल्या लैंगिक अत्याचाराची वाच्यता देखील शोषिताला करता येत नाही अशा अन्यायाविरोधात आवाज उठवणाऱ्या बेदरकार दुर्गाची व्यक्तिरेखा स्पष्ट करण्यासाठी चित्रपटाच्या सुरुवातीचा एक प्रसंग बोलका आहे. टिव्हीवरील कार्यक्रमाने प्रभावित झालेला एक मुलगा, एका लहान मुलीवर शेतात अतिप्रसंग करताना दुर्गा पाहते. केवळ बघ्याची भूमिका घेणाऱ्या आसपासच्या माणसांना ती दोन बोल सुनावते आणि त्या मुलाला चोप देते. अशा प्रसंगी लोक मदतीला येत नाहीतच, उलट प्रसंगावधान राखून मदत करणाऱ्याला बोल लावतात, शोषिताचे नातेवाईक सुद्धा पुढे काही कटकट नको म्हणून मूग गिळून गप्प राहतात. समाजातील अनेक प्रवृत्तींचं दर्शन हा प्रसंग घडवतो. दुर्दैवाने एका लहान मुलीची अतिप्रसंगातून सुटका करणारी दुर्गा, स्वत:ची मात्र कुंटणखान्यातून सुटका करून घेऊ शकत नाही. तिच्या वडिलांच्या कुकर्मांची फळे तिला भोगावी लागतात.

दुर्गाची शिक्षणाची महत्त्वाकांक्षा, रत्नशेखर बरोबर संसार करण्याची स्वप्नं, हैद्राबादमध्ये येताच विरून जातात व तिला एका अनपेक्षित जगात अडकवले जाते. दुर्गाची पूर्वार्धातील तडफदार प्रतिमा आणि उत्तरार्धातील अगतिकता अंजली पाटील या गुणी अभिनेत्रीने यथार्थपणे रंगवली आहे. 'बार्डो', 'न्यूटन' या मराठी, हिंदी चित्रपटातून अभिनय करणाऱ्या अंजली पाटीलने तेलगु चित्रपटातून अभिनय करून राष्ट्रीय पुरस्कार मिळवावा ही कौतुकाची गोष्ट आहे. कलावंताला भाषेचं बंधन नसतं हे अंजली पाटीलने सप्रमाण सिद्ध केलयं. राधिका आपटे या मराठी अभिनेत्रीनंतर अंजली पाटील ही भारतातील विविध भाषांमधील चित्रपटात प्रमुख भूमिका करते आहे. 'ना बंगारु तल्ली'मध्ये तिच्या वडिलांची भूमिका करणाऱ्या सिद्दीकी या अभिनेत्याला सुद्धा आव्हानात्मक व्यक्तिरेखा मिळाली आहे. दुर्गाचा प्रेमळ, आदर्श पिता व ह्युमन ट्रॅफिकिंग करून अनेक निष्पापांचं शोषण करणारा दुष्ट इसम, अशा दोन टोकाच्या छटा त्याने समर्थपणे दाखवल्यात.

हा चित्रपट ह्युमन ट्रॅफिकिंगच्या समस्येवर भाष्य करतोच पण त्याचबरोबर मानवी नात्यामध्ये असलेल्या विश्वास या घटकाचा वेगळा आयाम ही समोर ठेवतो. वडिलांचं खरं रूप कळल्यानंतर आपल्या वडिलांच्या तोंडावर थुंकणं आणि ही अवहेलना सहन न होऊन श्रीनिवासने स्वत:चं आयुष्य संपवून घेणं या घटना चित्रपटाचा परिणाम गहिरा करतात.


ज्या वर्षी 'ना बंगारु तल्ली' प्रदर्शित झाला त्याचवर्षी ह्युमन ट्रॅफिकिंगचं गांभीर्य जाणवून देणारा 'थिरा' हा विनित श्रीनिवासन या दिग्दर्शकाचा मल्याळम चित्रपट प्रदर्शित झाला होता. प्रसिद्ध अभिनेत्री शोभनाने चित्रपटात केलेलं पुनरागमन आणि मराठी अभिनेता गिरीश परदेशीने मल्याळम चित्रपटात केलेला अभिनय यामुळेही हा चित्रपट लक्षणीय झाला होता.

'ना बंगारु तल्ली' व 'थिरा' या दोन्ही चित्रपटांची ट्रीटमेंट थ्रिलर शैलीतली असली तरीही त्यातील विषयाचं गांभीर्य दोन्ही दिग्दर्शकांनी राखलं आहे. अशा प्रकारची कथानक सवंग व अश्लील होण्याचा धोका असतो. या दोन्ही दिग्दर्शकाचा हेतू चित्रपटातून ह्युमन ट्रॅफिकिंगसारख्या गैरप्रकारांना आळा घालणं, त्यात गुंतलेल्या सामाजिक व राजकीय प्रतिष्ठेच्या लोकांचा बुरखा फाडणं हा होता. चित्रपट पाहताना त्यांचा हा हेतू सफल झाल्याचं लक्षात येतं. मानवी नात्यातील माणुसकीचा आणि विश्वासाचा ओघ वाहता ठेवण्यासाठी या चित्रपटांतून मांडलेले अंत:प्रवाह देखील आपल्यापर्यंत नेमकेपणाने पोहचतात हे त्यांचे यश आहे.

**– संतोष पाथरे**
भ्रमणध्वनी : ८१६९१७०८२७
santosh_pathare1@yahoo.co.in

॥ग्रंथाली॥

प्रांजळपणा हे 'मी पुष्पा कांबळे' या आत्मकथनाचे सगळ्यांत महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरले आहे. ते कुठेही अवसान आणताना किंवा अशा तऱ्हेच्या रूढ आत्म कथनांच्या चतुर रचनेत अडकताना दिसत नाही. हा प्रांजळपणा पराभूत मनोवृत्तीतून किंवा हतबलतेमधून आलेला नसून आयुष्याशी दोन हात करण्याच्या मनोवृत्तीतून आलेला आहे, हेही लक्षात घेतले पाहिजे. आणि म्हणूनच हे आत्मकथन समान प्रकारच्या व्यथा वेदनांना सामोरे जाणाऱ्या माता–भगिनींना सन्मानाने जगण्यासाठी नवे बळ देईल याविषयी 'ग्रंथाली'ला खात्री आहे.




मी पुष्पा कांबळे

**पुष्पा कांबळे**


**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत ९० रुपये**

जागतिकीकरणानंतर अनुवादाच्या नव्या संधीही निर्माण झाल्या
त्याचबरोबर नवनव्या आव्हानांची जाणीवही अनुवादक म्हणून होऊ लागली...

# मनोरंजन क्षेत्रात अनुवादाच्या संधी आणि आव्हाने

**नेहा सावंत**

१९९० चा कालखंड एकूणच स्थित्यंतराचा मानला जातो. जागतिकीकरणाचे वारे या काळापासूनच जोरकसपणे वाहू लागले आणि त्याचा प्रभाव आणि परिणाम सर्वच क्षेत्रावर अगदी खोलवर झालेला दिसू लागला. आधुनिक तंत्रज्ञान, आर्थिक सुबत्ता, नवे अर्थकारण, आंतरराष्ट्रीय व्यापारउदीम अशा सर्वच क्षेत्रात या जागतिकीकरणाने आमूलाग्र बदल घडवून आणला. माणसाची वर्तनशैली, राहणीमान, विचारव्यूह सारेच बदलू लागले, पर्यायाने मानवी संस्कृतीही बदलली. नव्या नीतिमूल्यांचा, विचारव्यूहांचा शिरकाव होऊ लागला. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिकक्षेत्रात स्थित्यंतरे घडू लागली. कलेचे क्षेत्रही विशेषत: मनोरंजनाचे क्षेत्रही याला अपवाद नव्हते. एकीकडे संगणक, माहिती तंत्रज्ञान, आंतरजाल यामुळे जग जवळ येत चालले होते. या नव्या यांत्रिक-तांत्रिक बदलाचा प्रभाव मनोरंजन क्षेत्रात विलक्षण दिसून येत होता. आकाशवाणी, दूरदर्शन, वृत्तपत्रे या प्रसार-माध्यमावरही जागतिकीकरणाचा विलक्षण परिणाम दिसून येत होता. खास करून आकाशवाणी आणि दूरदर्शन या प्रभावी माध्यमांमध्ये नवनवीन वाहिन्यांची निर्मिती होत होती. त्यामुळे या क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी 'खुल जा सिमसिम' म्हणत संधीची कवाडं खुली झाली होती. एक कलाकार या नात्याने मी या काळाची साक्षीदार होते. त्या काळात आलेले अनुभव मी या लेखाद्वारे मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. 'चित्रपट, चित्रमालिका आणि त्या क्षेत्रातील डबिंग कला' अशी मर्यादा मी हा लेख लिहिताना घालून घेतली आहे.




अनुवाद किंवा भाषांतर म्हणजे एखाद्या भाषिक प्रणालीमध्ये असणाऱ्या संहितेची (स्रोत भाषेत अथवा बोलीत असणारी संहिता) दुसऱ्या एखाद्या भाषिक प्रणालीत किंवा लक्ष्य भाषेत केलेली हुबेहूब प्रतिकृती' होय. साहित्य, विज्ञान, तंत्रज्ञान, प्रशासन, प्रसारमाध्यम अशा अनेक क्षेत्रांत अनुवादाच्या संधी उपलब्ध आहेत. अलीकडे मनोरंजन क्षेत्रात अनुवादाला महत्त्व आले आहे.

अलिकडच्या काळात भाषेचा नीट अभ्यास नसलेल्या अनुवादकाचे काम जाहिरातीतून प्रकर्षाने दिसून येते. हिंदीतील 'किटाणू' या शब्दाला तितक्याच वजनाचा, लिपसिंक होणारा 'विषाणू' हा शब्द असतानाही 'किटाणू' हाच शब्द सर्रास वापरलेला दिसतो. दागधब्बे, तैयार, अधिकतम या शब्दांना योग्य पर्याय असतानाही ते जसेच्या तसे वापरलेले दिसतात.

'सबटायटल' या प्रकारचा अनुवाद तुलनेने सोपा असतो कारण तो जसा शब्दानुरूप असतो तसाच काही वेळा संक्षिप्त स्वरूपात व संवादाचा भाव पोचविणारा असतो. सेकंदाला आठ अक्षरे अशा मीटरमध्ये साधारण हा अनुवाद बसवावा लागतो. तसे डबिंगच्या अनुवादाचे नसते. तेथे शाब्दिक अनुवाद, भावानुवाद, रूपांतरण असे अनेक प्रकार योजावे लागतात. चित्रपटातील भूमिकेची भावच्छटा नेमकेपणाने व्यक्त करणाऱ्या शब्दांची मांडणी करावी लागते. (डबिंग करणारा कलाकार ते संवाद ध्वनिमुद्रित करताना पडद्यावरील कलाकाराप्रमाणेच अभिनय अथवा हातवारे करून नेमका परिणाम साधण्याचा प्रयत्न करत असतो.) अशा प्रकारचा अनुवाद करणं खरंच आव्हानात्मक असतं कारण पडद्यावरील संवादाचा कालावधी, उच्चारांचा आरोह-अवरोह, संवादामधील विराम, श्वासोच्छ्वास यांचा अभ्यास जसा डबिंग करणाऱ्या कलाकाराला करावा लागतो तसाच तो अनुवादकालाही करावा लागतो.

उदा.- एखाद्या तामीळ चित्रपटाचा अनुवाद मराठीत करायचा असेल तर तामीळ भाषेची गती, बोलण्यातली आक्रमकता नेमकेपणाने साधली नाही तर त्याचा परिणाम अनुवादित चित्रपटावर होण्याची शक्यता असते. कारण मराठीतील एखादे वाक्य जर पाच शब्दात संपत असेल तर तेच वाक्य तामीळ भाषेत आठ शब्दात संपते किंवा पाच शब्दात संपणारे असले तरी ते शब्द भलेमोठे असू शकतात. अशा वेळी स्रोत भाषेच्या (तामीळ) मीटरप्रमाणे लक्ष्य भाषेतील (मराठी) संवाद ताणावे लागतात किंवा मनोरंजनक्षेत्र म्हणत असताना चित्रपट, मालिका, नाटक, गीत, जाहिरात अशी विविध रूपे आपल्याला दिसतात. जागतिकीकरणामुळे बोलीभाषेवर जो परिणाम झाला, त्याचे प्रभावी

चित्र या विविध रूपांतून जाणवू लागले. अनुवादाच्या नव्या संधीही निर्माण झाल्या, त्याचबरोबर नवनव्या कसोट्यांची, आव्हानांची जाणीवही अनुवादक म्हणून होऊ लागली.

१५ ऑगस्ट १९९९ या कालखंडात दूरदर्शनवर नवनवीन वाहिन्या निर्माण झाल्या. 'अल्फा मराठी' नावाची वाहिनी (जी सध्या 'झी मराठी' या नावाने सर्व परिचित आहे.) 'ई टीव्ही', 'तारा वाहिनी', 'प्रभात वाहिनी' अशा अनेक वाहिन्यांची रेलचेल सुरू झाली आणि अभिनय, डबिंग, अनुवाद अशा विविध क्षेत्रात कलाकारांना संधी मिळू लागल्या. कामं आणि पैसा मिळवण्याच्या नादात कुणीही अनुवादक म्हणून शिरकाव करू लागले परंतु भाषेवरील प्रभुत्व, स्रोतभाषा आणि लक्ष्यभाषा याबद्दलचे अज्ञान, भाषेची लय, शैली याविषयीची अनास्था, अपुरा शब्दसंचय, शब्दांच्या अर्थच्छटेविषयीचे अज्ञान या साऱ्यामुळे अशा अनुवादित मालिकांना प्रेक्षकांचा म्हणावा तितका प्रतिसाद मिळू शकत नाही पण असे असले तरी उत्तम अनुवादकांना आणि उत्तम डबिंग कलाकारांसाठी हे क्षेत्र आजही आव्हानात्मक आहे हे नक्की. एक डबिंग कलाकार आणि अनुवादक या दृष्टीने मला आलेल्या अनुभवांच्या आधारे मी काही निरीक्षणे नोंदवणार आहे.

'चित्रपट आणि चित्रमालिकांच्या क्षेत्रात अनुवाद प्रक्रियेला महत्त्वाचे स्थान आहे, परंतु एक गोष्ट ध्यानात घ्यायला हवी की, इतर क्षेत्रातील अनुवादाप्रमाणे हा अनुवाद 'लेखन किंवा शैक्षणिक स्वरूपाचा नसतो तर त्यात अनेक तांत्रिक व आर्थिक बाजूही समाविष्ट असतात.' चित्रपट आणि चित्रमालिकांच्या अनुवादाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रेक्षकाला तो चित्रपट पाहताना आपण अनुवाद पाहत आहोत हे भान नसते. एखाद्या साहित्यकृतीचा अनुवाद वाचताना वाचकाला ती जाणीव पुरेपूर असते. चित्रपट आणि मालिकांचा अनुवाद दोन प्रकारे दिसून येतो. १) सब टायटल स्वरूपात म्हणजे चलचित्रासोबत त्या चित्रपटाचे संवादही पडद्यावर तळाशी दिलेले असतात. २) डबिंग स्वरूपात म्हणजे मूळ चित्रपट एखाद्या स्रोत भाषेत असेल तर त्याचे डबिंग एखाद्या लक्ष्य भाषेत असते. अशावेळी डबिंग करणाऱ्या कलाकाराचे कसब त्या संवादाच्या प्रभावी प्रकटीकरणात असते. मात्र खरे आव्हान स्वीकारावे लागते ते अनुवादकाला! त्या अनुवादकाचे स्रोत भाषा व लक्ष्य भाषा या दोन्हीवर प्रभुत्व असावे लागते. दोन्ही भाषांच्या व्याकरणाचा, शैलीचा, संस्कृतींचा अभ्यास असावा लागतो. एखाद्या साहित्यकृतीच्या अनुवादापेक्षा 'डबिंग'साठी केला जाणारा अनुवाद अधिक आव्हानात्मक असतो. 'डबिंग' प्रक्रियेचेही दोन प्रकार असतात.

१) चित्रपटाच्या शूटिंगच्या वेळी कलाकार संवाद म्हणत असताना आजूबाजूच्या गडबड गोंधळाचा शिरकाव झाल्यामुळे अनेक अडथळे येतात, म्हणून वातानुकूलित, बंदकुपीप्रमाणे असलेल्या रेकॉर्डिंग स्टुडिओत लिखित संहितेबरहुकूम व चित्रित केलेल्या संवादानुरूप कलाकार आपापले संवाद म्हणत असतो.

२) दुसरा प्रकार म्हणजे स्रोतभाषेत चित्रित केलेल्या चित्रपटाचे लक्ष्यभाषेत अनुवाद करून त्याचे ध्वनिमुद्रण करणे. हा दुसरा प्रकार अधिक आव्हानात्मक असतो. (अनुवादकाच्या दृष्टीने) येथे अनुवादकाला केवळ संवादांचा अनुवादच करायचा नसतो, तर डबिंगच्या तंत्रज्ञानाचेही व तंत्राचेही उत्तम ज्ञान असावे लागते. उदाहरण द्यायचे झाल्यास एखाद्या हिंदी चित्रपटातला नायक ''माँ मुझे सुजीका हलवा दो' असा स्रोत भाषेतील संवाद म्हणत असेल तर मराठीसारख्या लक्ष्यभाषेत त्याचा अनुवाद करताना, ''आई, मला शिरा दे' असेच म्हणणार. परंतु हे जेव्हा दृश्यस्वरूपात प्रेक्षक पाहतो त्यावेळी तो संभ्रमित होतो कारण पडद्यावर संवादानुरूप अभिनेत्याच्या ओठांची होणारी हालचाल आणि संवाद ऐकतानाची उच्चारप्रक्रिया यात समन्वय साधला जात नाही. अशावेळी प्रेक्षकाचा रसभंग होण्याची शक्यता असते, याचे भान अनुवादकाला ठेवून मूळ संवादातील अर्थ आणि लय तसेच उच्चारणशैली लक्षात घेऊन अनुवाद करावा लागतो. या अनुवादकाला स्रोतभाषा व लक्ष्यभाषेचे व्याकरणही पूरेपूर अवगत असावे लागते, अन्यथा तो प्रभावी अनुवाद होऊ शकत नाही. पडद्यावर बोलणाऱ्या कलाकाराच्या स्वर, व्यंजनांचा अभ्यास अनुवादकाला करावा लागतो. उदा. हिंदी भाषेत 'क्या मैं अंदर आ सकती हूँ? असा संवाद असेल आणि तो 'क्लोज शॉट'मध्ये असेल तर ''काय मी आत येऊ शकते?'' हे हिंदीभाषेबरहुकूम व शब्द योजले जातात. त्या अर्थच्छटांचे सूक्ष्म पदर उलगडविण्याचे सामर्थ्य अनुवादकाकडे असावे लागते. अन्यथा एखाद्या कलाकाराचा निकटचे दृश्यीकरण (close up shot) असेल आणि मूळ संवादाच्या संवादाच्या निकट जाणाऱ्या शब्दांची योजना जर अनुवादकाने केली नसेल तर चित्रित झालेला संवाद आणि डब केलेला संवाद यांत ताळमेळ राखला जात नाही. म्हणूनच अशा अनुवादकाकडे शब्दसंग्रह विपुल प्रमाणात असावा लागतो, त्या शब्दातील अर्थांच्या सूक्ष्म भेदांचे ज्ञान असावे लागते. हे कार्य जितके जिकिरीचे तितकेच जोखमीचे असते, परंतु सफल झाले तर अर्थातच नवनिर्मितीचा आनंद देणारे असते कारण त्यावरच त्या चित्रपटाचे वा मालिकेचे यशापयश अवलंबून असते. (टायटॅनिक, बाहुबली, हॅरी पॉटर अशा अनेक चित्रपटांची उदाहरणे देता येतील.)

जाहिरात, चित्रपट, मालिका, नाटक, ध्वनिमुद्रण अशा मनोरंजनाच्या विश्वात भरपूर संधी उपलब्ध आहेत. आर्थिकदृष्ट्या यश देणाऱ्या आहेतच तसेच मानमरातबही मिळवून देणाऱ्या आहेत. या अनुवादप्रक्रियेमुळे अनेक परकीय चित्रपटाचा, मालिकांचा आस्वाद रसिकांना घरबसल्या घेता येतो. तसेच अनेक चित्रपटांचा परिचय होतो ही जमेची बाजू म्हणायला हवी. चित्रपट अनुवाद, मालिका अनुवाद, जाहिरातींचा अनुवाद हा स्वतंत्र व्यवसाय म्हणूनही स्वीकारावा इतक्या संधी मनोरंजन क्षेत्रात उपलब्ध होताना दिसत आहेत.

मनोरंजन क्षेत्रातील अनुवाद हा अर्थातच एखाद्या साहित्यकृतीच्या अनुवादाइतका स्वतंत्र आणि सृजनशील असेलच असे नाही. तांत्रिक बाजूमुळे या अनुवादाला बऱ्याचशा मर्यादा पडलेल्या दिसतात. असे असले तरी या क्षेत्रात अनेक संधी

उपलब्ध आहेत तसेच तांत्रिकतेमुळे येणाऱ्या मर्यादांवर मात करता येण्याची परिस्थितीही पुढील काळात निर्माण करता येऊ शकते, असे म्हणायला हरकत नाही. मनोरंजनाचे क्षेत्र हे सर्वव्यापी व विशाल असल्यामुळे मनोरंजन साधनांच्या माध्यमातून वापर इतर क्षेत्रात उदा. कॉर्पोरेट विश्व, शैक्षणिक विश्व, तंत्रज्ञानक्षेत्र अशा अनेक ठिकाणी करून अनुवादाच्या कलेचे उपयोजन करता येईल.

अधिकच्या शब्दांची योजना करून स्रोत भाषेच्या गतीप्रमाणे, लयीप्रमाणे मूळ भाषाभिव्यक्तीला बाधा न आणता नेमका परिणाम साधावा लागतो. अनेकदा तामीळ-हिंदी-मराठी अशा स्वरूपात अनुवाद असतो. येथे तो अनुवादाचा अनुवाद असतो.

हिंदी पौराणिक मालिकांचे किंवा चित्रपटांचे मराठी लक्ष्यभाषेत अनुवाद करताना फारसे कष्ट पडत नाही कारण बहुतेक पौराणिक मालिका, चित्रपटांचे संवाद संस्कृतप्रचुर असल्याने दोन्हीकडे संस्कृतप्रचुरतेचा प्रयोग सारखाच करता येतो. (रामायण व महाभारत या मालिकांचे अनुवाद करताना मला याचा प्रत्यय आला आहे.) परंतु अशा मालिकांचे आंतरराष्ट्रीय किंवा परकीय भाषेत अनुवाद करताना बरेच अडसर येतात कारण परकीय आणि भारतीय संस्कृती विभिन्न असल्यामुळे, पुराणांचा परिचय नसल्यामुळे अनुवाद जटिल होऊ शकतो. येथे मला दिवंगत कविवर्य शंकर वैद्य यांचा एक किस्सा सांगावासा वाटतो. कवी शंकर वैद्य यांचे 'स्वरगंगेच्या काठावरती वचन दिले तू मला' हे अजरामर गीत आहे. या गीताचा इंग्रजीत अनुवाद करावा असे एका परदेशी मित्राला वाटले पण तो 'वदलीस तू ती सावित्री मी, शकुंतला की मी दयमंती' या ओळीलाच अडला कारण सावित्री, शकुंतला, दमयंती ही केवळ स्त्रीवाचक नामे नव्हेत, त्यामागे प्राक्कथा आहेत. पुराणसंस्कृती आहे. ती कशी अनुवादित होणार? अशावेळी याच व्यक्तिरेखांप्रमाणे जवळ जाणाऱ्या परकीय संस्कृतीतील व्यक्तिरेखा माहीत असल्याशिवाय केवळ संदर्भासाठी तळटीप देऊन अनुवाद साधता येईल पण तो स्रोत भाषेतील रचनेइतका प्रभावी असेल का? हा प्रश्न उरतोच.

'डबिंग'चा अनुवाद करताना मोठे आव्हान असते ते गीताचे किंवा गाण्याचे डबिंग करताना. चित्रपटात किंवा मालिकेत ते पार्श्वगायन असेल, (व्हॉईस ओव्हर) म्हणजेच मुख्य कलाकारांवर ते चित्रित केलेले नसेल तर फार अडचण येत नाही. परंतु ते जर मुख्य कलाकारांवर चित्रित असेल तर अनेक गोष्टींचे भान ठेवावे लागते. कलाकारांच्या ओठांच्या हालचालीनुरूप शब्दांची रचना, मूळ गीताच्या चालीत, लयीत बसणाऱ्या शब्दांची रचना, मूळ गीताचे संगीत या साऱ्याचे भान गीतानुवादकाला ठेवावे लागते.

उदा. मराठीत प्रेम किंवा प्रित हा शब्द एकाच अर्थाने योजला जातो. हिंदीत मात्र प्यार, प्रेम, इष्क, मोहब्बत असे (उर्दू) अनेक भाषिक कलाकृती स्रोतभाषेतून लक्ष्यभाषेत आणण्याच्या दृष्टीने अनुवादाची प्रक्रिया महत्त्वपूर्ण व उपयोगी ठरू शकते. परकीय भाषेतील कलाकृती भारतीय भाषांमध्ये आणण्यासाठी किंवा भारतीय भाषांतील कलाकृती परकीय भाषेत नेण्यासाठी, अनुवादप्रक्रिया महत्त्वाची ठरू शकते. मनोरंजनाच्या क्षेत्रात पुढील स्तरावरील अनुवादाच्या संधी अधिकाधिक उपलब्ध होताना दिसत आहेत.

१) पाश्चात्त्य भाषांतून भारतीय भाषांमध्ये अनुवाद

२) प्रांतिक बोलीतून प्रमाणभाषेत अनुवाद

३) भारतीय भाषेतून भारतीय (प्रादेशिक) भाषेत अनुवाद

अलीकडे कोकणी, वऱ्हाडी, खानदेशी, मालवणी अशा अनेक बोलींतून मालिकांची निर्मिती होताना दिसते. बऱ्याचशा प्रेक्षकांना, रसिकांना या बोलीचे आकलन होत नाही, अशावेळी प्रमाणभाषेतून (सब टायटल) देण्याचा प्रकारही सुरू व्हायला हरकत नाही. अशावेळी स्रोतभाषा (बोली) आणि लक्ष्यभाषा (प्रमाणभाषा) यावर प्रभुत्व असणाऱ्यांसाठी अनुवादाच्या क्षेत्रात नव्या संधी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

संदर्भ :

- अनुवाद की सामाजिक भूमिका - डॉ. रीतारानी पालीवाल
- भाषा आणि जीवन, एप्रिल-सप्टेंबर २०१५

**- नेहा किशोर सावंत**

भ्रमणध्वनी : ९९२०१८०१८३

nehasawant003@yahoo.co.in

**ग्रंथाली**

कवीचा भवताल कवितेत येतो तो जसाच्या तसा येत नाही. त्या भवतालाच्या व्यक्तींवर होणाऱ्या परिणामांसह येतो. पद्मरेखा धनकर यांच्या कवितेत हा भवताल आलेला आहे. सध्याच्या भवतालाचं एक रूप झुंडीच्या भीतीच्या रूपानं येतं. या सम ाजव्यवस्थेत व्यक्तीला दोरांनी कसं जखडून ठेवलेलं आहे हेही जाणवत राहतं. हे वास्तव या संग्रहातल्या कवितांतून थेटपणे व्यक्त झालेलं आहे.

**- वसंत आबाजी डहाके**



# फक्त सैल झालाय दोर

**पद्मरेखा धनकर**

**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत ९० रुपये**

**अस्सल वाचक सतत काहीतरी नवं शोधत राहतो. या शोधात अन्य भाषांमधली पुस्तकं हमखास असतातच. या नव्या सदरातून वाचता-वाचता सापडलेल्या अशाच काही पुस्तकांविषयी...**

# सुरांची नवी गाथा

**गणेश मनोहर कुलकर्णी**

वाचनाच्या प्रवासात अनेक पुस्तके आपल्याकडे येतच असतात. नुकतेच यतींद्र मिश्र यांनी लिहिलेले हिंदीतले 'लता सुरगाथा' हे पुस्तक हाताशी आले. तब्बल ६५० पानांचे पुस्तक एका बैठकीत वाचून संपवले तेव्हाच स्वस्थता लाभली. इतक्या बारीक-बारीक गोष्टी नव्याने समजत गेल्या की विचारता सोय नाही. लता दीदींचे गाणे ऐकतच आपली पिढी लहानाची मोठी झाली. त्यांच्यावरचं इतके छान पुस्तक मराठीत अभावानेच आले असावे. लता दीदींबद्दल अनेकांनी लेख लिहिले आहेत. दीदींशी आपुलकीने गप्पा मारणारे, त्याच्यावर लेख लिहिणारे, अनेक आहेत, पण नीट अभ्यास करून, सामान्यांना समजेल अशा भाषेत मांडणारे फारच थोडे. त्यापैकीच एक यतींद्र मिश्र आहेत. तब्बल ६ वर्षे निव्वळ फोनवर बोलून हे पुस्तक सिद्ध झालेलं आहे. माणूस फोनवर त्याच्याशीच मोकळेपणाने बोलतो ज्याच्यावर विश्वास असतो. दीदींचा विश्वास लेखकाने कमावला आहे. रोज संध्याकाळी सातची वेळ फोनवर बोलण्याची ठरलेली असायची. कधी-कधी बोलणे संपून फोन बंद केल्यावर देखील दीदींचा फोन लेखकाला जायचा. एखादी आठवण, एखादा किस्सा परत नव्याने सांगितला जायचा. एकदा लेखकाने फोन करायला तब्बल अर्धा एक तास उशीर केला. दीदी रागावल्या नाहीत, पण संभाषण संपताना इतकेच म्हणाल्या की, 'माझं पडद्यावरचं गाणं फार-फार तर तीन ते चार मिनिटांचं असायचं आणि आज फोनला तीस मिनिटे उशीर म्हणजे किती गाणी तुम्ही चुकवलीत ते तुम्हीच बघा.' अशा शेलक्या शब्दातला अहेर दीदींकडून मिळाल्यानंतर वेळेवर फोन न करण्याची लेखकाची काय बिशाद?

या पुस्तकात दीदींनी त्यांच्या लहानपणापासूनचा सगळा संघर्ष स्वत:च्या शब्दात सांगितला आहे. त्यांच्या आयुष्यातल्या अनेक आठवणी प्रथमच या पुस्तकातून रसिकांसमोर आल्या आहेत. दीदींचा मिश्किल स्वभाव तर पानापानातून जाणवतो. त्यांचा आवाज काळाला ओलांडून जाणारा होता यावर तमाम संगीतकारांचा विश्वास होता.




शास्त्रीय गाण्यातले बरेच जण आक्षेप घेतात की दीदींना शास्त्रीय गायन जमलं नसतंच पण ताईंची शास्त्रीय गायनाची तालीम पक्की होती. त्यांच्या संगीताच्या शिक्षणाची सुरुवातच हंसध्वनीसारख्या रागाने झाली होती असे त्या स्वत:च सांगतात. दीदींबद्दल पं. अशोक रानडे लिहितात की, दीदींच्या आवाजातल्या तीन ते चार मिनिटांच्या गाण्याने एखादा अनवट राग देखील प्रस्थापित होतो. एक अख्खी पिढी गाणं शिकायला दीदींमुळे बाहेर पडली असेही लेखक आपल्याला समप्रमाण दाखवून देतो.

दीदींनी आपल्या मदतनीसांबद्दल फारच ममत्वाने यात लिहिलं आहे. गुलाम हैदरने केलेली सुरुवातीची मदत, कवी शैलेंद्रचं आजारपणात रोज येऊन दीदींशी गप्पा मारणं अशा अनेक खाजगी गोष्टींबद्दल दीदी मोकळेपणाने बोलतात. त्या काळात दीदींना आपलं नावही रेडिओवर ऐकायला यावं म्हणून स्वत:च एखाद्या गाण्याची त्या फर्माईश पाठवायच्या. जेव्हा रेडिओ घ्यायची ऐपत आली तेव्हा घरी येऊन रेडिओवर गाणी ऐकता-ऐकता मध्येच गाणे थांबवून के. एल. सैगल गेल्याची बातमी दिल्यावर त्यांना तोच रेडिओ अपशकुनी वाटला, म्हणून त्यांनी तो परत केला. चित्रपटक्षेत्रात शकुन-अपशकुन यांचं जरा प्रस्थच असतं. एकदा प्रसिद्ध संगीतकार चित्रगुप्तांचं गाणं रेकॉर्ड होणार होतं. स्वत: चित्रगुप्त लंगडत-लंगडत स्टुडिओत येताना बघून दीदींचा जीव कळवळला. त्या त्यांना म्हणाल्या काही होतंय का? तर चित्रगुप्त आपली चप्पल दाखवत म्हणाले अगं काही नाही, या चपलेचा अंगठा तुटला आहे. दीदींना वाईट वाटले. म्हणाल्या, ''चला आपण अगोदर तुम्हाला नवीन चप्पल घेऊया. मग गाणे रेकॉर्ड करू.'' तर चित्रगुप्त दीदींना थांबवत म्हणाले, ''अगं असूदे, माझ्याकडे चपला बऱ्याच आहेत, पण ही माझी लकी चप्पल आहे म्हणून मी रेकॉर्डिंगला याच चपला घालतो.'' अशा अनेक किश्शांची पुस्तकभर पखरण आहे.

स्वत:च्या कष्टांच्या दिवसांबद्दल बोलताना देखील दीदी उगाच करूण होत

नाहीत. त्यांच्या गाण्यातला दर्द / नजाकत, शब्दोच्चार या सगळ्या मागे दीदींची तपश्चर्या होती. उपाशी तापाशी राहून स्टुडिओतल्या; धूळ मातीत बसून वेळी अवेळी गायलेली दीदींची अजरामर गाणी आपल्यास आजही सुखावतात, अपार आनंद देतात, पण त्या मागे उपसलेले कष्ट वाचून वाचकही बऱ्याचदा हळवा होऊन जातो. सुरुवातीला एका मंदिराशेजारी दीदींचं वास्तव्य होतं. सकाळच्या वेळी दीदी आपल्या गाण्याचा रियाज त्या मंदिरात बसून करायच्या त्यावर लेखक म्हणतो की, असला सुरमयी आवाज ऐकायला देवही प्रत्यक्ष तिथे हजर होत असावेत.

दीदींना नाझिर हिकमतच्या कविता आणि कवी माहीत होता हे वाचून तर मी आश्चर्यचकितच झालो. तुर्कस्तानच्या बंडखोर नाझिर हिकमत या कवीला शिक्षा म्हणून संडासच्या टाकीत बुडवून ठेवायचे. त्यातूनही तो आपल्या कविता जोरकसपणे म्हणत रहायचा. त्याच्यावर लक्ष ठेवणारे सैनिकच नंतर त्याची कविता म्हणायला लागले. अशा कवीची माहिती करून घेणे, त्याबद्दल संवेदना व्यक्त करणे खरेच अचाट आहे. त्या काळातले हे संवेदनशीलतेचं एक दुर्मीळ लक्षण आहे. अनेक मोठ्या कलाकारांच्या सहवासामुळे माझं गाणं समृद्ध झालं असं त्या कबूल करतात. शास्त्रीय संगीतातले दिग्गज ऐकताना त्यांच्या सारखी तान आपल्याला घेता यावी असा प्रयत्न सतत दीदींनी केला आणि काही गाण्यात तो अंमलातही आणला. दीदींना एकटं भटकायला खूप आवडतं, पण प्रसिद्धीच्या झोतामुळे ते दिवसेंदिवस अवघड होत गेलं. याच कारणास्तव म्हणजे सफलतेची किंमत म्हणून माझा भारत बघायचा मात्र राहून गेल्याची खंत दीदी व्यक्त करतात. अनेक संगीतकारांना भैरवी रागात गाणी रचायला खूप आवडायचं म्हणजे 'छोड गये बालम' (शंकर जयकिशन), 'छोड दे सारी दुनिया' (कल्याणजी आनंदजी), 'दिल का खिलौना हाय टूट गया' (वसंत देसाई) अशी या रागातली दीदींची गाणी अजरामर झाली आहेत, पण स्वत: दीदींना मात्र भैरवी गायला आवडत नाही, हे वाचून आपणही चमकतो. दीदी गाताना सूर पकडण्यासाठी एका व्हायोलीन वादकाला जवळ बसण्यास सांगत, यासारखे संदर्भ वेगळे आणि खरेच कालातीत आहेत.

एके ठिकाणी लेखक आपल्याला सांगतो आता वाचणं थांबवा आणि दीदींनी गायलेल्या एका दुर्लक्षित चित्रपटातील (शंकर हुसैन १९७७) खय्यामने संगीत दिलेलं गाणं ऐका. खरंच सांगतो 'अपने आप....' हे गाणं आज माझ्या संग्रहातलं खास गाणं ठरलं आहे. दीदींचा मखमली आवाज, खय्यामचं संगीत, कैफ भूपालीची रचना यात दीदींचा आवाज मन भरभरून राहतो. त्यांचं 'अपने आप...' म्हणणं आपल्याला पार हळवं करून टाकतं मग नकळत आपण दीदींच्या अनेक गाण्यांमध्ये असेच गुंतत जातो. पुस्तक बाजूला राहते. दीदींचा मुलायम आवाज आणि आपण इतकेच उरतो.

अनेक वादग्रस्त मुद्द्यांबद्दल लेखकाने दीदींना बोलतं केलं आहे. राजकपूर, एस्.डी. बरोबरचं भांडण, ओ.पी. नय्यर बरोबर न जुळलेला सूर आणि यातही सुमन कल्याणपूरकरबद्दल छेडले असता दीदींचे वाक्य काळजात घुसते. दीदी म्हणतात, 'प्रतिभा के साथ आपका मौलिक होना भी जरुरी है!' दीदींना खाण्यात जिलेबी आवडते किंवा मुंबईतल्या गेलॉर्ड हॉटेलमध्ये त्या काळातले तमाम संगीतकार, दिग्दर्शक एकत्र जमायचे आणि मजा करायचे हे ऐकून माहित होते, पण पुस्तकात वाचल्यानंतर अस्मदिक बरोड्यातल्या गेलॉर्डमध्ये नित्यनियमाने निदान चहा तरी पिण्यासाठी जातातच.

अगदी एके ठिकाणी दीदी केसांना कुठले तेल लावतात असाही प्रश्न लेखक करतो तेव्हा दीदी हसून याही प्रश्नाचे उत्तर मला द्यायला लागेल का? असे उलट विचारून साधेपणाने त्याचे उत्तर देऊन टकतात. अनेक पुरस्कार दीदींना मिळाले. अगदी भारतरत्नसारखा देखील तरीही तिरुपतीच्या देवस्थानाने दिलेला पुरस्कार दीदींना मोलाचा वाटतो आणि त्याहीपेक्षा सुरवातीस कष्टाच्या दिवसात माईंचे गमावलेले तमाम दागिने स्वत:च्या पैशाने परत करून दिल्यावर आईच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान दीदींना अधिक मोलाचे वाटते.

यतींद्र मिश्रसारख्या हिंदी लेखकाने ताईंचा कमावेलला विश्वास त्यांच्या संवादातून पानोपानी जाणवतो. ॲमेझॉनवर या पुस्तकाची चौकशी करताना आजतागायत एकट्या डोंबिवलीतच या पुस्तकाच्या तब्बल २६ प्रती विकल्या गेल्या आहेत असेही कळले. लताप्रेमींसाठी हे पुस्तक म्हणजे खरेतर एक पर्वणीच आहे. यात स्वत: दीदींनी आपल्या आवडत्या १६ गाण्यांची यादीही दिली आहे. संदर्भसूची / फोटो यामुळे पुस्तकाचा भारदस्तपणा नक्कीच वाढला आहे.

तब्बल ३६ भाषेत गायलेल्या दीदींचे सात्त्विक रूप या पुस्तकाने पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे!

**– गणेश मनोहर कुलकर्णी**
भ्रमणध्वनी : ९८१९९५७८५२
magnakul@rediffmail.com

'ग्रंथाली'च्या पुस्तकांना कव्हर करून देणारे चित्रकार सतीश भावसार यांच्या चुकीने 'धनगरगाथा' या पुस्तकाच्या कव्हर डिझाईनसाठी श्री. सत्यजित वरेकर यांचे चित्र वापरले गेले आहे, याबद्दल 'ग्रंथाली'ने पत्र लिहून दिलगिरी व्यक्त केली आहे. तसेच या कव्हरसाठी देण्यात येणाऱ्या मानधनाची रक्कम जी आम्ही कव्हर आर्टिस्टला देत असतो, ती रक्कम त्यांना दिली आहे. आम्ही सत्यजित वरेकर यांच्याकडून त्यांना मानधन देऊन दोन कव्हर्स करून घेणार आहोत. कलावंत म्हणून सत्यजित वरेकर यांना झालेल्या त्रासाबद्दल पुन्हा एकदा दिलगिरी व्यक्त करतो.

**– सुदेश हिंगलासपूरकर**
'ग्रंथाली'

# मराठी अभ्यास केंद्राचा 'महाराष्ट्र दिन'



आपल्या भागात आपला नगरसेवक करत असलेल्या कामाबाबत नागरिकांनी प्रश्न तर विचारलेच पाहिजेत, पण हे प्रश्न विचारताना संबंधित नगरसेवकाशी थेट संवादही साधला पाहिजे असे मत प्रवीण महाजन यांनी व्यक्त केले. मराठी अभ्यास केंद्राच्या सोशल सर्व्हिस लीग सभागृह, परळ येथे महाराष्ट्र दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

अधिकाधिक लोकांना मराठी भाषेच्या संवर्धन आणि सजग वापरासाठी जागृत करणे तसेच समाजामध्यामतील मराठीचा वापर वाढवणे यासाठी प्रबोधनपर सत्रांचे आयोजन मराठी अभ्यास केंद्राकडून महाराष्ट्र दिनानिमित्त करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात मराठी अभ्यास केंद्र आणि मुंबई विद्यापीठातील संज्ञापन आणि पत्रकारिता विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात आलेल्या 'माहिती अधिकाराद्वारे नगरसेवकाचे मूल्यमापन' प्रकल्पातून सिद्ध झालेल्या 'माझा प्रभाग – माझा नगरसेवक' ही १९ अहवालांची अहवालमालिका प्रकाशित करण्यात आली. त्यामध्ये मुंबई विद्यापीठातील १६ विद्यार्थ्यांचे अहवाल, मयुर मोरये – दीपक कापले ह्या कार्यकर्त्यांचा संयुक्तपणे केलेला अहवाल, ह्या प्रकल्पाचे समन्वयक आनंद भंडारे यांचा अहवाल आणि ह्या सर्व अहवालांचा संकलित अहवाल असे एकूण १९ अहवाल प्रकाशित करण्यात आले. यावेळी समर्थनचे अध्यक्ष प्रवीण महाजन, माहिती अधिकार कार्यकर्ते अनिल गलगली, प्रजा फाउंडेशनचे संचालक मिलिंद म्हस्के व मुंबई विद्यापीठाच्या संज्ञापन व पत्रकारिता विभागाचे प्रमुख संजय रानडे उपस्थित होते. प्रजा फाउंडेशनचे मिलिंद म्हस्के यांनी नगरसेवकांचे असे मूल्यमापन मोठ्या प्रमाणात सामान्य नागरिकांद्वारे होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले तर माहिती अधिकार कार्यकर्ते अनिल गलगली यांनी नगरसेवकांच्या अशा प्रकारच्या पारदर्शी मूल्यमापनामागे असलेले माहिती अधिकाराचे पाठबळ अधोरिखित केले. संजय रानडे यांनी चांगले पत्रकार घडण्यासाठी अशा प्रकारच्या प्रकल्पांचे महत्त्व विशद केले. संकेत वरक या विद्यार्थ्याने माहिती अधिकाराद्वारे नगरसेवकांची माहिती मिळवताना विद्यार्थ्यांना आलेल्या अडचणी मांडल्या. याप्रसंगी मराठी अभ्यास केंद्राच्या 'नागरिकायन' या आर्थिक-राजकीय गटाची स्थापना करण्यात आली. नागरिकांचे राजकीय-आर्थिक अधिकार आणि कर्तव्ये यांबाबत सजगता निर्माण करण्यासाठी सदर गटाची स्थापना करण्यात आली असून त्याअंतर्गत अधिकाधिक नागरिकांनी या गटात सहभागी व्हावे असे आवाहन या गटाचे प्रमुख आनंद भंडारे यांनी केले. मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष डॉ. दीपक पवार यांनी भाषेचे कार्य विशुद्ध साहित्यापुरते मर्यादित ठेवल्याने मराठी भाषेची आजवर हानी होत आलेली आहे. लोकांच्या मातृभाषेतून राज्यकारभार हाकल्यानेच पारदर्शी लोकशाही अमलात येऊ शकेल असे मत त्यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला वि.ग. वझे महाविद्यालयातील 'वीथी' रंगकर्मींनी 'मराठी शाळा' नावाची छोटीशी पण मार्मिक नाटिका सादर केली. यामध्ये मराठी शाळांची सद्यःस्थिती मांडली होती.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात कोरा (Quora) मराठीचे समुदाय व्यवस्थापक प्रशांत ननावरे यांनी कोरा मराठीच्या व्यासपीठावर जागतिक ज्ञानाची देवाणघेवाण मराठी भाषेत कशी केली जाते तसेच Quora मराठीअंतर्गत आपले योगदान आपण कसे वाढवू शकतो याविषयीचे सादरीकरण केले. या सत्राचे प्रास्ताविक साधना गोरे यांनी केले.

तिसऱ्या सत्रात 'उच्चशिक्षणात मराठीमधून विज्ञान – तंत्रज्ञान' या विषयावर बोलताना संगणकतज्ज्ञ डॉ. अभिजात विचारे यांनी मराठीतील तांत्रिक शब्द आणि त्याच अर्थाचे इंग्रजी शब्द यातील फरक समजावून सांगितला. उच्चशिक्षणातील मराठीच्या पिछेहाटला आपणच जबाबदार असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. सर ज. जी. कला महाविद्यालयातील डॉ. संतोष क्षीरसागर यांनी भाषेचा वापर ही सुद्धा एक कलाच आहे असे म्हणत नवीन पिढीकडून मी आशावादी आहे असे मत यावेळी मांडले.

चौथ्या सत्रात पत्रकार अलक धुपकर, भाषांतरकार आणि ब्लॉगर मेघना भुस्कुटे आणि बहुविध.कॉमचे संस्थापक किरण भिडे हे मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी मराठी अभ्यास केंद्राच्या संकेतस्थळाचे आणि 'मराठी प्रथम' ह्या ऑनलाईन नियतकालिकाचे प्रकाशन करण्यात आले. भाषेचा वापर सहज आणि सोपा असेल तरच तो सर्वसामान्य माणसांना कळू शकतो असे मत अलका धुपकर यांनी मांडले. 'मराठी प्रथम' हे भाषेसाठी वाहिलेले पहिलेच ऑनलाईन नियतकालिक असून त्याने अभिजनांपासून सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचण्यासाठी सर्व प्रकारच्या भाषेचा वापर केला पाहिजे असे प्रतिपादन मेघना भुस्कुटे यांनी केले. किरण भिडे यांनी विविध नियतकालिकांचे व्यासपीठ असलेले बहुविध.कॉमच्या कार्याची माहिती सांगितली. मराठी प्रथमचे संपादक प्रकाश परब यांनी आपल्या आजुबाजूला घडणाऱ्या भाषिक घडामोडी आणि वापर, प्रयोगशील मराठी शाळा, वाङ्मय मंडळे यांबाबत शिक्षक आणि भाषाप्रेमींना ह्या नियतकालिकासाठी marathipratham.com या मेलवर लेख पाठवण्याचे आणि bahuvidh.com/marathipratham ह्या दुव्यावर जाऊन मराठी प्रथमचे सभासद होण्यासाठी आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऐश्वर्या धनावडे आणि प्रतीक्षा रणदिवे यांनी केले.

# पुस्तक प्रकाशन

## क्रांतीचे पंख लेवून आलेली कविता 'गुंफण'

बुधवार, ३ एप्रिल २०१९ रोजी सायंकाळी ६ वाजता एमजीए क्रिकेट क्लब, पहिला मजला, वांद्रे येथे शिवकुमार आडे लिखित 'गुंफण' या कवितासंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले.




हा समारंभ अध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिक आणि विचारवंत समीक्षक डॉ. यशवंत मनोहर गझलनवाज, प्रमुख अतिथी पंडित भीमराव पांचाळे, तसेच प्रा. विनोद कुमरे, सुदेश हिंगलासपूरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

सुरुवातीला 'ग्रंथाली'तर्फे सुदेश हिंगलासपूरकर यांनी प्रस्तावना मांडली.

त्यानंतर प्रा. विनोद कुमरे यांनी आदिवासी म्हणजे कोण? आदिवासी साहित्य संस्कृतीची गरज या देशाला का आहे? त्याचे महत्त्व काय आहे? आदिवासी साहित्यकारांनी पुढे यायला पाहिजे. त्यांना लेखणीतून समाजातील वेदना, शोषण, आक्रोश व्यक्त व्हावा व त्यामुळे समाज जागा व्हावा असे विचार त्यांनी मांडले. गझलनवाज भीमराव पांचाळे यांनी 'गुंफण'च्या प्रकाशन सोहळ्याला शुभेच्छा दिल्या. त्यानंतर शिवकुमार आडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, माझा गुंफण कवितासंग्रह हा क्रांतीचा पासवर्ड आहे. क्रांतीचे पंख फुटलेल्या मनाची ही कविता आहे. आदिवासी समाजातील दु:ख, वेदना, आक्रोश असा मनातला कोलाहल गुंफणच्या रूपाने मांडला आहे. माझ्या समाजातील बांधव पुढे यावा आणि त्यांनी आपल्या हक्कासाठी एल्गार पुकारावा ही इच्छा आहे.

लेखक कवी डॉ. यशवंत मनोहर म्हणाले, मित्रांनो भूतकाळ विसरा. आपला वर्तमान मोठा करा. आदिवासी साहित्य समाजासमोर आलं पाहिजे. त्यांच्या वेदना, दु:ख प्रश्न समाजासमोर मांडले पाहिजेत. साठोत्तरी साहित्यातून असलेला विजांचा लखलखाट, मेघांचा गडगडाट, वेदनांचा पावसाळा नव्या जीवनाकडे जाणारी प्रकाशवाट यातून निर्माण झालेले परिवर्तनाचे पडघम. हे परिवर्तनाचे पडघम साहित्यातून आपण बघत आहोत. हे परिवर्तन मोठ्या प्रमाणात व्हावे यासाठी समाजातील उपेक्षित घटकांनी पुढे यावं, आपल्या वेदना-आक्रोशाला, दु:खांना, प्रश्नांना मांडणारं साहित्य निर्माण व्हावं, असे विचार व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्योती भगत यांनी केले.

या कार्यक्रमाचा दुग्धशर्करा योग म्हणजे गझलनवाज भीमराव पांचाळे यांची गझल मैफल!

**प्रतिनिधी**

## 'घातसूत्र'च्या तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन

''युद्ध हे घडून येत नसून ते घडविले जात आहे. कारण आजच्या काळात युद्ध म्हणजे विजय व पराभव नसून तो एक 'बिझनेस प्लॅन' आहे. या प्लॅनद्वारे शस्त्रास्त्रांच्या कंपनी चालविल्या जातात. कंपन्यांद्वारे रोजगार उपलब्ध केला जातो. सध्याच्या काळात युद्ध हे लादलेच जाणार असून ते कधीही आपसूक होणार नाही असे मत अभिनेते व अर्थतज्ज्ञ दीपक करंजीकर यांनी व्यक्त केले.




'आशा फाउंडेशन'तर्फे रविवारी जळगाव येथील गणपती नगरातील रोटरी भवन येथे करंजीकर लिखित 'घातसूत्र' पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी कुलगुरू डॉ. के.बी. पाटील, सी.ए. अनिल शाह, 'आशा फाउंडेशन'चे संचालक गिरीश कुलकर्णी, 'दीपस्तंभ फाउंडेशन'चे संचालक यजुर्वेंद्र महाजन, 'परिवर्तन' संस्थेचे शंभू पाटील आदी उपस्थित होते. पुस्तक प्रकाशनाआधी घातसूत्र पुस्तकातील काही भागांचे अभिवाचन मृण्मयी कुलकर्णी, युजवेंद्र महाजन, शंभू पाटील यांनी केले.

दीपक करंजीकर म्हणाले की, अमेरिकेच्या इतिहासातील दुर्दैवी घटना म्हणजे न्यूयॉर्कमधील वर्ल्ड ट्रेड सेंटरवर हल्ला. या घटनेच्या वेळी अमेरिकेत असताना संपूर्ण देश हादरलेला पाहायला मिळाला होता. मात्र, काही दिवसांनी अमेरिकेच्या बाजारपेठांमध्ये वर्ल्ड ट्रेंड सेंटरच्या दुर्घटनेचे फोटो असलेले टी-शर्ट विकले जात होते. सर्वात मोठी दु:खदायक घटना विसरून येथील लोक सावरले होते असेच वाटत होते. मात्र, ते चित्र खूप अस्वस्थ करणारे होते कारण येथील नागरिक प्रत्येक घटनेमागे आपले आर्थिक गणित मांडत असतात. मात्र, अशा प्रकारे दुर्दैवाच्या वस्तूची विक्री करणे विदारक असल्याचे ते म्हणाले.

## 'सृजनशील जगन्मित्र'




नुकताच रामनवमीच्या पवित्रदिनी 'सृजनशील जगन्मित्र' ह्या पुस्तकाचे प्रकाशन नागपूरमध्ये झाले. परराष्ट्रखात्याचे निवृत्त सचिव माननीय डॉक्टर ज्ञानेश्वर मुळे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडणारे व त्यांचा प्रेरणादायी जीवनप्रवास वर्णन करणारे हे पुस्तक आहे. डॉक्टर ज्ञानेश्वर मुळे हे एक उत्तुंग व्यक्तिमत्व. आणि असं आदर्श व्यक्तिमत्व जेव्हा गुरुरूपात आपल्या सहवासात येतं, तेव्हा नक्कीच आपली सकारात्मकता वाढते आणि आपल्या व्यक्तिमत्वाला झळाळी येते.

डॉक्टर ज्ञानेश्वर मुळे सरांच्या प्रोत्साहनामुळे आणि प्रेरणेमुळेच शुभांगी मुळे या पुस्तकाचे लेखन करू शकल्या. डॉक्टर ज्ञानेश्वर मुळे यांनी चरित्र असूनही या पुस्तक लेखनामध्ये कुठेही ढवळाढवळ केली नाही. त्यांनी शुभांगी मुळे यांना त्यांच्या पद्धतीने पुस्तक लिहिण्याचे स्वातंत्र्य दिले. ही खरच खूप मोलाची गोष्ट आहे. त्यामुळे लेखिका त्यांच्या पद्धतीने निरनिराळ्या लोकांना भेटल्या आणि त्यांचे डॉक्टर ज्ञानेश्वर मुळे यांच्याबद्दलचे विचार जाणून घेतले. त्या डॉक्टर ज्ञानेश्वर मुळे यांच्या तीर्थरूप आईंना भेटल्या, त्यांच्या बहिणभावंडांना भेटल्या, त्यांच्या मित्र परिवाराला भेटल्या, त्यांच्या कार्यकाळात त्यांच्या जे-जे सहवासात आले, त्या सर्वांना लेखिका भेटल्या, त्या सर्वांचे मुळे सरांबद्दलचे विचार, भावना जाणून घेतल्या आणि एक मुखाने सगळ्यांकडून त्यांना हेच विचार ऐकायला मिळाले की डॉक्टर ज्ञानेश्वर मुळे कायम माणुसकी जपत, सर्वांना मदत करत, आपल्या देशाच्या प्रगतीचा सतत विचार करत आपलं आयुष्य जगले आहेत.

'सृजनशील जगन्मित्र' पुस्तकाचा नागपुरात क्रॉसवर्ड बुक सेंटरतर्फे साजरा झाला. नागपूरमधल्या कर्तबगार उद्योजिका माननीय अरुणा पुरोहित यांच्या पुढाकाराने हा प्रकाशन सोहळा साकार झाला.

या प्रकाशन सोहळ्याकरता सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश सिरपूरकर प्रमुख पाहुणे आणि उद्योजक व व्हीएनआयटीचे प्रमुख, माननीय विश्राम जामदार विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच ज्यांच्यावर हे पुस्तक लिहिले आहे ते परराष्ट्र खात्याचे निवृत्त सचिव डॉक्टर ज्ञानेश्वर मुळे हे देखील याप्रसंगी उपस्थित होते. त्याचप्रमाणे ज्यांनी हा कार्यक्रम घडवून आणला ते माननीय अरुणा व सचिन पुरोहित हे देखील उपस्थित होते. सुप्रसिद्ध उद्योजक पारसजी ओस्वाल, त्याचप्रमाणे सुप्रसिद्ध दिग्दर्शिका आणि धरमपेठ महिला मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या उपाध्यक्षा सारिका पेंडसे यांची उपस्थिती देखील या कार्यक्रमाला लाभली.

न्यायाधीश विकास सिरपूरकरजी म्हणाले की अशी काही रत्न असतात की समुद्रातल्या तळ्याच्या अंधारात त्यांचे चकाकणे नष्ट होते. अशी काही फुलं असतात की वाळवंटात माळरानावर ती फुलतात व त्यांचा सुगंध तेथेच लुप्त होऊन जातो. मात्र ज्ञानेश्वर मुळ्यांच्या बाबतीत असं काही झालं नाही. त्यांचा सुगंध, ज्ञान प्रकाश सगळीकडे पसरला.

त्याचप्रमाणे न्या. विकास सिरपूरकर यांनी अभ्यासपूर्ण आणि साध्या सोप्या भाषेत डॉक्टर ज्ञानेश्वर मुळे यांचं व्यक्तिमत्त्व रेखाटल्याबद्दल पुस्तकाचे कौतुक केलं.

विशेष अतिथी विश्राम जामदार म्हणाले की कुटुंबात किंबहुना संयुक्त कुटुंबात जडणघडण आणि व्यक्तिमत्त्व विकास आगळाच असतो. डॉक्टर ज्ञानेश्वर मुळे यांच्या जीवनावर आधारित 'सृजनशील जगन्मित्र' या पुस्तकातून ही संवेदनशील, माणुसकी जपणारी, मदतीची अनोखी वाट जोपासणारी व्यक्ती आहे ह्याचा प्रत्यय येतो. ही व्यक्ती हरहुन्नरी आहे. हात आकाशाला भिडलेला पण पाय जमिनीवरच टेकलेल्या डॉक्टर ज्ञानेश्वर मुळे यांच्या जीवनातून प्रेरणा मिळते.

या पुस्तक प्रकाशन सोहळ्यात 'शून्यातून या विश्व उभारीत जीवन हे साकार, राजदूताचा विश्वातून संचार' या डॉक्टर ज्ञानेश्वर मुळे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख जाणवत राहिला. क्रॉसवर्डच्या पल्लवी देवरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.


क्रॉसवर्डचे विलास काळे, निधी काळे, प्रवीण अंबाडे यांचा कार्यक्रमाच्या आयोजनात विशेष सहभाग होता.


---




पुण्यातील प्रसिद्ध 'डॉ. अरुण दातार सूर्या जिम'चा ४३ वा वर्धापन दिन ६ एप्रिल गुढी पाडव्याला संपन्न झाला.
या वेळी डॉ. दातारांनी लिहिलेल्या 'भारतीय व्यायाम साधना' आणि 'फिटनेस फक्त ११ मिनिटात' या दोन पुस्तकांचे प्रकाशन ज्येष्ठ रंगकर्मी व डॉ. दातारांचे मित्र विक्रम गोखले यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी सावित्रीबाई फुले पुढे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर होते.
या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## ‘जीवनरंग’ आणि ‘कहाणी मुंबईच्या कामगारचळवळीची’




व्यासंगी राजकीय विश्लेषक, कामगारचळवळीतील नेते आणि कामगारचळवळीचे अभ्यासक स्व. अजित सावंत यांच्या ‘कहाणी मुंबईच्या कामगारचळवळीची’ आणि ‘जीवनरंग’ या दोन पुस्तकांचे, गुरुवार, ११ एप्रिल रोजी परळ येथील आर.एम.भट हायस्कूलच्या सभागृहात ‘ग्रंथाली’तर्फे प्रकाशन करण्यात आले.

११ एप्रिल हा स्व. अजित सावंत यांचा साठावा जन्मदिवस! अजित सावंत आणि ‘ग्रंथाली’चे जिव्हाळ्याचे आणि परस्पर सहकार्याचे नाते होते. त्यांच्या ‘उठाव झेंडा बंडाचा’ या गाजलेल्या पुस्तकाचे प्रकाशनही ‘ग्रंथाली’नेच केले होते. ‘कहाणी मुंबई कामगारचळवळीची’ आणि ‘जीवनरंग’ ही दोन पुस्तके ‘ग्रंथाली’नेच प्रकाशित करावीत अशी दिवंगत अजित सावंत यांची इच्छा होती. ‘ग्रंथाली’नेही त्यांना तसा शब्द दिला होता. आपल्या प्रिय पतीच्या जन्मदिनाचे औचित्य साधून या दोन्ही पुस्तकांचे प्रकाशन करावे असा अजित सावंतच्या पत्नी अनिता सावंत यांचा संकल्प होता. शिवाय ज्या आर.एम.भट हायस्कूलच्या शाळेत अजित यांनी मुळाक्षरे गिरवली होती, त्याच शाळेच्या सभागृहात त्यांचे अक्षरधन सर्वांसाठी खुले व्हावे या अनिवार इच्छेने या दोन्ही पुस्तकांचा प्रकाशन सोहळा अनेक मान्यवरांच्या आणि शेकडो रसिकजनांच्या उपस्थितीत ११ एप्रिल २०१९ रोजी आर.एम.भट हायस्कूलच्या सभागृहात अत्यंत हृद्य पण तितक्याच दिमाखात संपन्न झाला.

कामगार चळवळीच्या संयुक्त कृतिसमितीचे सहनिमंत्रक विश्वास उटगी, ‘एबीपी माझा’चे लोकप्रिय संपादक राजीव खांडेकर, ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे, सर्वोच्च न्यायालयाचे ॲड. संजय संघवी आणि आर.एम.भट हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य गुणवंती कांबळे आणि अनिता सावंत यांसारखे विविध क्षेत्रांतील मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. स्त्रीमुक्ती चळवळीच्या संस्थापिका शारदा साठे त्याचबरोबर अनेक नामवंत कंपनीचे सीईओ, आर.एम.भट हायस्कूलचे आजीमाजी शिक्षक व इतर मान्यवर तसेच अजित सावंत यांचे सहाध्यायी, कुटुंबीय यांच्या उपस्थितीत पुस्तकप्रकाशन सोहळा पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात दिवंगत अजित सावंत यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून झाली. ‘ग्रंथाली’चे सुदेश हिंगलासपूरकर आणि धनश्री धारप यांनी ‘ग्रंथाली’च्या प्रथेनुसार ग्रंथराज देऊन व्यासपीठावरील सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

सुदेश हिंगलासपूरकर यांनी त्यांच्या प्रास्ताविकात अजित सावंत यांच्याशी असलेल्या घनिष्ट मैत्रीला उजाळा देत अजित सावंत यांनी ‘ग्रंथाली’च्या अडचणीच्या प्रसंगी केलेल्या मदतीचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला, तसेच पुस्तक प्रकाशनाद्वारे वाचक चळवळीचा घेतला वसा ‘ग्रंथाली’ कसा पुढे नेत आहे हेही त्यांनी मोजक्या शब्दात विशद केले.

‘कहाणी मुंबईच्या कामगारचळवळीची’ या पुस्तकाचे प्रकाशन प्रकाश उटगी तर ‘जीवनरंग’ या पुस्तकाचे प्रकाशन राजीव खांडेकर यांच्या हस्ते झाले. प्रकाशनानंतर अजित यांचे आवडते शिक्षक मिलिंद बेडेकर यांनी ‘कहाणी मुंबईच्या कामगारचळवळीची’ या पुस्तकातील एका नाट्यमय प्रसंगाचे सुंदर अभिवाचन करून सुमारे ऐंशी वर्षांपूर्वीचा प्रसंग उपस्थितांसमोर जिवंत केला.

या प्रसंगी अजित सावंत यांच्या पत्नी अनिता सावंत यांनी मनोगत व्यक्त करताना अजित सावंत ह्यांच्या लेखनकार्याविषयीच्या असंख्य आठवणी जाग्या केल्या. अजित सावंत यांच्या लेखनाचा प्रथम वाचक ही भूमिका त्यांनी कशी निभवली हे कथन करताना प्रसंगी भावनिक होत त्यांनी पुस्तकनिर्मितीची कथाही सांगितली. या निर्मितीप्रक्रियेत ज्या अनेकांचे हात लागले त्यांच्याविषयी त्यांनी कृतज्ञताही व्यक्त केली.

ॲड. संजय संघवी यांनी आपल्या छोटेखानी भाषणात अजित सावंत यांचे कामगार चळवळीतील योगदान, त्यांचे विचार आणि लेखनकार्य यावरही लिहिले जावे अशी इच्छा व्यक्त केली, तर ‘एबीपी माझा’चे राजीव खांडेकर यांनी अजित सावंतांशी असलेल्या व्यक्तिगत मैत्रीचे पदर काही प्रसंगाचे वर्णन करून उलगडून दाखवले. तसेच अजित सावंत यांच्या राजकीय विचारांची बैठक किती पक्की होती, त्यांच्या राजकीय निष्ठा कशा अढळ होत्या, याचाही आवर्जून आदरपूर्वक उल्लेख करून दोन्ही पुस्तकांच्या प्रकाशनाबद्दल आनंद व्यक्त केला.

ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे दिवंगत अजित सावंत यांचे अंतरंगातील मित्र! त्यांचं मैत्र उलगडताना त्यांच्या नेहमीच्या शैलीत कवितांची पेरणी करीत अजित सावंतांवरील प्रेम त्यांनी व्यक्त केले. ‘‘अजित खऱ्या अर्थाने आनंदयात्री होता. त्यांच्याविषयीच्या कोणत्याही कार्यक्रमावर शोकाचे, उदासीनतेचे सावट त्यांच्या आत्म्यालाही रुचणार नाही असे सांगून कवी म्हात्रे यांनी कार्यक्रमाचे रूपच पालटून टाकले.’’ अजित सावंत यांच्या संवेदनशील मनाचे प्रतिबिंब असलेली ‘माझा बा मेला’ ही कविता वाचताना कवी अरुण म्हात्रेही भावुक झाले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष विश्वास उटगी यांनी अध्यक्षीय समारोप करताना अजित सावंत यांच्या कार्याचा यथोचित शब्दात गौरव केला, त्याचबरोबर कामगारांना उद्ध्वस्त करणाऱ्या शासनव्यवस्थेवरही त्यांनी कडक शब्दात कोरडे ओढले. गिरणी कामगारांबरोबरच विविध उत्पादनक्षेत्रातील कामगारही कसा उद्ध्वस्त झाला आहे. कंत्राटपद्धतीमुळे, रोजंदारी पद्धतीमुळे कामगार आणि कामगार संघटना यांचे भवितव्य कसे धोक्यात आहे याविषयीचे वास्तव त्यांनी त्यांच्या अभ्यासपूर्ण निरीक्षणातून श्रोत्यांसमोर उभे केले.


अजित सावंत लिखित आणि 'ग्रंथाली' प्रकाशित दोन पुस्तकांचे प्रकाान तर झालेच, पण त्या निमित्ताने कामगार चळवळ आणि कामगारांच्या समस्यांवर झालेली चर्चा हीच अजित सावंत यांना खरी श्रद्धांजली ठरली.

शेवटी कवी अरुण म्हात्रे यांनी त्यांचे गाजलेले 'उंच माझा झोका' हे लोकप्रिय सादर करून या सुंदर सोहळ्याची सांगता केली. या कार्यक्रमाला अजित सावंत यांच्या कुटुंबीयांसमवेत त्यांच्या वृद्ध मातोश्रीही आवर्जून उपस्थित होत्या.

निवेदिका आणि अनिता सावंत यांच्या वर्गमैत्रीण मेधा कोठूरकर-आलकरी यांच्या अतिशय सुंदर सूत्रसंचालनाने कार्यक्रमाला एक वेगळी उंची प्राप्त करून दिली. अजित सावंत यांच्या गोतावळ्यातील आणि जीवनप्रवासातील अनेक माणसे मोठ्या संख्येने उपस्थित होती.

## 'लडाख... प्रवास अजून सुरु आहे'च्या, चौथ्या आवृत्तीचं प्रकाशन

'ग्रंथाली' प्रकाशनाच्या 'लडाख.. प्रवास अजून सुरु आहे' या नरेंद्र प्रभू लिखित वाचकप्रिय पुस्तकाच्या चौथ्या आवृत्तीचं प्रकाशन जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते नुकतंच सिडनी-ऑस्ट्रेलिया इथे थाटात पार पडलं.




ऑस्ट्रेलियामधील सिडनी इथे १९ ते २१ एप्रिल २०१९ हे तीन दिवस अखिल ऑस्ट्रेलिया मराठी सम्मेलन २०१९ साजरं झालं. संपूर्ण ऑस्ट्रेलिया खंडातल्या एक हजारावर मराठी रसिकांनी यात भाग घेतलेल्या संमेलनात आत्माराम परब यांच्या पहिल्या मुंबई-लडाख-मुंबई अशा मोटरसायकलवरच्या प्रवासाची चित्तथरारक कथा असलेल्या सदर पुस्तकाचं प्रकाशन जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ व थोर विचारवंत डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या शुभहस्ते झालं. याप्रसंगी मराठीतील लेखक आणि वक्ते अच्युत गोडबोले, प्रवास वर्णनकार डॉ. मीना प्रभू, ईशा टुर्सचे संचालक आत्माराम परब, चितळे बंधू मिठाईवालेचे केदार चितळे, 'वसंत' मासिकाचे संपादक दिलीप देशपांडे असे अनेक मान्यवर उपस्थित होते.

'लडाख... प्रवास अजून सुरू आहे...' ही आत्माराम परब यांच्या लडाखच्या अथक चाललेल्या प्रवासातील पहिली कथा. मुंबई-लडाख-मुंबई असा मोटारसायकलने प्रवास करायचा असं ठरवून आत्माराम परब यांच्यासोबत आणखी सहा साहसीवीर मुंबईहून निघाले. पुढे अहमदाबाद-उदयपूर-चंदीगढ-दिल्ली करीत मनाली गाठली आणि इथूनच खरी मोहिमेला सुरुवात झाली. मनालीहून निघून रोहतांगपासची चढाई करतानाच हिमालयातल्या उंचच उंच पर्वत रांगा जशा सामोऱ्या येत होत्या तशी संकटाची चढती रांगही त्यांच्या समोर उभी ठाकली होती.

सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात हिंडताना आणि तिथला झोडपून काढणारा पाऊस अंगावर घेताना आत्मारामला कधी नको झाला नाही, पण इथे हिमालयाच्या रौद्ररुपाशी दोन हात करताना त्यांच्या नाकी नऊ आले. आत्माराम आणि त्यांच्या सहकार्यांनी अक्षरशः मृत्यूचं तांडव पाहिलं. तेही एक दोन दिवस नव्हे तर सतत पंचवीस दिवस. बेफाम बर्फवृष्टी, अनोळखा प्रदेश आणि माणसं, पराकोटीची भूक, ढासळणारं मनोधैर्य, घरच्यांसाठी कालवाकालव होणारं मन आणि आसपास पसरलेली प्रेतं. चांगल्या घरातली, खात्यापित्या कुटंबातली ही मुलं चाहाच्या एका घोटाला महाग झाली. हे सगळं विलक्षण आहे.


'लडाख, प्रवास अजून सुरू आहे...' या पुस्तकाची अनुक्रमणिका जरी वाचली तरी याचा प्रत्यय येतो. हे सगळं झालं तरी आत्मारामनी लडाखची वाट काही सोडली नाही. दुर्दम्य आशावाद आणि जिद्दीच्या जोरावर आत्माराम लडाखला जातच राहिले. हजारो पर्यटकांना बरोबर नेताना आजवर सव्वाशेच्यावर लडाखवाऱ्या त्यांनी केल्या आहेत. उघडे पर्वत असले तरी रांगोळीचे रंग कमी वाटावेत असे मातीचे रंग, असंख्य छटा आणि आकार. निसर्गाची मनोहारी शिल्पं, बर्फाच्छादित शिखरं, आकाशाशी स्पर्धा करणारे पासेस, खळाळत्या नद्या, गोठलेले प्रवाह, आथित्यशील माणसं आणि खडा पहारा देणारे पराक्रमी सैनिक, पँगाँग लेक, नुब्राव्हाली या सर्वाचं चलतचित्रासारखं वर्णन करणारं हे पुस्तक नरेंद्र प्रभू यांनी लिहिलं आहे. वाचक प्रिय झालेल्या या पुस्तकाची चौथी आवृत्ती सिडनी; ऑस्ट्रेलिया इथे साजऱ्या झालेल्या अखिल ऑस्ट्रेलिया मराठी संमेलन, २०१९ मध्ये प्रकाशित झाली.

# पुरस्कार

## 'ग्रंथाली'च्या 'आषाढी भक्तिसंगीताची रौप्यमहोत्सवी वारी' या योजना शिवानंद यांच्या पुस्तकास पुरस्कार

नववर्षाच्या पूर्वसंध्येला 'आषाढी – भक्तिसंगीताची रौप्यमहोत्सवी वारी' या 'ग्रंथाली' प्रकाशित व योजना शिवानंद पाटील यांनी लिहिलेल्या पहिल्याच पुस्तकाला 'संत गाडगे महाराज अध्यासन' कोल्हापूर यांच्यातर्फे 'संत ग्रंथ प्रथम पुरस्कार' नुकताच जाहीर झाला आहे.

नेहमीपेक्षा वेगळया वाटेने जाऊन केलेल्या प्रयत्नाला मिळालेला हा पुरस्कार आहे. साहित्य जगतामध्येसुद्धा असे भाग्य फार मोजक्या मंडळींना लाभते. योजना शिवानंद यांना गायन कलेतील योगदानासाठी अनेक




पुरस्कार मिळाले आहेत. त्यापेक्षा हा वेगळा व महत्त्वाचा पुरस्कार आहे. पंचवीस वर्षांपूर्वी पं. शिवानंद पाटील आणि योजना पाटील यांनी विनामूल्य सुरू केलेली आषाढी वारी पं शिवानंदजीच्या निधनानंतरही अखंड सुरूच राहिली. अनेक धक्के पचवूनही योजनाताईंनी हा भक्तिरस अखंडपणे भक्तांना उपलब्ध करून दिला आहे. 'आषाढी– भक्तिसंगीताची रौप्यमहोत्सवी वारी' या पुस्तकातून हा दीर्घ प्रवास उभा राहतो.

संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते ते प्रकाशित झाले होते.

## 'ग्रंथाली'च्या 'नाही फिरलो माघारी' या मोहन शिरसाट यांच्या कवितासंग्रहास पुरस्कार



काव्यरसिक मंडळ, डोंबीवलीकडून ग्रंथाली प्रकाशनच्या 'नाही फिरलो माघारी 'या मोहन शिरसाट यांच्या कवितासंग्रहास 'कै. अनिल साठे स्मृती काव्य उन्मेष पुरस्कार २०१८' प्राप्त झाला आहे. डोंबिवली मनपाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागहात हा पुरस्कार कवी अजय कांडर यांचे हस्ते प्रदान करण्यात आला. याप्रसंगी गझलकार हेमंत राजाराम, परीक्षक प्रल्हाद देशपांडे आणि काव्यरसिक मंडळाच्या अध्यक्षा मृणाल केळकर यांची उपस्थिती होती. कवितेसाठी हे मंडळ गेल्या ५३ वर्षापासून कार्यरत आहे.

## 'ग्रंथाली' प्रकाशित 'सुंदर माझी शाळा' बालकवितासंग्रहाला काव्य किरण मंडळ, कल्याण (मुंबई) येथील 'राज्यस्तरीय उत्कृष्ट काव्यसंग्रह पुरस्कार' जाहीर




### 'सुंदर माझी शाळा' बालकवितासंग्रहाला मिळालेला हा सलग चौथा राज्यस्तरीय पुरस्कार


रोख रक्कम, सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.
काव्य किरण मंडळाच्या ४६व्या वर्धापन दिनानिमित्त
रविवार, ५ मे २०१९ रोजी कल्याण येथील श्री स्वामी नारायण सभागृहात
ज्येष्ठ लेखिका व समीक्षक अंजलीताई बापट यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**परिमळामाजि कस्तुरी**
**डॉ. सिसिलिया कार्व्हालो**




**परिमळाचा कोश**

'सुखा-समाधानानेच जीवनाला पूर्णत्व येते असं नाही. दु:खवेदनांनीदेखील जीवनातील या जीवनाचे पूर्णत्व जोखता येते. शून्यातून जसे आपण विश्व निर्माण करू शकतो, तसेच आपण आपल्या स्वत:ला शून्यावर नेऊन ठेवले तर खऱ्या अर्थाने आपण 'पूज्य' झालेलो असतो. विश्वाचा आकार शून्यासारखाच आहे म्हणून तर विश्व, सृष्टी सौंदर्याने ठासून भरलेले आहे.' (८२)

'परिमळामाजि कस्तुरी' हा लेखसंग्रह डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांचा; नुकताच 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेला. हाती घेतला आणि 'वाचत सुटलो' अशी अवस्था झाली. हे लेख 'सकाळ'मध्ये वर्षभर सलगपणे प्रकाशित झालेले आहेत. त्यांचा आकार त्यामुळे छोटेखानी म्हणता येईल असा परंतु वाचत असताना आकारमान लक्षात येतच नाही. लक्षात येतो तो आवाका. लेखिकेचे वाचन, अभ्यास, चिंतन, दृष्टिकोन आणि त्यातली तरलता. यामुळे हा संग्रह कधी वाचून झाला हे कळत नाही, परंतु त्यातली कस्तुरी त्यानंतरही आपल्या मनाच्या गाभाऱ्यात दरवळत राहते. लेख वृत्तपत्रीय स्वरूपाचे आहेत म्हणजे रकाने पूर्ण करण्यासाठी लिहिलेले आहेत, असे अजिबात नाही. एक सकारात्मक दृष्टिकोन समोर ठेवून जे-जे उत्तम देण्याचा हा प्रयत्न आहे. आणि तो पूर्णपणे यशस्वी झालेला आहे याची प्रचिती हे लेख देतात. तसेच वेगळे काही सकस असे वाचनात आले याचे समाधानही देतात.

डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांचा प्रथम परिचय आहे तो कवयित्री म्हणून 'उन्मेष', 'अंतर्यामी', 'सूर्य किरणात आला', 'पंख', 'दारातल्या रांगोळीचे रंग', 'माणूस उकरून काढावा लागतोय' हे त्यांचे कवितासंग्रह. याशिवाय 'ललित गद्यसंग्रह', 'कथासंग्रह', 'संशोधनात्मक', 'चरित्रात्मक', 'आस्वादनपर', 'बालवाङ्मय, संपादन, अनुवाद असे विविधांगी विपुल लेखन त्यांनी केलेले आहे. मराठी साहित्यविश्वात स्वत:चे अढळ असे स्थान निर्माण केलेले आहे. त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण लेखनामुळे त्यांचे लेखन इतरांहून वेगळे असते, हे विधान एक वाचक म्हणून ठामपणे करता येते.

'मूलकंद' या लेखात नजिम हिकमत यांची नज्म दिलेली आहे. जी आपल्याला अंतर्मुख होऊन विचार करायला प्रवृत्त करते. लॉर्ड इमर्सनचा संदर्भही खूप रम्य म्हणावा असा आहे. तो निसर्गाला परमेश्वराचं हस्ताक्षर समजतो. रवींद्रनाथ टागोरांचं उदाहरण समोर ठेवून लेखिका लिहितात, 'एखाद्या छोट्याशा गोष्टीचा अर्थ इतरांनी कोणी सांगण्यापेक्षा जेव्हा स्वत:ला कळेल, तेव्हा 'जीवन कळले हो' असं म्हणता येईल.

'यशाचं गमक' हा लेख 'द मंकी इ सोल्ड हिज फेरारी' या रॉबिन शर्मा लिखित कादंबरीचा संदर्भ घेऊन साकारलेला आहे. जुलियन हा नायक, स्वत:चे सत्त्व शोधण्यासाठी सर्व ऐहिकतेची पुटे खरवडून टाकतो. आणि ते प्राप्त झाल्यावर जे तेज आयुष्यावर पसरते, ते ध्येयाचे, यशाचे गमक असते. स्टिव्ह जॉब्स, मार्क झुबेर यांची स्वयंप्रकाशाची उदाहरणे पाच लेखांत येतात.

'सेल्फी'ची तर आता लाटच आलेली आहे. त्यावेळी जे हावभावांचे प्रदर्शन होते त्याविषयी आचार्य अत्रे यांचे वाक्य लेखिका देतात, 'अतिशयोक्तीशिवाय आपल्याला आपल्या वास्तवाची कल्पनाच करता येत नाही.'

'देखणे ते चेहरे' हा लेख तोंडावर स्कार्फ बांधून फिरणाऱ्या प्रत्येकीने वाचायला हवा. 'पेनिलोपी' या चित्रपटाचा संदर्भ आणि त्यातील नायिकेचे हिचे स्वत:विषयीचे ठाम मत वेगळा विचार देऊन जाते. बा.भ. बोरकर यांच्या कवितेच्या ओळी देत लेखिका लिहितात, 'आपल्या चेहऱ्यावरील लावण्यापेक्षा अंत:करणातील लावण्यरेखा ज्याला ओळखता आली, त्याचे सौंदर्य वर्णन करण्यास शब्द स्वत:च धावून येतील आणि तळहातावर झेललेल्या दवबिंदूत स्वत:ला न्याहाळू लागतील.'

'मूल्य' लेखात सोने, हिरे, मोती यांच्याशी तुलना करताना लेखिका भान जागे करतात, ''हव्यासापायी सर्वस्व गमावू नका. डोळसपणे भवताली पहा आणि वागणे असे असावे की, आयुष्याला सोन्याचं मूल्य प्राप्त होईल. त्यातून मिळणारे समाधान आणि सार्थकता कुठल्याही धनापेक्षा अधिक असेल.''

'ठिबकसिंचन' हा लेख आजच्या भीषण क्रौर्यावर भाष्य करतो. जालियनवाला बाग, नौखाली येथील हत्याकांडाने जणू ईश्वरावरच मात केली. आजही हे प्रकार सतत घडत आहेत. याविषयी अनेकांनी लिहिले, परंतु लेखिका आणखी वेगळा विचार मांडतात. हे सततचे रक्तपात म्हणजे पृथ्वीवर होणारे रक्ताचे ठिबकसिंचन आहे का? तसे असेल तर कोसळणारा पाऊस, वाहणाऱ्या नद्या हे निसर्गाचे अश्रू तर नव्हेत?

लेखांमध्ये कविता, सिनेमा, कादंबरी, व्यक्ती, तत्त्वज्ञान यांचे संदर्भ आलेले आहेत. प्रत्येक लेख या संदर्भांनी सजवलेला आहे. तोही चपखल, तरल आणि विचारपूर्वक, जसा सुंदर कलाकुसर केलेला गोफ हिरे-माणकांनी गुंफून सजवावा. लेखिकेच्या मांडणीत सहजता आहे, भाषेवर पकड आहे. कवीमन सतत जागृत आहे. या लेखसंग्रहाच्या शीर्षकावरूनही त्याची प्रचिती येते. प्रत्येक लेखही त्याची साक्ष देतो. एक सुंदर परिमळाचा कोश वाचकांच्या हाती दिला यासाठी लेखिका आणि प्रकाशक यांना धन्यवाद!

सतीश खानविलकर यांनी सुरेख मुखपृष्ठ या संग्रहासाठी दिलेले आहे. सागराच्या तळाशी असलेले बहुविध मोती असावेत, तसे आशयाचे मोती त्यांनी नेमकेपणाने मुखपृष्ठाला दिलेले आहेत.

**मूल्य १२५ रु. सवलतीत ७५ रु.**

# ग्रंथपान

**नैतिक–अनैतिक**
**अर्जुन जगधने**




**फरक बिंब आणि प्रतिबिंबातला**

''जगाच्या पाठीवरील कोणत्याही देशात 'नैतिकता' ही संकल्पना अगदी प्राथमिकतेने आणि स्पष्टच सांगायचे, तर समजुतीच्या प्राथमिक पातळीवर स्त्रियांशी जोडली गेलेली दिसते. खरे तर नैतिकता ही व्यापक मूल्यसंकल्पना आहे. माणसाच्या जगण्यातील जवळपास सर्वच अंगामध्ये तिची स्वत:ची अशी एक जागा आहे, तिचे सर्वात जवळचे नाते केवळ आणि केवळ सत्याशी आहे. सत्य काय आहे आणि समोर काय येते किंवा ठेवले जाते किंवा ठेवावे की नाही याबाबत संभ्रम निर्माण होतो. यातल्या फरकावर, अंतरावर ती कृती नैतिक आहे की अनैतिक हे ठरत असते.'' 'नैतिक–अनैतिक' याविषयी प्रतिमा जोशी यांनी व्यक्त केलेले हे मत आहे.

'नैतिक–अनैतिक' हा अर्जुन जगधने यांचा कथासंग्रह 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेला आहे. यात एकूण आठ कथांचा समावेश आहे. या कथा एक सूत्र घेऊन आलेल्या आहेत किंवा असेही म्हणता येईल. एका सूत्राने या कथा गुंफलेल्या आहेत. हे सूत्र आहे नैतिक–अनैतिकतेचे. नैतिकता आणि अनैतिकतेचा संबंध अनेक अंगांनी तपासता येतो. खोटे बोलण्यापासून, खोटा मुखवटा धारण करून वागण्यापर्यंत, सोज्ज्वळतेच्या नावाखाली अनेक पातळ्यांवरील चळवळी उभ्या करायच्या आणि कार्यकर्त्यांनी त्याच सोज्ज्वळतेला पायी तुडवायचे. यातला अखेरचा टप्पा येतो तो विवाहसंस्थेच्या, परंपरेच्या रितीरिवाजांना झुगारण्याचा. यात स्त्री आणि पुरुष हा भेदही आपोआप गळून पडलेला दिसतो. या कथा वाचताना हे सगळे वातावरण गडद झालेले दिसते. संघटनात्मक कामाच्या चळवळीत एकत्र आलेले धनंजय आणि सुमित्रा जीवनसाथी म्हणून विवाहाच्या बंधनात गुंफले जातात, परंतु पुढे चळवळ बाजूला ठेवून धनंजय वेगळ्या टप्प्यावर येऊन उभा राहतो. सुमित्रा त्याच्यापासून दूर होण्याचा निर्णय घेते तेही संजयचा आधार सापडतो तेव्हा. संजय, राजन, धनंजय, अनिता आणि सुमित्रा या व्यक्तिरेखा 'नैतिकता' या कथेत भेटतात. त्यांचे वैचारिक तत्त्व आणि भावनिक विश्व या नैतिकतेभोवती गुंफलेले आहे.

'निष्ठा' या कथेतील कालिंदी विज्ञानाचे या विषयीचे अध्यापन करते. विज्ञान, त्याची उपयुक्तता, अस्तित्व, दृष्टिकोन याविषयी मनात कुठे शंका नाही; तरीही देवदर्शन, बुवा, बाबा यांच्याविषयीच्या आस्थेला आस्थेवाईकपणे स्वीकारते. यात पुन्हा श्रद्धा–अंधश्रद्धांचाही समावेश आहेच. अगदीच उदाहरण द्यायचे तर, पाळी असताना संभोग नको, याचे. अशा विज्ञान आणि अंधश्रद्धा यांच्या परिघात सापडलेल्या कालिंदीची ही कथा द्वंद्वाला छेद देत सकारात्मकतेकडे झुकते.

'रौप्यमहोत्सव' ही नारी मंच आणि त्यांचे कार्य याविषयीची तळमळ दाखविणारी कथा. निष्ठेने एखादी संस्था पंचवीस वर्ष चालवणे किती खडतर असते, त्याचे उदाहरण म्हणजे रमा. सोबत असणाऱ्या सहकारी महिलांवरील अत्याचार आणि बुरसटलेले याविषयी तावातावाने मते मांडतात, परंतु त्यांचेच स्वत:चे आचरण त्याला छेद देणारे असते. यासाठी लेखकाने दोन वाक्ये दिलेली आहेत, 'त्याची लाईफ स्टाईल बदलली फक्त पण विचारांची स्टाईल तीच राहिलीय. मेल्या दगड–धोंड्यालाही लाजवतील.' 'मध्यमवर्गीय जाणिवाच्या पुढं जाणं जमणार नाही त्यांना. पोटातलं पाणीही न हलता परिवर्तन हवंय त्यांना. मोर्चे, आंदोलन आता त्यांना परवडणार नाहीत.'

हल्ली पुरस्कारांचा पूर आला आहे. ते कसे आणि कुणाला दिले जातात हे जगजाहीर होत नाही. परंतु मिळालेल्या व्यक्तीकडे पाहून त्याची कल्पना येते. सुधीरला असा पुरस्कार मिळतो तेव्हा त्याचीच पत्नी सुजाता विरोधात आवाज उठवते. परंतु तीच 'पुरस्कार' कथेतील सुजाता एका टप्प्यावर स्वत:कडे पाहते, तेव्हा तिच्या लक्षात येते की, आपण आपली अस्मिता हरवत चाललो असून केवळ पैसे कमावण्याचं आणि मुलं काढण्याचं मशीन झालो आहोत.

मल्हार आणि क्रांती हे स्वदेशी विचारमंच अंगी रुजलेले जोडपे खूप वेगळा विचार करणारे. परंतु पुढे व्यक्तिगत आयुष्यात मल्हार–रजनीनं एकमेकांना आयुष्याचे जोडीदार म्हणून निश्चित केले तर क्रांती मल्हारपासून कायमची विभक्त कधी होता येईल याची प्रतीक्षा करू लागली. अंकिता–नागेश, प्रभाकर–सोनल, प्रताप–संग्राम, अशा आणखी व्यक्तिरेखा या संग्रहात आहेत. अपेक्षा आणि त्यांचा भ्रमनिरास, प्रामाणिकता आणि प्रामाणिकतेचे ढोंग अशा दोन पातळ्यांमध्ये वावरणाऱ्या या व्यक्तिरेखा आहेत.

अर्जुन जगधने यांच्या या कथा निवेदनात्मक पद्धतीने आलेल्या आहेत. ज्या विषयावर आधारित कथानक पुढे जाते, तेव्हा प्रत्येक पायरीवरील पाऊल दमदार आणि पुढे जाण्यास बळ देईल असे टाकलेले आहे. विषयात व्यक्तिरेखांच्या मनाचा तळ शोधण्यासाठी ते सर्व बाजूने प्रयत्न करतात. त्याच वेळी सभोवतालचा समाज, त्यांचे व्यवहार याचेही चित्रण त्यात गुंफलेले आहे. समाजात वागताना माणूस कसा वागेल, बोलेल, त्याचे निरीक्षण लेखकाने फार बारकाईने केल्याचे दिसून येते. जी मते मांडली आहेत तीही स्पष्ट आणि निर्भीड आहेत. दोन्ही बाजू मांडण्याचा स्तुत्य प्रयत्न या कथांमधून दिसून येतो. त्यामुळे विषय पूर्णपणे न्याय दिल्यासारखा परिपूर्ण होतो.

प्रतिमा जोशी यांची सुंदर प्रस्तावना या संग्रहाला लाभली आहे. लेखकाचे मनोगतही विश्लेषणात्मक आहे. कथा समजून घेण्यासाठी नक्कीच उपयुक्त ठरते. प्रकाश आणि काळोख यांच्या मितीची कल्पकता आशयाला थेट भिडणारी आहे. मुखपृष्ठाची ही मनोरम कल्पकता स्वत: लेखकाची आहे.

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

**मानवी संस्कृतीचा अर्थ**

**बी.जी. वाघ**




**आपणच आपल्याला समजून घेण्यासाठी**

'ईश्वर हा शिक्षा देणारा आहे. त्याच्या शिक्षेपासून वाचायचे असेल तर धर्म वा धर्मात्म्याला शरण गेले पाहिजे. देव आणि पापी माणूस यातील माध्यम म्हणजे हा धर्म आहे. तो ज्यूंचा, ख्रिश्चनांचा, महंमदाचा किंवा हिंदूचा असेल. मूळ कल्पना तीच आहे.''

''माणूस एकतर स्वत:ला छळतो किंवा दुसऱ्याला त्यात त्याला सुख वाटते. त्याची वैज्ञानिक कारणे अनेक असतील; परंतु धर्माच्या दृष्टीने त्याचे एकच कारण आहे ते म्हणजे पाप. 'ख्रिश्चन धर्माचा आरंभच मुळ पाप या संकल्पनेपासून होतो.'

सामान्य माणसे ईश्वराला, धर्मगुरूला, धर्मग्रंथांना घाबरतात हेच धर्मसत्तेचं बळ आहे.

ईश्वर, धर्म, पाप, जातीयता, बौद्धिकता, विषमता, भौतिकता, विज्ञान, भय, मृत्यू, मृत्यूनंतरचे जीवन, नीतिव्यवस्था, असा मोठा परीघ आहे. ज्याच्या केंद्रस्थानी आहे माणूस, मानव, मानवीसमूह याचे भयगंड, क्रूरता, सभ्यता, वर्चस्व गाजविण्याची प्रवृत्ती, अस्तित्व निर्माण करण्याचा, टिकवण्याचा ध्यास. यातून इतरांवर हल्ले, कत्तल, विध्वंस करून स्वत:चे सार्वभौमत्व निर्माण करणे, विजय मिळवणे, ही तीव्र लालसा. या सगळ्या संघर्षातून निर्माण होते ते संस्कृती, इस्लामिक संस्कृती या सगळ्यांच्या मुळाशी राज्यक्रातींची मशाल आहे. ज्यू, ख्रिश्चन, अरब हे त्यांचे प्रतिनिधित्व करतात. जगभर पसरलेल्या संस्कृती नावाच्या साम्राज्यात यांचा वाटा मोठा आहे. भारतीयांना भारतीयत्वाची ओळख झाली ती इंग्रज भारतात आले तेव्हा. या पूर्वीची आक्रमणे आहेत ती अरबांची. परंतु त्यापूर्वी भारतात बुद्धकाळाचे वर्चस्व होते, ज्याची शिकवण जगभर पसरलेली आहे.

या संस्कृतीचा जन्म संघर्षातून होतो तसा त्याचा ऱ्हासही होतो तो संघर्षातूनच. जसा लोकांचा विश्वास लोकशाहीवरून ढळला की तो भांडवलशाहीला जन्म देतो.

बी.जी. वाघ यांचे 'मानवी संस्कृतीचा अर्थ' हे पुस्तक 'ग्रंथाली'ने प्रकाशित केले आहे. वरवर पाहता ते वृत्तपत्रातून प्रकाशित झालेल्या लेखांचा संग्रह आहे, असे म्हणता येते. परंतु हे लेख वाचनात एकत्रित स्वरूपात समोर येतात तेव्हा त्यांची व्याप्ती 'शोधनिबंधा'इतकी मोठी भासते. मानवी संस्कृती आज आपण पाहतो, अनुभवतो ती किती वरवरची आहे, आपली समजही किती उथळ आहे, याची जाणीव हे लेख करून देतात. विषयाच्या मुळाशी जाणे म्हणजे काय, याची जिज्ञासा इथे पूर्ण होते. एक विषय किती अंगांनी तपासला जाऊ शकतो. त्याला असणाऱ्या पैलूंची संख्या किती पारदर्शी आणि परिमाणे लाभलेली असते. याचा प्रत्यंतर प्रत्येक लेख देतो. ५९ लेख यात आहेत. त्यांच्या शीर्षकावरूनही त्यांची वैशिष्ट्ये लक्षात येतात. 'सत्यासाठी मृत्यू', 'संघर्षाचा इतिहास', 'सुख आणि स्वातंत्र्य', 'बुद्ध-येशू', 'अपूर्णतेकडून पूर्णतेकडे', 'परिभाषा स्वातंत्र्याची' ही काही त्यातली शीर्षके.

मानवी मन तपासायचे तर त्यासाठी मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, इतिहास, विज्ञान यांच्या अभ्यासाची जोड असणे आवश्यक ठरते. नुसते धनुष्य मजबूत असून चालत नाही, विविध प्रकारच्या, क्षमतेच्या बाणांचा भाताही पाठीशी असावा लागतो, तेव्हा युद्धात पाय रोवून ठामपणे जिंकण्याच्या जिद्दीने उभे राहता येते. तो भाता लेखकाच्या पाठीशी आहे. प्रत्येक लेखात आलेली नावे ही तत्त्ववेत्ता, राज्यकर्ता, लेखक, वैज्ञानिक, यांच्या कर्तृत्वाची साक्ष देणारी आहेत. त्यांची पुस्तके, आचरण, तत्त्वे ही कुणाही संशोधक वृत्तीच्या अभ्यासकाला उपयुक्त ठरावीत अशी आहेत. लेखांची परिपूर्णता या संदर्भांनी शिगोशिग दिलेली आहे. त्यात आलेली उदाहरणे, अवतरणे टिपून ठेवावीत संदर्भ म्हणून अशी आहेत.


लेखकाकडे प्रगल्भता आहे. वैचारिक पातळीवरच्या श्रेणीची आहे. त्याला व्यासंगाची जोड आहे. लिहिणाऱ्या हाताला प्रतिभेचा स्पर्श आहे. येशूचे तत्त्वज्ञान, बुद्धाचे तत्त्वज्ञान ते जसे सहज सांगून जातात तसे स्वत:चेही तत्त्वज्ञान त्या ओघात लिहून जातात, जे वाचताना संपूर्ण लेख नजरेसमोर उभा राहतो. आपला भवताल, आजची परिस्थिती उभी राहते. खूप मोठा आवाका असलेले हे लेख लिहिण्याची प्रेरणा त्यांनी त्यांच्या मनोगतात व्यक्त केली आहेत. 'सकाळ' व 'देशदूत'चे संपादक विश्वास देवकर यांनी आजचा तरुण नजरेसमोर ठेवून त्यांचे प्रबोधन करणारे लेखन असावे, अशी संकल्पना मांडली. त्या संकल्पनेला मूर्त देण्याचे चोख आणि उत्तम कर्तव्य वाघ यांनी पार पाडले आहे. हा लेखसंग्रह तरुणांसाठी उपयुक्त तर आहेच, परंतु प्रत्येक 'संस्कृती' समजून घेणाऱ्या जिज्ञासू वाचकांसाठी देखील तितकाच उपयुक्त आहे. इतकेच नव्हे तर संदर्भग्रंथ म्हणून तो संग्रही असावा, असे या ग्रंथाचे मोल आहे.

मानव आणि मानवी संस्कृती हा विषय सनातन आहे तसा सिंहावलोकन करायला भाग पाडणारा विषय आहे. तोच आशय चित्रकार सतीश भावसार यांनी मुखपृष्ठावर रेखाटलेला आहे.

**मूल्य २२५ रु. सवलतीत १४५ रु.**

# ग्रंथपान

**तीन चित्रकार**
**सतीश भावसार**




**रंगरेषेचे व्यक्तिमत्त्व साकारणारे चित्रकार**

''स्त्री स्वभावाने कितीही चांगली आणि घरंदाज का असेना, जर तिच्याजवळ जगण्याचं सबळ कारण नसेल आणि कुटुंबाने तिला सांभाळून घेतले नाही, तर हा समाज तिला वेश्याव्यवसायाच्या डबक्यात भिरकावून देईल. अशा स्त्रीला मदतीचा हात देणं यापेक्षा नैसर्गिक काय असू शकतं? स्त्रीबरोबरच्या नात्यावर आपलं आयुष्य अवलंबून असतं. त्यांच्याबाबतीत कधीही आणि कुणीही हलका विचार करू नये असं मला वाटतं.''(पृ. ३९)

कलावंत केवळ बाह्य चित्रण करून कॅनव्हासला सजवीत नाही. जे दिसतं तेच आपल्या कलाकृतीतून उतरवण्याचा प्रयत्न करीत नाही. तो त्याच्यापलीकडे दिसणारे सौंदर्य चितारण्याचा प्रयत्न करतो. त्याला अपेक्षित असलेले अर्थ सजीव करण्याकडे त्याचा कल असतो. त्यासाठी त्याच्याकडे असलेली अर्थवाही सौंदर्यदृष्टी वेगळी असते. सौंदर्य आणि अर्थ यांना सजीव करणारी संवेदनक्षमता वेगळी असते. मूर्त-अमूर्त असे त्याच्यासाठी वेगळे नसते; असते ती आरपार पाहण्याची, साकारण्याची, आकार देण्याची, समजून घेण्याची वृत्ती. त्यातून समोर व्यक्ती असेल तर तिच्या अबोल मूर्तीचे केलेले निरूपण कुठल्याही तत्त्ववेत्त्याला आव्हान देणारे ठरते. ही अभिव्यक्तीची प्रतिभा दैवी स्वरूपात लाभलेले कलावंत मोजकेच, परंतु त्यांचे विश्व अफाट असते. त्यांनी व्यक्त केलेल्या कलाकृती काळाच्या पुढे असतात, चिरकाल टिकणाऱ्या स्वरूपात असतात, काळाचे आघात त्यांच्यापुढे निष्प्रभ असतात. अशा काही थोर कलावंतापैकी तीन चित्रकारांविषयी सतीश भावसार यांनी लिहिलेले आहे. हे तीनही चित्रकार आपला ठसा काळाच्या पडद्यावर उमटवून त्याच्या आड गेलेले आहेत, परंतु त्याचा ठसा अजून ठसठशीत असून तो अमीट असणार आहे. अजरामर कलाकृतींचे ते तीन कलावंत आहेत व्हॅन गॉग, अमृता शेरगील आणि प्रभाकर नाईक-साटम.

व्हॅन गॉगवरील लेखाचे शीर्षक आहे शापित एरॉस! अवघे सदतीस वर्षांचे आयुष्य लाभलेला व्हिन्सेंट व्हॅन गॉग खरा शापित कलावंत ठरला. दैवाने त्याला वरदान दिले तसा शापही दिला होती की काय, इतका निष्ठुरपणा त्याच्याबाबतीत झालेला दिसून येतो. चित्रकार म्हणून त्याच्या काळात नावारूपाला येत असलेला गॉग सरळ पोटात सुरा खुपसून आत्महत्या जवळ करतो, याला कोणते दुर्दैव म्हणायचे. प्रेम ही मानवी मनाची सर्वात उदात्त भावना तिच्यात आकंठ बुडण्याचे स्वप्न प्रत्येकाचे असते. व्हॅन गॉग त्याबाबतीत भाग्यवान म्हणायचा तसाच दुर्दैवीही! आयुष्यात अनेक स्त्रिया येऊनही साफल्यापर्यंत तो पोहचू शकलेला नाही. याची सुरुवात घरापासून झाली आणि तो सुकाणू सुटलेल्या नावेप्रमाणे प्रवाहात सापडला, स्वत:च्या शोधात ॲना कोर्नेलिया, कि व्होस, युजेन लॉयर, कॅरोलिन हॅनबिक, सिएन हुर्निक, मार्गोट बेगमन, अगोस्तीना सेगातोरी व स्टेन द ग्रुट यांच्या प्रवाहात त्याची नौका हेलकावे खात राहिली. या सगळ्यांचा तपशील फोटोसह लेखकाने दिलेला आहे. व्हॅन गॉगचे नाव ज्या अनेक कलाकृतींशी जोडलेले आहे, त्यापैकी एक आहे 'द सॉरो'. त्याचीही प्रतिमा या लेखात आहे. अप्रतिम चित्राबाबत गॉगने नमूद केले आहे, 'या कुरूप स्त्रीसारखी सुंदर सहचारिणी मला आजपर्यंत मिळाली नव्हती.'

दुसरी शापित कलावंत म्हणजे अमृता शेरगील. चित्रकार म्हणून ती जितकी श्रेष्ठ तितकीच सौंदर्यवती. पारंपरिकतेला छेद देत स्वत:ची शैली निर्माण करणारी ही चित्रकार. चित्र साकारताना वापरले जाणारे रंग आणि प्रकाशाचा करण्यात येणारा उपयोग, याविषयी तिची स्वत:ची अनुमाने होती. 'द प्रोफेशनल मॉडेल' या चित्राच्या निमित्ताने लेखक लिहितात, 'एका प्रसिद्ध मॉडेलची जी ग्लॅमरस प्रतिमा लोकांच्या डोळ्यांसमोर होती त्या कल्पनेलाच अमृताने धक्का दिला. 'मॉडेल इन ग्रीन' आणि 'मॉडेल इन ब्राऊन' या दोन चित्रांनी पॅरिसच्या कलाजगताला स्त्रीची असहाय्य 'देहबोली' शिकवली. अमृता फक्त चित्रकलेसाठी पारंपरिक दृष्टिकोन बाळगत होती असे नव्हे तर तिच्या जगण्याच्या कल्पनेतही तो दृष्टिकोन होता. अजिंठ्याच्या चित्रांनी प्रभावित झालेली अमृता नोंद करते. अजिंठ्यांच्या चित्रकारांनी काढलेल्या चित्रांतील रेषेत जोमदारपणा आणि वेग आहे. अनेक वादळांचा सामना तिने केला. नावाभोवती अनेक प्रवाद जोडले गेले. तरी ती स्वत:शी ठाम होती. तिच्याविषयी मान्यवरांनी जी नोंद केलेली आहे, त्यांची अवतरणे लेखकाने तिच्या लेखात दिलेली आहेत. एक असामान्य व्यक्तित्व असलेली महान चित्रकर्ती शांततेच्याही पलीकडे असलेल्या एका सृष्टीत निघून गेली, तीही अवघ्या वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी.

जपानच्या होक्कायडो म्युझियममध्ये जगाच्या पाठीवरील नामांकित चित्रकारांची चित्र आहेत. त्यात 'लाईफ आफ्टर डार्क' हे टेपेस्ट्रीचे चित्र साकारण्याचा मान ज्यांना मिळाला ते प्रभाकर नाईक साटम जगभर ओळखले जातात ते त्यांच्या टेपेस्ट्रीमुळे. त्यांच्यावरील लेख या लेखसंग्रहात आहे.

या तीनही कलावंतांची शैली वेगवेगळी आहे. त्यांचा असणारा प्रभाव वेगवेगळी आहे. पण मनात साठलेल्या दु:खाकडे पाहण्याची त्यांची नजर समान आहे. त्यांच्यातला दुवा साधणारा हा धागा समान आहे.


सतीश भावसार यांची ओळख आता केवळ चित्रकार/मुखपृष्ठकार इतकी मर्यादित राहिलेली नाही. बाबुराव अर्नाळकरांवरील बृहत्ग्रंथ त्यांच्या नावावर आहे. लेखन चित्रदर्शी तसे माहितीने परिपूर्ण देण्यावर त्यांचा भर असतो. त्यांच्या या सकसपणामुळे दर्जेदार लेखन वाचकांच्या हाती येते. हे तीन चित्रकार त्यांच्या प्रसिद्ध चित्रांसह दिलेले आहेत, तेही आटोपशीर पण नेमक्या नोंदींसह. त्यामुळे त्याला लाभलेले संदर्भमूल्य नोंद घ्यावी असे आहे. मुखपृष्ठही त्यांची कलात्मकता व्यक्त करते.

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

# पुस्तक प्रकाशन क्षणचित्रे




शुभांगी नितीन मुळे लिखित 'सृजनशील जगन्मित्र' या पुस्तकप्रकाशनसमयी परराष्ट्र खात्याचे निवृत्त सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे, सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्या. विकास शिरपूरकर, प्रसिद्ध उद्योजक आणि व्हीएनआयटीचे प्रमुख विश्राम जामदार आणि लेखिका शुभांगी नितीन मुळे.






कै. अजित सावंत लिखित 'जीवनरंग' आणि 'कहाणी मुंबईच्या कामगारचळवळीची' पुस्तकप्रकाशनसमयी सुदेश हिंगलासपूरकर, अनिता सावंत, कवी अरुण म्हात्रे, राजीव खांडेकर (संपादक, एबीपी माझा), विश्वास उटगी आणि कविता कांबळी (मुख्याध्यापिका, आर.एम. भट हायस्कूल)



डॉ. अरुण दातार लिखित 'भारतीय व्यायाम साधना' आणि 'फिटनेस फक्त ११ मिनिटात' या पुस्तकांप्रकाशनसमयी विनया देसाई, आरती दातार, विक्रम गोखले, कुलगुरू डॉ. नितीन करमळकर (पुणे विद्यापीठ) आणि लेखक डॉ. अरुण दातार



आत्माराम परब आणि नरेन्द्र प्रभू लिखित 'लडाख... प्रवास अजून सुरू आहे' पुस्तकप्रकाशनसमयी लेखक आत्माराम परब, नरेन्द्र प्रभू, डॉ. मीना प्रभू, अच्युत गोडबोले आणि डॉ. रघुनाथ माशेलकर

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/ 2019-2021
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.